म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. ८२६२


६१२२

REFBK-0002053

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
क्र. नं. १२५५

यसं

# पुस्तकमाला




## १२

३२ व्या

हिंदी राष्ट्रीय सभेच्या अध्यक्ष

# मिसेस ॲनि बेझंट

यांचं भाषण

REFBK-0002053

प्रकाशक

हिंदी-स्वराज्यसंघ कचेरी, पुणें.

किंमत ४ आणे.

हिंदी स्वराज्य-संघ-कचेरी,
४८६ नारायण पेठ-पुणें.

( १ ) उद्देश—हिंदी-स्वराज्य-संघाचे उद्देश पुढीलप्रमाणें आहे( अ ) पूर्ण सनदशीर मार्गानें ब्रिटिश साम्राज्यांतर्गत ' स्वराज्य ' अथ ' होमरूल ' हिंदुस्थानाकरितां मिळविणें, ( आ ) वरील ध्येय सा करण्याकरितां हिंदुस्थानांत, इंग्लंडांत व इतर ठिकाणी लोकमत शिक्षि व सुसंघटित करणें.

( २ ) सभासद—वयाची २१ वर्षे पूर्ण झालेल्या कोणाही पुरुषास अगर स्त्रीस संघाचे वरील उद्देश मान्य असल्यास व ते तसे मान्य आहेत अशाबद्दल लेखी मान्यता दिल्यास संघाचे सभासद होतां येतें.

( ३ ) वर्गणी—संघाची वार्षिक वर्गणी कमींतकमी एक रुपया आहे.

( ४ ) संघास रु. १०० अगर त्यापेक्षां अधिक रक्कम एकदम देणारे गृहस्थास संघाचे तहाहयात सभासद समजलें जाईल. अशा गृहस्थास वार्षिक वर्गणी देण्याचें कारण नाहीं.

( ५ ) १९१७-१८ सालाकरितां पुढील अधिकारीमंडळ निवडलें आहे.

**अध्यक्ष**—मि. जोसेफ बॅपाटिस्टा ( मुंबई ) बी. ए. एल्‌एल्. बी. एल्. सी. ई. बार–ॲट–लॉ. **उपाध्यक्ष**—लो. बाळ गंगाधर टिळक ( पुणें ) बी. ए. एल्‌एल्. बी. श्री. गणेश श्रीकृष्ण खापर्डे ( अमरावती ) बी. ए. एल्‌एल्. बी. ॲडव्होकेट. ना. दत्तात्रय व्यंकटेश बेळवी ( बेळगांव ) बी. ए. एल्‌एल्. बी. **खजिनदार**—श्री. यशवंत विष्णु नेने ( मुंबई ). रा. शिवराम महादेव परांजपे ( पुणें ) एम्. ए. **चिटणीस**—रा. नरसिंह चिंतामण केळकर ( पुणें ) बी. ए. एल्‌एल्. बी. **मदत चिटणीस**—रा. दामोदर विश्वनाथ गोखले ( पुणें ) बी. ए. एल्‌एल्. बी.

( ६ ) संघाच्या उद्देशाप्रमाणें पुढें काम चालविण्याकरितां पुढील कार्यकारीमंडळ नेमलें आहे. ( १ ) संघाचे अध्यक्ष. ( २ ) ( ३ ) ( ४ ) संघाचे उपाध्यक्ष. ( ५ ) ( ६ ) संघाचे खजिनदार. ( ७ ) संघाचे चिटणीस ( ८ ) रा. रघुनाथ पांडुरंग करंदीकर हायकोर्ट वकील ( सातारा ), ( ९ ) रा. गंगाधर बाळकृष्ण देशपांडे बी. ए. एल्‌एल्. बी. ( बेळगांव ), ( १० ) डॉ. डी. डी. साठे एफ्. आर. एफ्. सी. एस्. ( मुंबई ), ( ११ ) रा. नारायण रंगनाथ अळेकर बी. ए. एल्‌एल्. बी. ( नागपूर ) ( १२ ) रा. वासुदेव लक्ष्मण चिपळूणकर. बी. ए एल्‌एल्. बी. ( अकोला. )

# कलकत्ता येथील

# बत्तिसावी राष्ट्रीय सभा

## १९१७

## अध्यक्ष ॲनि बेझंट यांचे भाषण.

प्रतिनिधिबांधव आणि मित्रहो:—

माझ्यापूर्वी ज्यांना ज्यांना राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षपदाचा मान मिळाला होता त्यांनीं त्यांनीं हिंदी लोकांच्या अधिकारकक्षेंत असलेल्या बहुमानापैकीं हा अत्युच्च बहुमान दिल्याबद्दल योग्य शब्दांनीं आभार मानले आहेत. हा बहुमान हिंदी जनतेच्या पूर्ण प्रेमाचा, विश्वासाचा व आदराचा आदर्श आहे; शिवाय राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षाच्या खुर्चीचा मान ज्याला दिला जातो तो राष्ट्रसेवेकरितां त्या वर्षी राष्ट्राचा सर्वसंमत नेता समजला जातो. माझ्या पूर्वीच्या अध्यक्षांनीं आपली कृतज्ञता योग्य शब्दांनीं दर्शविली परंतु, त्यांच्यापेक्षां असंख्यपटीनें मजवर झालेला आपला उपकार मीं कोणत्या शब्दांनीं व्यक्त करावा! निवडणुकीच्या वेळीं जी व्यक्ति सरकारच्या तीव्र रोषास पात्र झालेली होती, व सार्वजनिक शांततेचा भंग करणारी म्हणून अटकेंत होती अशा व्यक्तीस राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षत्वाचा बहुमान देणें हा प्रसंग या सभेच्या इतिहासांत पहिलाच होय. माझी अत्यंत अवहेलना केली गेली असतांना तुम्ही हा बहुमानाचा मुकुट मजवर चढवलात, माझी अत्यंत निंदा चालली असतांना आपण माझ्या प्रामाणिकपणावर व माझ्या सदुद्देशावर विश्वास टाकलांत, सरकारी अधिकारी वर्गाच्या सत्तेच्या टांचेखालीं मीं तुडविले गेले असतांना तुम्ही आपला नेता म्हणून माझा जयजयकार केलात, ज्या वेळीं मला बोलण्याची मनाई असल्यामुळें मी माझ्या बाजूचें समर्थन करूं शकले नाहीं त्यावेळीं तुम्हीं माझी बाजू राखलींत व मला अटकेंतून सोडवून आणलेंत, आणि अगदीं साधेपणांत राहून खासगी व्यक्ति या नात्यानें आपली सेवा करण्यांत मला अभि-

मान वाटत असतां आपण मला हिंदी जनतेचें प्रतिनिधित्व देऊन आपल्यांतील अत्युच्च स्थान दिलें आहेत; या सर्व उपकाराबद्दल आपले आभार मानण्यास व आपली उतराई होण्यास मजजवळ पुरेसे शब्द व वक्तृत्व नाहीं. माझी कृति हीच माझी खरी साक्ष. कारण, माझा भाव व्यक्त करण्याची शक्ति दुबळया शब्दांत नाहीं. आपण दिलेल्या बहुमानाची पूर्ति मी मातृभूमीच्या सेवेंत करीन. मी माझ्या आयुष्याचा अवशेष राष्ट्रसेवा करण्यांतच घालवीन, एवढेंच नव्हे तर मी माझें सर्वस्व हिंदमातेच्या चरणीं अर्पण करीन. आतां आपण शब्दांनीं नव्हे तर कृतीनें ' वंदेमातरम् ' म्हणून मातृभूमीस वंदन करून प्रत्यक्ष राष्ट्रसेवा करण्यास लागूं या.

हिंदभूमींत जन्म घेण्याइतकें माझें सुदैव नव्हतें. तथापि स्वतंत्र संस्थांची जननी म्हणून नावाजलेल्या आंग्लभूमींत जन्म पावणाऱ्या मला हिंदुस्थानच्या आणी-बाणीच्या प्रसंगीं आपण अध्यक्ष निवडलें यांतहि एक मोठें कार्य साधत आहे. स्वातंत्र्याचा कल्पनेचा उदय आशियाखंडांतील आर्यांच्या जन्मभूमींतच झाला आणि पश्चिमेस वसाहतीस गेलेल्या आर्यांनीं त्यांचें बीं युरोपखंडात पेरलें. तेथें मिल्टन, क्रॉम्वेल, सिडने, बर्क, पेन, शेले, वुइल्बरफोर्स, ग्लॅडसन प्रभृतींची जन्मदात्री, मॅझिनी, कोसूथ, क्रोपॉटकिन, स्टेपनिॲक, गारिबाल्डी प्रभृतींची आदरपूर्वक आश्रयदाती, जुलमाची वैरी, झोटिंगपाच्छाईची कर्दनकाळ, आणि स्वातंत्र्याची चाहती अशा आंग्लभूमीनें अनेक संकटांतून त्या बीजाची जोपासना केली. इकडे हिंदुस्थानांतहि ईस्ट इंडिया कंपनीनें स्वातंत्र्याचें रोप खुडून टाकलें असतां त्यांतून बचावून कॉंग्रेस व मॉस्लेमलीगच्या रूपानें त्याचा वृक्ष बनला व त्यास होमरूललीगरूपी फळ लागलें, आणि आज हिंदमाता आत्मप्रत्यय व स्वाभिमान या गुणांनीं युक्त आणि स्वातंत्र्य प्राप्तीविषयीं कृतनिश्चय अशी ब्रिटानियापुढें, गुलाम म्हणून नव्हे तर मैत्रीण म्हणून, आणि सेवेस सादर म्हणून हात जोडून नव्हे तर सहकारिता करण्याला उत्सुक म्हणून, हात पुढें करून उभी आहे. अशा अपूर्व प्रसंगीं जिचा देह पाश्चात्यभूमींत जन्मलेला पण जिचा आत्मा पौर्वात्य संस्कारानीं बनलेला, जिचें पूर्व-वय इंग्लंडांत गेलें व परिणतवय हिंदुस्थानच्या सेवेस अर्पण केलें गेलें, अशा मला आपण अध्यक्षपद देणें हें हिंद व ब्रिटानिया यांच्या अंत:करणाच्या, मधुरमीलनाचें व्यक्त चिन्हच होय. ही ग्रंथि जुलमानें नव्हे तर प्रेमानें ग्रथित केली असल्यामुळें

ती अच्छेद्य आहे. परस्परांच्या प्रीतीचें व सहकारितेचें हें बंधन उभयदेशास हित-परिणामी होणार असून ईश्वरानेंहि त्यास शुभाशीर्वाद दिला आहे.

## परलोकवासी महात्मे.

हिंदुस्थानचे प्रख्यात पुढारी महर्षि दादाभाई हे आपला मानवी देह टाकून हिंदुस्थानच्या प्रगतीवर नजर ठेवून त्या कामीं साहाय्य करणाऱ्या उच्च कोटींत गेले आणि डब्लू. सी. बॉनर्जी, रानडे, ह्यूम, कॉटन, मेथा, गोखले, इत्यादि देश-भक्तांच्या यादींत दाखल झाले. स्विनबर्न कवीच्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास, हे मृतात्मे आम्हांस स्वातंत्र्य वेदिकेचा मार्ग दर्शविणारे तारेच होत. आदर व भक्ति यांनीं युक्त परंतु मोडक्या तोडक्या अशा शब्दांनीं महर्षि दादाभाईंची मी स्तुति ती कसली करणार ? त्यांचीं उदात्त कृतीच त्यांची स्तुतिस्तोत्र गात आहे व त्यांची मातृभूमिसेवा हेंच त्यांचें अक्षय्य वैभव आहे. त्यांचें अप्रतिम धैर्य व अढळ स्वदेश प्रेम यांचें जर आम्हीं अनुकरण केलें तरच आम्ही त्यांच्या विष-यींची कृतज्ञताबुद्धि प्रदर्शित केल्याप्रमाणें होईल आणि जें ‘ स्वराज्य ’ मिळालेलें ‘ याच देही याच डोळां ’ पहाण्याची त्यांची उत्कट इच्छा होती तें आम्हांस प्राप्त झालेलें परलोकांतून तरी त्यांच्या दृष्टीस पडून त्यांच्या डोळ्यांचें पारणें फिटेल.

## महायुद्धांत हिंदुस्थानची कामगिरी.

महायुद्धास प्रारंभ होऊन तीन वर्षें होऊन गेलीं. एका देशानें दुसऱ्यावर गुलामगिरीचें जोखड लादूं नये, झोटिंगपाच्छाई गाजवूं नये आणि प्रत्येक राष्ट्राचा स्वराज्याचा व स्वशक्ति विकासाचा ईश्वरदत्त हक्क अबाधित रहावा हेंच या युद्धाचें खरें उद्दिष्ट आहे. जर्मनराष्ट्र हें एकतंत्री जुलमी अमलाचें, त्युराकशीचें, अभेद्य अशा नियमांनीं बद्ध झालेल्या विशिष्ट अधिकारीवर्गाचें, साम्राज्य असून असली अनियंत्रित पद्धति चिरकाल टिकावी अशाविषयीं त्याचे प्रयत्न आहेत. ही जुलमी राज्यपद्धति म्हणजे रावणराज्यच होय. आणि न्यायाचें, समतेचें, शांततेचें, सुखाचें रामराज्य सुरू होण्याला असल्या एकतंत्री रावणराज्याचा अंत झालाच पाहिजे. याकरितां हें उद्दिष्ट साध्य होईतोपर्यंत हें युद्ध चाललेंच पाहिजे. अर्थातच तें अर्ध-वट सोडून मध्येंच तह करणें धोक्याचें आहे. एकतंत्री अमलाचा पूर्व गोलार्धांत व पश्चिम गोलार्धांतहि नायनाट झाला पाहिजे, आणि पुनश्च कधींहि त्यानें डोकें वर काढूं नये यास्तव प्रजासत्ताक राज्यपद्धतीपेक्षा एकतंत्री अमल टिकाऊपणांत व

बिनचूकपणांत, कमी दर्जाचा असून शांततेच्या काळांत व युद्धकाळांतहि तो कुच-कामाचा आहे अशी सर्वांची खात्री पटली पाहिजे आणि एकतंत्री अम्मलाचें नांव कळतांच सर्वांच्या अंगावर शहारे आले पाहिजेत.

१९१४ सालीं छोट्या राष्ट्रांच्या हक्क संरक्षणाकरितां इंग्लंडनें महायुद्धांत उडी घातली हें ऐकून हिंदुस्थान व वसाहती यांनीं तात्काळ यत्किंचितहि आढेवेढे न घेतां इंग्लंडच्या मदतीस धांवून जावयाचें ठरविलें. युद्धास तर सुरवात झाली; परंतु युद्धाची तयारी कोणाची होती ? लॉर्ड हाल्डेन यांच्या दूरदृष्टीमुळें इंग्लंडांत कांहीं स्वयंसैनिकांचीं पथकें तयार होतीं त्यांची रणभूमीवर रवानगी झाली आणि जर्मनांचीं फ्रान्सच्या काळजावर–पारीसवर– घाव घालण्याचा जो व्यूह रचला होता तो या छोट्या सैन्यानें फिसकटविला. परंतु या प्रयत्नांत त्या छोट्या सैन्याची बहुतेक आहुति पडली. इतक्यांत हिंदुस्थानचे ७० हजार वीर रणभूमीवर येऊन दाखल झाले व त्यांनीं पडती बाजू सांवरली आणि अशा रीतीनें लॉर्ड कर्झन यांच्याच शब्दांत '**हिंदी सैन्यानें दोस्तराष्ट्रांच्या व मानवी सुधारणेच्या जिवावरचें संकट टाळलें.**' अशा रीतीनें स्वतः हिंदुस्थानांत हिंदी-लोकांस स्वातंत्र्य नसतां व दडपशाहीचे कायद्यांचा ऊत आला असतां तिकडे लक्ष न देतां हिंदुस्थानानें स्वातंत्र्य युद्धांत इंग्लंडच्याच पक्षास चिकटून राहण्याचा स्तुत्य निश्चय केला. हिंदी लोकांनीं जर्मनांच्या लांच लुचपतीचा व बंड उपस्थित करण्याच्या सूचनांचा धिक्कार केला आणि महायुद्धार्थ द्रव्यद्वारा व मनुष्यद्वारा मदत केली. सुशिक्षितांनीं स्वयंसैनिक होण्याची इच्छा प्रदर्शित केली, परंतु अँग्लो–इंडियनांच्या मनांतील सतत जागृत असलेल्या बेभरंवशाच्या वृत्तीमुळें ही देणगी नाकारण्यांत आली ! असा अपमान होतांच सुशिक्षित लोक निराशेनें व खिन्नांतःकरणानें निरुत्साह झाले आणि हिंद व ब्रिटानिया यांच्या एकीकरणाची ही सोन्यासारखी संधी दुरावली.

युद्धाच्या प्रारंभापासूनच माझें असें मत मी सांगत आलें आहे कीं, युरोपांतल्याप्रमाणेंच हिंदुस्थानांतूनही ब्युरॉक्रसीचें व एकतंत्री अमलाचें उच्चाटन झाल्याखेरीज हें युद्ध संपणार नाहीं. युरोपांत जुलमी राज्यपद्धतीविरुद्ध लढावयाचें आणि हिंदुस्थानांत तसलीच पद्धति चालू ठेवावयाची असलें हें धरसोडीचें वर्तन चालणार कसें ? अशी कलकत्त्याच्या बिशप साहेबांनींहि मोठ्या धीटपणें पृच्छा केली.

त्यानंतर आतां सरकारनें स्पष्टपणें व निश्चितपणें स्वराज्यदान हेंच आमचें उद्दिष्ट आहे असें जाहीर केलें आहे आणि त्याचा बराच मोठा भाग पहिला हप्ता म्हणून देण्यांत यावयाचा आहे. लखनौच्या कॉंग्रेसनें पास केलेला स्वराज्याचा पहिला हप्ता ब्रिटिश सरकारनें आम्हांस देऊन आपलें हें वचन पाळलें म्हणजे महायुद्धाची परिसमाप्तीची वेळ दृष्टिपथांत येऊं लागेल. कारण बेजबाबदार राज्यपद्धतीचें बारा वाजल्याखेरीज प्रस्तुतच्या महायुद्धाची अखेर होणार नाहीं.

## लष्करी खर्चाची बेसुमार वाढ.

या महायुद्धांत हिंदुस्थानानें जादा खर्चाचा बोजा आपल्या शिरावर घेतला यांत कांहीं नवल नाहीं. कंपनीकडून ब्रिटिश सरकारनें हिंदुस्थानचा राज्यकारभार आपल्या हातीं घेतल्यापासून हिंदुस्थान हें एक साम्राज्यवादी इंग्लंडचें लष्करी आधारस्थान व लष्करी शाळागृह झालें आहे. १८५९ सालीं या देशास न विचारतां व त्याच्या हिताविरुद्ध येथील गोरें सैन्य इंग्लंडांतील गोऱ्या सैन्याशीं जोडून एक करण्याची योजना झाल्यापासून ईस्ट इंडिया कंपनीच्या मतसरी स्वभावामुळें जी आपत्ति टळली होती ती ओढवली आणि सरहद्दी पलीकडच्या ज्या युद्धाशीं केवळ साम्राज्यहिताचा संबंध असून हिंदुस्थानचा बिलकुल संबंध नव्हता अशा स्वाऱ्यांचा व युद्धांचा बोजा या देशावर पडूं लागला. १८५९ ते १९०४ या ४५ वर्षांत लहानमोठ्या मिळून ३७ मोहिमा झाल्या. या सर्वांचा संबंध साम्राज्याकडे असून त्यांच्या खर्चाचा बोजा हिंदुस्थानावर पडूं नये म्हणून हिंदुस्थान सरकारनेंच तक्रार केलेली आहे. तथापि त्या सगळ्या स्वाऱ्यांचा खर्च याच देशावर लादण्यांत आला. या स्वाऱ्या जर हिंदुस्थानच्या हितासाठीं या देशानेंच अंगिकारिल्या असत्या व त्यापासून या देशाचाच फायदा झाला असता तर खर्चाचा बोजा ही कांहीं मोठीशी बाब नव्हती. परंतु इंग्लंडनें इकडे हत्यारांचा कायदा करून लोकांना दुबळे बनविलें, कांहीं जाती क्षात्रकर्माला नालायक ठरवून त्यांच्या पलटणी कमी केल्या, कांहीं जाती विशेष कडव्या असल्यामुळें त्यांनाहि कोणत्या तरी सबबीवर चाट मिळाला एवंच बंगाली, मद्रासी, मराठे इत्यादि शिपायांचा भरणा कमी कमी करीत जाऊन लष्कर भरतीचा सगळा भर वायव्यसरहद्दीवरील प्रांतावर टाकला. यामुळेंच परवा सर मायकेल ओडायर यास पंजाबचें स्तुतिस्तोत्र गातां आलें.

सरकारच्या या अविश्वासामुळें बंगाल वगैरे प्रांतांतून क्षात्रवृत्तीचा लोप होत चालला होता. परंतु कर्झनसाहेबांनीं वंगभंग करून बंगाली लोकांचा असह्य उपमर्द केल्यामुळें बंगाली लोकांत क्षात्रवृत्तीचें पुनरुज्जीवन झालें. आणि करड्या व बेजवाबदार ब्युरॉक्रसीच्या जुलमाला बंगाली तरुणांनीं ज्या रीतीनें तोंड दिलें ती कृति पाहून आर्यमाता आश्चर्यचकित व आनंदित झाली. बंगाली लोकांनीं हिंद-भूमीवर हा मोठाच उपकार केला व त्याबद्दल आम्ही कृतज्ञ असलें पाहिजे. बंगाली तरुणांत संचार करूं लागलेल्या तेजाचा ' स्वदेशी व बहिष्कार ' या रूपानें जोंपर्यंत आविर्भाव होत होता तोंपर्यंत त्यांस त्यांच्या वडिल मंडळींचेंहि पाठबळ होतें परंतु माझिनीच्या वेळच्या तरुण इतालींत अथवा स्टेपनिॲक व क्रोपॉटकिन यांच्या वेळच्या तरुण रशियांत घडल्याप्रमाणें हें नवें वीर्य कायदेशीर बंधनें तोडून कट, खून, दरवडे या मार्गांनें प्रकट होऊं लागलें; त्यावेळीं त्याचा स्वाभाविक परिणाम काळेपाणी व फांशी यांत होऊं लागला. तथापि या झग-ड्यांत तरुण बंगाल्याच्या अंगांत जी चिकाटी व जो काटकपणा उद्भूत झाला त्याचे सुपरिणाम दुष्काळपीडितांस मदत पोंचविणें व महापुराच्या वेळीं जिवावरचें धाडस करून बुडत्यास हात देणें व त्यांना अन्नवस्त्र पुरविणें या सत्कार्यांत दृग्गोचर झाले. प्रस्तुतच्या युद्धांत ॲम्ब्युलन्स कोरची व्यवस्था, तरतूद व त्याची मेसापोटेमियांतील कामगिरी, ९०० जवानांची नवी पलटण उभारणें व तिच्यांतील संख्याबल कायम राखण्याकरितां आणखी ९०० लोकांची शिलकी पलटण तयार ठेवणें इत्यादि मार्गांनींहि हें नवें तेज चमकूं लागलेलें पाहून वाईटांतून चांगलें उत्पन्न करण्याच्या सृष्टिदेवतेच्या अद्भुत किमयेचा चमत्कार वाटतो. युद्धापूर्वी जे लोक बदमाष म्हणून तुरुंगांत होते त्यांना सैन्यांत धाडल्यावर त्यांनीं अद्भुत पराक्रम करून ' व्हिक्टोरिया क्रॉस ' मिळविल्याचीं उदाहरणें इंग्लंडांत दृष्टोत्पत्तीस आलीं आहेत. तसाच अनुभव येथेंहि घेण्यास कांय हरकत आहे ? तुरुंगांत खितपत पडलेल्या व संशयावरून अटकेंत ठेवलेल्या शेंकडों तरुण राजकीय कैद्यांची एक स्वतंत्र पलटण करून, जरूर तर तिजवर जास्त कडक निर्बंध ठेवून, ती जर रणांगणावर रवाना केली व या तरुणांना आपली अब्रू साफ करण्यास संधि दिली तर बरें होणार नाहीं काय ?

ऐ.ग्रं. २-४८



असो; आपण आपल्या पूर्वींच्या लष्करी खर्चाच्या वाढीच्या प्रश्नाकडे वळूं. १८५९ सालीं हिंदुस्थानांतलें ब्रिटिश सैन्य इंग्लंडातील सैन्याशीं जोडलें गेल्यानें हिंदुस्थानही गोऱ्या सोलजरांच्या शिक्षणाची शाळा बनली. या पद्धतीमुळें येथील लष्करी खर्च मात्र वाढला. परंतु सैन्याचें सामर्थ्य वाढलें नाहीं. कारण गोऱ्या सोल्जरांच्या येथच्या नोकरीची मुदत कमी केल्यानें अनुभविक, कसलेलें, तरबेज झालेलें सैन्य इंग्लंडांस जावें व येथें नवशिक्या तरुणांचा भरणा व्हावा व या उभयतांचा जाण्यायेण्याचा सर्व खर्च दुबार होऊन तो हिंदुस्थानच्या माथ्यावर लादला जावा असा प्रकार सुरु झाला. याचा परिणाम असा झाला कीं, १८५६ सालीं कंपनीच्या हुकमतींत २५४००० सैन्य असून त्याचा खर्च ११३ कोटि रुपये होता. तोच १८८४ सालीं १८१००० सैनिकांना १७ कोटि रुपये खर्च लागूं लागला, आणि हल्लीं तर हा खर्च ३३ कोटिपर्यंत वाढला आहे. १८८५ सालापासून वाढत्या लष्करी खर्चाविरुद्ध कॉंग्रेसची ओरड सुरु आहे आणि इकडे खर्चाची वाढ बेपर्वाईनें चालूंच आहे. १९०२ सालीं ब्रिटिश सैन्याचा पगार वाढविल्यानें सालिना एक कोटीचा खर्च कायमचा वाढला. नंतर किचनेरसाहेबांची सैन्याच्या पुनर्घटनेची योजना पुढें आली व तिनें १५ कोटि रुपये खाल्ले ! निकलसन कमिटीनें लष्करी खर्चाची अंतिम मर्यादा वार्षिक २९ कोटि रुपये ठरविली पण गेल्या १३ वर्षांपैकीं ११ वर्षांत ही मर्यादा उल्लंघिली गेली आहे.

ही नित्याच्या खर्चाच्या वाढीची कथा झाली. आतां या महायुद्धामुळें झालेल्या नैमित्तिक खर्चाचा हिशेब पाहूं. महायुद्धांत हिंदुस्थानानें जी लष्करी कुमक केली तिचें वर्णन लॉर्ड चेल्म्सफर्ड यांनींच ता. ५ सप्टेंबरच्या आपल्या कौन्सिलांतील भाषणांत केलें आहे तें असें. युद्धाचें शिंग फुंकलें जातांच कामावर असलेले ४५९८ आणि इंग्लंडांत रजेवर असलेले ५३० गोरे अम्मलदार युद्धखात्याकडे देण्यांत आले. त्याखेरीज हिंदुस्थानांतून निरनिराळ्या खात्यांतून २६०० अधिकारी काढून त्यांची रणभूमीवर रवानगी करण्यांत आली. शिवाय हिंदुस्थानांतील घोडदळाची संख्या शेंकडा २० नीं व पायदळाची शेंकडा ४० नीं वाढविण्यांत आली. हिंदुस्थानचें जें सैन्य फ्रेंच रणभूमीवर रवाना झालें तें अर्धे कच्चें व बिन तयारीचें नसून चांगलें कसलेले व शस्त्रास्त्रांनीं पूर्ण सज्ज असें

होतें. आणि म्हणूनच ऐन वेळीं त्याचा उत्कृष्ट परिणाम झाला. लष्करीलोकां खेरीज ६० हजार कारागीर व मजूर मेसापोटेमियांत व २० हजार फ्रान्स देशांत गेले आहेत. ५०० नव्या डॉक्टरांची लष्करांत भरती करण्यांत आली; आणि हिंदुस्थानांत साध्या दवाखान्यावर काम करीत असणारे बहुतेक सर्व लष्करी डॉक्टर काढून घेऊन त्यांच्या जागीं हिंदी डॉक्टरांची नेमणूक करण्यांत आली. लष्करी अम्मलदारांची भरती करण्याकरितां ४० अम्मलदार नेहमीं शिल्लक ठेवण्यांत येतात. ती संख्या आतां ३००० करण्यांत आली आहे. या सर्व घडामोडींत खर्चाची किती वाढ झाली याचा विचार करा. चालू सालच्या बजेटांत युद्धकर्जाची भरती १५ कोटि होईल व ती रकम जादा खर्चास पुरेल असें वाटलें होतें. परंतु युद्ध कर्जाची रकम ४८ कोटीवर जाऊन देखील आमच्या खर्चाची तारांबळ कायमच आहे!

वरील हकीकतीवरून दोन प्रश्न चटकन पुढें उभे राहतात. ज्या हिंदुस्थानानें साम्राज्याला असें साहाय्य केलें त्यास साम्राज्यांतल्या इतर भागासारखें हक्क देखील नकोत काय? आणि साम्राज्य संरक्षणार्थ या देशानें नेहमीं सज्ज असावें व दिवसेंदिवस वाढती मदत करून साम्राज्य सुरक्षित राखावें याकरितां या देशास 'स्वराज्य' द्यावयास नको काय? आज जी कुमक हिंदुस्थानानें केली तितकी तयारी युद्धापूर्वींच जय्यत राखण्यांत आली असती तर हें युद्धच उपस्थित झालें नसतें; कारण मग साम्राज्याकडे वांकड्या नजरेनें पाहण्याची कोणाची छाति झाली असती? परंतु परतंत्र देशाकडून योग्य मदत होऊं शकत नाहीं. परतंत्र हिंदुस्थानाला मोठें खडें सैन्य ठेवितां येत नाहीं. कारण हल्लींच्या राज्यपद्धतीप्रमाणें ज्या गोऱ्या शिपायांचा त्यास पांच वर्षेंच उपयोग होतो त्यांच्या शिक्षणाकरितां व भाड्याकरितां क्रोडो रुपये तो कोठून खर्चणार? हल्लींच्या पद्धतीनें त्यास आपला सोन्याचा गंगाजळी ठेवा इंग्लंडजवळ ठेवावा लागून स्वतः नाण्याची टंचाई सोसावी लागते, आजच्या जमाखर्ची पद्धतीमुळें हिंदुस्थानांतून जबर कर वसूल करून सांठविलेली ३०।४० कोटि रुपये शिल्लक इंग्लंडांत व्याजीं लावून ठेवण्यांत येतें. अशा स्थितींत येथला जादा युद्धखर्च त्यास कसा भागवितां येईल? सारांश अशा प्रकारें परावलंबी राष्ट्राकडून खरें साहाय्य होणें अशक्य असल्यामुळें '**हिंदुस्थानाची राजनिष्ठा उपयोगी पड-**

ण्यास त्यास स्वातंत्र्य द्या ' असेंच मी सांगत आलें आहे. भारतमंत्री मि० मॉटेग्यु यांनींहि ' युद्धाकरितां राष्ट्र सज्ज राहण्याला शांततेच्या वेळीं त्यास स्वातंत्र्य पाहिजे ' असेच शहाणपणाचे उद्गार काढिले आहेत. सारांश हिंदुस्थानास स्वराज्य देण्यांत ग्रेटब्रिटन व हिंदुस्थान या उभय राष्ट्रांचेंहि कल्याण आहे.

गेल्या दहा बारा वर्षांत हिंदुस्थानांत ' नवें तेज ' चमकूं लागलें आहे. याच्या मुळाशीं इंग्लिश शिक्षण, परदेशप्रवास, जपान व अमेरिका यांच्याशीं विशेष संघट्टण इत्यादि सामान्य कारणें तर आहेतच. पण त्याशिवाय ६ विशिष्ट कारणांचा हा परिणाम होय. तीं कारणें म्हणजे ( १ ) आशियाखंडांतील जागृति. ( २ ) परकी अमलाचे दुष्परिणाम व साम्राज्य संघटनेची वाटाघाट. ( ३ ) युरोपियनांच्या श्रेष्ठत्वाविषयींचा भ्रमनिरास. ( ४ ) हिंदी व्यापाऱ्यांच्या डोळ्यावरची झांपड निघणें. ( ५ ) प्राचीन काळचा आपला दर्जा प्राप्त करून घेण्याविषयीं स्त्रियांची उत्सुकता आणि ( ६ ) खालच्या वर्गांतील विचार जागृति हीं होत. यांचा क्रमशः विचार करूं,

## ( १ ) आशियाखंडांतील जागृति.

लॉर्ड मिंटो हे व्हाइसरॉय होऊन हिंदुस्थानांत आल्यावर या देशांतील ' असंतोषा ' विषयीं चर्चा चालू असतां ते म्हणाले कीं, इंग्लिश शिक्षण, इंग्लिश-लोकसत्ताक ध्येयाची चर्चा, जपाननें रशियावर मिळविलेला विजय आणि जगांतील इतर घडामोडी हीं सर्व कारणें या ' असंतोषा ' च्या बुडाशीं आहेत. सांप्रत सगळ्याच प्राच्य राष्ट्रांना चलन मिळालें असून त्याबरोबरच हिंदी-लोकांच्या मनांत नव्या उच्च आकांक्षा उद्भवत आहेत आणि हिंदी लोकांना त्यांच्या राज्यकारभारांत अधिकाधिक वांटा देऊन योग्य प्रमाणांत त्या आकांक्षा पूर्ण करणें अवश्यच आहे. ' लार्ड मिंटो यांची ही मीमांसा यथार्थ असली तरी आशियाखंडाची जागृति हीहि जगांतील राजकीय स्थित्यंतराचाच एक भाग असून लोकायत्त सत्तेकडे जग झुकत चाललें आहे त्याचाच हा परिणाम होय, हें मान्य केलें पाहिजे. अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांनीं १७७६ सालीं आपलें स्वातंत्र्य जाहीर करून लोकायत्त सत्तेचा झेंडा उभारला त्याचा परिणाम फ्रेंच राज्यक्रांति होय. इकडे आशियांखंडांत जपानचा उदय, इटाल्याची प्रगति

व त्यानें रशियावर मिळविलेला मोठा विजय; मांचू घराण्यांतील बादशाहीचा मनोरा ढासळून त्याच्या जागीं लोकायत्त सभेची स्थापना, इराणी लोकांची राज्यपद्धति सुधारण्याची धडपड व तीस रशिया व इंग्लंड यांचा अडथळा आणि अखेरीस रशियाच्या झारशाहीचा डोलारा गडगडून त्याच्या जागीं लोकसत्ताक राज्यपद्धतीची स्थापना या सर्व अधिकारक्रान्त्यामुळें हिंदुस्थानची परिस्थिति पार बदलून गेली आहे. आपल्या सरहद्दीच्या पलीकडे हिंदी लोकांना आतां झारशाही किंवा मांचूशाही यांचा जुलूम दृष्टीस न पडतां लोकायत्त सत्ता नजरेस येते व हिंदी लोक स्वतःच्या स्थितीची रशियन अगर चीनी प्रजेशीं तुलना करूं लागतात. निदान १९०५ सालापर्यंत तरी ही तुलना ब्रिटिश राज्यपद्धतीला अनुकूल अशी होती. परंतु त्यानंतर हिंदुस्थानांत दडपशाही सुरू झाली आणि तिकडे हद्दीबाहेर स्वातंत्र्याचें वारें खेळूं लागलें. अर्थातच यापुढें हिंदुस्थानाला स्वराज्य न मिळेल तर हिंदी लोक रशियन चीनी प्रजेकडे मत्सरपूर्ण नजरेनें पाहूं लागतील व त्या योगें त्यांची असंतुष्टता वळावेल.

समजा हिंदुस्थानास होमरूलचे हक्क मिळाले तरी तेवढ्यानें कार्यभाग आटोपत नाहीं. हिंदुस्थान ही सुवर्णभूमि आहे किंवा कामधेनु आहे म्हणून हिच्यावर परकी राष्ट्रांचा डोळा असणारच, यास्तव तिला स्वसंरक्षण करितां येईल, इतकी ताकद तिच्या अंगीं आली पाहिजे. आशियाखंडाच्या, पासिफिक महासागराच्या व आस्ट्रेलियाच्या प्रभुत्वासाठीं पुढें मागें झगडा होणारच. शिवाय आजच जपान देश हिंदुस्थानचा व्यापार व उद्योगधंदे रसातळास पोंचवूं पहात आहे. या सर्व परिस्थितीचा विचार करितां हिंदुस्थानदेश नुसता स्वराज्यभुक् होऊनच भागत नाहीं तर तो संतुष्ट, प्रबळ, सशस्त्र, स्वावलंबी व युद्धास सज्ज असा होऊन केवळ स्वतःचेंच नव्हे तर अल्पवस्तीच्या अतएव असंरक्षित अशा आस्ट्रेलियाच्या अफाट किनाऱ्याचेंहि संरक्षण करण्यास पात्र असा बनला पाहिजे. ब्रिटिश साम्राज्याच्या पूर्वार्धाचें रक्षण करण्याइतकें मनुष्यबळ हिंदुस्थानच पुरवूं शकेल. परंतु ब्रिटिश साम्राज्याखालीं त्यास स्वराज्य देऊन त्याची शक्ति संवर्धित करण्याची तरतूद न करणाऱ्या ब्रिटिशांच्या अदूर दृष्टीस काय नांव ठेवावें? हिंदुस्थानांतील अँग्लोइंडियन्स आपल्या हितसंबंधाचें तुणतुणें वरचेवर वाजवीत असतात. पण मला असा अचंबा वाटतो कीं,

साम्राज्यावर प्रसंग गुदरला तर हे मुठभर लोक काय मदत करूं शकतील ? हिंदुस्थानास स्वराज्य प्राप्त होऊन तें प्रबळ झालें तरच या अँग्लोइंडियनांचा बचाव होईल. जपानी वृत्तपत्रें वाचणाऱ्यांस ही गोष्ट कांहीं सांगावयास नको कीं, सध्यां महायुद्धाच्या वेळीं देखील जपानचा कल जर्मनीकडे आहे व त्याचें उघड उघड प्रदर्शन करण्यास देखील तें कचरत नाहीं. मग युद्धसमाप्तीनंतर या दोन महत्त्वाकांक्षी व युयुत्सु राष्ट्रांचें संगनमत होणें किती साहजिक आहे ! या युद्धांत जपानच्या सैन्याची व आरमाराची खराबी बिलकुल झालेली नाहीं आणि त्याच्या व्यापाराची तर अवाढव्य वाढ होऊन त्यास बेसुमार संपत्ति प्राप्त झाली आहे. हें लक्षांत घेऊन यापुढे तरी ब्रिटिश मुत्सद्यांनीं समंजस मुत्सद्दिगिरीनें जपानपेक्षां हिंदुस्थानावर अधिक विश्वास ठेवावा; पुढेंमागें प्रतिस्पर्धी बनूं शकणाऱ्या जपानच्या सख्यत्वाच्या वाळूच्या पायापेक्षां, स्वतंत्र संतुष्ट अशा हिंदुस्थानच्या राजनिष्ठेच्या दगडीपायावर ब्रिटिश साम्राज्यमंदीर अधिक टिकाव धरूं शकेल. हिंदुस्थान ही एक आपल्या पदरची कामधेनु आहे व तिच्या आचळांतून आपण लागेल तितकें दूध ओढून काढूं शकूं, या कल्पनेला ब्रिटिशांनीं अजीबात फांटा दिला पाहिजे आणि हिंदुस्थानाला इंग्लंडनें आपल्या बरोबरीनें मित्रत्वानें वागविलें पाहिजे व तोही एक ब्रिटिश साम्राज्याचा स्वयंशासित घटक बनविला पाहिजे. जपान, चीन, रशिया इत्यादि देशांतील लोकायत्त सत्तेच्या चळवळींचें प्रतिबिंब हिंदुस्थानावरही पडत आहे व त्याचा हिंदी लोकांच्या मनोभूमीवर कांहींच परिणाम होणार नाहीं असें मानणें मूर्खपणाचें आहे.

## ( २ ) परकी अमलाचे दुष्परिणाम आणि साम्राज्यसंघटना.

सर्व राष्ट्रांना स्वतंत्र्याचा उपयोग घेतां यावा या सदिच्छेनेंच ब्रिटिश राष्ट्र या महायुद्धांत पडलें असें हिंदुस्थानास प्रथम अंतःकरणपूर्वक वाटत होतें. नुकत्याच गेल्या आक्टोबरांत केलेल्या भाषणांत ॲस्क्विथ साहेब म्हणाले कीं, आम्ही केवळ स्वातंत्र्याकरितांच लढत आहों आणि स्वातंत्र्यापेक्षां कोणत्याही कमी दर्जाच्या गोष्टीनें आमचें समाधान होणार नाहीं ! याच भाषणांत अल्सेस-लोरेन प्रांत फ्रान्सला परत मिळवून देण्याला इंग्लंड साहाय्य करील असें सांगतांना त्यांनीं असें उद्गार काढले कीं, परकी अमल म्हणजे असह्य मानखंडना होय. आल्सेस-लोरेनमध्यें सत्ताधारी व प्रजा उभयता समानधर्माचे व समानवर्णाचे असून जर एकाची सत्ता

दुसऱ्यास ‘ असह्य मानखंडना ’ वाटते तर जेथें राज्यकर्ते व प्रजा यांच्यामध्यें धर्माची, वर्णाची, संस्कृतीची कशाचीही साम्यता नाहीं तेथील प्रजेस काय वाटत असेल बरें ? परंतु परकी सत्तेची साह्यता गौरकायांनाच तेवढी लागू आहे वाटतें ! कारण हिंदुस्थानाखेरीज इतर सर्वांना स्वातंत्र्याचें अभिवचन देण्यांत येत आहे; आणि हिंदुस्थानाविषयीं म्हणाल तर वसाहतींना नवा अधिकार देण्यांत येणार असून त्यांत हिंदुस्थानचें मात्र नांव नाहीं. वसाहती व ग्रेट ब्रिटन मिळून पांच घटकांचें साम्राज्य व्हावयाचें अशी भाषा होऊं लागली आणि हिंदुस्थानाची गणना आफ्रिकन जातीबरोबर होऊन त्याजवर कायमचा गुलामगिरीचा शिक्का बसण्याची पाळी आली !

वेळ मोठी आणीबाणीची होती. संकट ‘ आ ’ करून पुढें उभें होतें. साम्राज्याची नूतन संघटना करण्याची तयारी चालली होती; वसाहती या तर भागीदार म्हणून केव्हांच पुकारा झाला; परंतु हिंदुस्थानची वाट काय याविषयीं कोणीच तोंडांतून ब्र काढीना, तिकडे बोनरलॉ वसाहतींना उपदेश करूं लागले कीं, तापल्या तव्यावर पोळी भाजून घ्या ! मग हिंदुस्थाननें काय तवा निवाल्यावर त्यावर पोळी टाकावयाची ? हिंदुस्थानचे वीर, फ्लँडर्स, फ्रान्स, गॅलिपोली, आशियामायनर, चीन, इजिप्त, पूर्वआफ्रिका इत्यादि देशांत दुसऱ्याच्या स्वातंत्र्याकरितां लढत आहेत ! आणि त्यांच्या स्वतःच्या मायभूमीच्या स्वातंत्र्याची वार्ता देखील नाहीं ! अखेरीस हा मानभंग असह्य होऊन हिंदुस्थानांत जागृतीचा संचार झाला आणि एक महात्मा, हिंदपुत्र, आर्यवीर गंभीर वाणीनें बोलला कीं, ‘ **स्वराज्य हा माझा जन्म-सिद्ध हक्क आहे व तो मला मिळालाच पाहिजे.** ’ या गुरुपदेशानें ‘ होमरूल ’–‘ स्वराज्य ’ हा महामंत्र हिंदी लोकांना मिळाला आणि साम्राज्य घटनेंत हिंदभूमीला आपली योग्य जागा मिळाली पाहिजे अशी मागणी पुढें आली. हिंदभूमि आपल्या पुत्रांचें रक्त व द्रव्य महायुद्धांत खर्चीत असतां तिला अशी भीति उद्भवली होती कीं, मी स्वतःच्या घरच्या व्यवस्थेविषयीं जर अवाक्षर काढणार नाहीं तर माझा आहे या स्वातंत्र्याचा देखील लोप होईल. अशी भीति प्रचलित झाली असतां साम्राज्य परिषदेंत हिंदुस्थानचे प्रतिनिधि घेण्याचें ठरलें हें यथोचित झालें, परंतु वसाहतींनीं आपापले जबाबदार मंत्री प्रतिनिधि म्हणून धाडले असतां हिंदुस्थानच्या वतीनें मात्र लोकनियुक्त प्रतिनिधि न जातां अनियं-

त्रित सत्ताधाऱ्यांनींच त्यांची निवड केली. ज्या प्रतिनिधींची निवड झाली ते व्यक्तिशः आम्हांस अमान्य नव्हते; परंतु त्यांच्या निवडणुकींत लोकपक्षाला अंशतः किंवा अप्रत्यक्षपणेंहि आपलें मत दर्शविण्यास वाव मिळाला नाहीं. हिंदी प्रतिनिधि साम्राज्यपरिषदेंत आसनस्थ झाले ही गोष्ट मन्वंतरदर्शक झाली असें मानण्यांत येतें. परंतु ते प्रतिनिधि हिंदी प्रजेचे नव्हत तर हिंदुस्थानसरकारचे प्रतिनिधि होतें, ही गोष्ट विसरतां कामा नये. तथापि त्या प्रतिनिधींनीं आपली कामगिरी बरीच चोख बजावली कारण ते तसेच अनुभाविक मुत्सद्दी होते. सवलतीच्या जकाती आणि मुदतबंदी मजुरी या दोन प्रश्नांच्या तडजोडींत मात्र ते जरा घसरले असें म्हटलें पाहिजे.

साम्राज्याची नवी संघटना करण्याच्या प्रश्नापूर्वी, हिंदी लोकांना राज्यकारभारांतील वांटा अधिकाधिक देण्याच्या प्रश्नाचा विचार करण्याकरितां ' पब्लिक सर्व्हिस कमिशन ' नेमिलें होतें. त्यांत तिघेच हिंदी सभासद होते आणि दुर्दैवानें रिपोर्ट लिहिण्यापूर्वींच ना. गोखले हे स्वर्गवासी झाले. बाकी दोघां हिंदी सभासदांपैकीं न्या. अबदुलरहिम यांनीं स्वतंत्र मतभेदपत्रिका लिहून उत्कृष्ट कामगिरी बजाविली आहे. ना. चौबळ यांनीं जरी तितकी स्वतंत्रबुद्धि दाखविली नाहीं तरी पण ठिकठिकाणीं त्यांनीं आपला मतभेद नमूद करून ठेवण्यास कमी केलें नाहीं. असो. जुन्या मन्वंतरांतल्या या कमिशनचा या नव्या मन्वंतरांत विचार देखील करण्याचें कारण नाहीं. तरीपण या कमिशननें सिव्हिल सर्व्हिस व पोलीस या खात्यांतून ३० वर्षांच्या अवधीनंतर शेंकडा २५ जागा हिंदी लोकांना मिळाव्या अशी शिफारस केल्याचें पाहून तीव्र निराशा होते व संताप येतो.

अशा एकंदर कारण समुच्चयामुळें आर्यमातेला आपला पुढील मार्ग सतत दास्यपंकाचा दिसत होता. ब्रिटनमध्यें ब्रिटिशांचा अमल, फ्रान्समध्यें फ्रेंचांचा, अमेरिकेंत अमेरिकनांचा अमल असणें हें सर्वांस सयुक्तिक वाटतें. परंतु हिंदुस्थानांत हिंदी लोकांची सत्ता तर दूरच राहिली पण हिंदुस्थानचा कारभार हिंदी लोकांच्या हिताकडे दृष्टि ठेवून चालवा असें म्हटलें तरी तो राजद्रोह होतो ! हिंदुस्थान हे ब्रिटिश साम्राज्याकरितां एवढेंच नव्हे तर स्वतःखेरीज साम्राज्याच्या बाकीच्या सर्व भागाकरितां होय असें मानावयाचें काय ? हिंदी लोकांनीं सदोदितच मिंधेपणांत व दास्यांत रहावें काय ? आणि साम्राज्यांतील नागरिकाचे कोहींच

हक्क नसतां साम्राज्याचा अभिमान मात्र त्यानें बाळगावा काय ? अशा रीतीनें ग्रेटब्रिटन व हिंदुस्थान यांच्यामध्यें परस्पराच्या हक्काविषयींचा व कर्तव्याविषयींचा वाद विकोपास गेला असतां मि. मॉंटेग्यु यांची भारत मंत्र्याच्या जागीं नेमणूक झाली; आणि व्हाइसरॉयांनीं त्यास येथें निमंत्रण केलें असून हिंदुस्थानाला पाहिजे आहे तरी काय हें जाणण्याच्या इच्छेनें ते येथें येण्याचें ठरलें. काळ्याकुट्ट ढगांतून हें आशारूपी किरण बाहेर पडलें ! ग्रेटब्रिटनविषयींचा विश्वास पुनरुज्जीवित झाला, आणि मॉंटेग्युसाहेबांच्या आदरसत्काराची सर्वत्र तयारी चालली. सरकारचें जसें धोरण बदललें तसें लोकांचेंहि वर्तन बदललें. परंतु त्यामुळें 'होमरूल' संपादन करण्याचा निश्चय तिळमात्र कमी झाला असें मात्र कोणी समजूं नये, तहाची वाटाघाट करावयास आर्यदेश तयार आहे, पण तो तह 'मानाचा' पाहिजे आणि राष्ट्राच्या बावतींत मान म्हणजे स्वायत्तता, हें स्वायत्त स्वराज्य जर न मिळेल तर फिरून पूर्वीच्यापेक्षांहि अधिक जोराची चळवळ सुरू होईल.

## ( ३ ) पाश्चात्यांच्या श्रेष्ठत्वाविषयींचा भ्रमनिरास.

पाश्चात्य लोक सर्व कामांत सर्व तऱ्हेनें पौर्वात्यांपेक्षां श्रेष्ठ आहेत असली एक खुळचट कल्पना मध्यंतरी पसरली होती. परंतु आतां तो भ्रमनिरास होत आहे. आर्यसमाजाची व थिऑसफीची स्थापना झाल्यावेळेपासून हा भ्रमाचा भोपळा फुटूं लागला. या दोन्ही संस्थांनीं हिंदी लोकांना स्वतःच्या संस्कृताची अमोलिकता, भूतकालाविषयीं अभिमान, वर्तमानकालाविषयीं स्वाभिमान आणि भविष्यकाला-विषयीं आत्मप्रत्यय शिकविला. पाश्चात्यांचें अंधानुकरण करण्याच्या प्रवृत्तीला त्यांनीं गचांडी दिली आणि पाश्चात्य विचार व संस्कृती यांमधील निवडक भाग तेवढाच वेंचून घेण्याइतका सारासार विचार शिकविला. याच कार्यास बंगालमधून स्वामी विवेकानंदाच्या उपदेशानें दुजोरा मिळाला. स्वामीजींनीं पाश्चात्यांच्या भौतिक सुधारणेवर कडक कोरडे ओडले. उदाहरणार्थ पुढील मासला पहा—

" हल्लींच्या काळांत लक्ष्मीच्या आराधनेचें जें बंड माजलें आहे त्याच्या योगानें आधुनिक समाज भौतिक श्रेष्ठत्वाच्या भयंकर गर्तेकडे जोरानें ढकलला जात आहे. या गर्तेत पडण्यापासून व पडण्यापूर्वी आम्हांस वांचवा असा प्रत्येक सुधारलेल्या देशांत लक्षावधि लोक टाहो फोडीत आहे. यांस वाचविण्याचें सामर्थ्य जर कोणाच्या अंगीं असेल तर तें एकट्या खऱ्या वेदान्तशास्त्राच्या अंगीं आहे !

खऱ्या वेदान्ताच्या ज्ञानानेंच त्यांच्या सामाजिक आकांक्षा पवित्र व शांत होऊं शकतील. " असो. राजकीय दृष्ट्या ह्या पाश्चात्यांच्या श्रेष्ठत्वाच्या भ्रमाचा भोपळा फोडण्याचें कार्य जपाननें केलें. जेव्हां टीचभर जपाननें रशियासारख्या प्रचंड हत्तीशीं झुंज आरंभिली आणि त्यास ची ची करावयास लाविलें त्या वेळीं भुंग्यानें पोखरल्याप्रमाणें पोकळ झालेली पाश्चात्य समाजाची दुर्बलावस्था आणि जपानी लोकांची देशप्रीति, आत्मयज्ञ, सोशिकपणा, काटकपणा व नैसर्गिक जोमदारपणा यांतील तफावत जगाच्या नजरेस आली.

जर्मनांच्या कुटिल राजनीतीनें व त्यांच्या अमानुष अत्याचारांनीं पाश्चात्यांच्या श्रेष्ठत्वास शेवटचा धक्का दिला. बिस्मार्कची शिकवण आणि तिचा बेल्जम, फ्रान्स, पोलंड, सर्व्हिया इत्यादि देशांवर घडलेला घोर परिणाम यांच्या योगानें तर ख्रिस्ती-धर्माविषयीं एशियाटिक लोकांना जो एक आब वाटत होता तोही नाहींसा झाला. जिची इतकी वढाई मारली जाते ती सुधारणा म्हणजे नुसती बाह्य तकाकी आहे आणि त्यांचा धर्म म्हणजे कांहीं तरी निर्जीव बडबड आहे असें वाटूं लागलें. युद्धांत गतप्राण झालेल्यांचे व घायाळांचे ढीग पाहून व पाश्चात्यांनीं आपल्या ज्ञानाचा जीवांचा नाश करण्यात कसा सैतानी दुरुपयोग चालविला आहे तें लक्षांत येऊन एशियाटिक राष्ट्रांना जर आमचाच धर्म आणि आमचीच संस्कृति एकंदरींत श्रेष्ठ असें वाटूं लागलें तर त्यांत त्यांचा काय दोष बरें ?

स्वातंत्र्य, देशाभिमान, स्वराज्याचा हक्क इत्यादि ध्येयाविषयीं प्रमुख पाश्चात्य राष्ट्रें जी कानठळ्या बसण्याजोगी बडबड करीत असतात तिच्यांत तरी खरा जीव किती आहे याविषयींची आलेली शंका युद्धाव्यतिरिक्त अन्य कारणांनींही अधिकच बद्धफल झालेली आहे. कांहीं दिवसांपूर्वीं सर जेम्स मेस्टन बोलले कीं, ‘ हल्लीं हिंदी लोक जितके संशयी व शंकेखोर झाले आहेत तसे ते यापूर्वीं झालेले कधींही मला आठवत नाहीं. ’ आणि वस्तुस्थिति खरोखरीच तशी आहे. आज कित्येक वर्षें हिंदी लोकांना आश्वासनें व वचनें देण्याचा व तीं मोडण्याचा सपाटा सुरूं असल्यानें त्यांना आधींच चेव येऊन राहिला होता. त्यांत १९०५ सालापासून दडपशाहीचा व मुस्कुटदाबीच्या कायद्यांची सुरवात झाली; आणि दुबळ्या राष्ट्रांचें अस्तित्व व तद्‌नाम्यांतील वचनांचें पावित्र्य राखण्याकरितां प्रारंभलेल्या युद्धापासून तर या दडपशाहीला ऊतच आला, हें सखेदाश्चर्य होय ! अशा परिस्थितींत आज-

पर्यंत निष्कारण वायदेबाजी करून लांबणीवर टाकलेल्या महत्वाच्या सुधारणा खुल्या दिलानें व धैर्यानें अमलांत आणल्या तरच हा संशयखोरपणा दूर होईल. सुधारणांचा दुरूनच देखावा किंवा नैवेद्य दाखवून संतुष्ट करण्याचे दिवस लोपले; आतां खऱ्या मुत्सद्दीपणाच्या व निश्चितस्वरूपाच्या सुधारणा अमलांत आणण्याचा काल प्राप्त झाला आहे. प्रजेला सुखावह होतील असे कायदे करण्याच्या बाबतींत कांहीं प्रगमनशील संस्थानिकांनीं मारलेली अघाडी आणि ब्रिटिश अधिकाऱ्यांची कूर्मगति पाहून असंतोषाच्या कारणांत आणखी भर पडली आहे. आपल्याच जातीच्या व वर्णाच्या मुत्सद्यांनीं व संस्थानिकांनीं आपल्या संस्थानांत सुधारणा चालविली आहे हें पाहून तर हिंदी लोकांच्या मनास सारखी तळमळ लागून राहते. म्हैसूरच्या प्रतिनिधि सभेंत प्रतिनिधींनीं केलेल्या सूचनांचा आदरपूर्वक विचार होतो व प्रसंगविशेषीं त्या अमलांतही येतात असें पाहिल्यावर संस्थानी प्रजेस दिखाऊ हक्क नसले तरी ब्रिटिश कायदे कौन्सिलांतील प्रतिनिधींपेक्षां संस्थानांतील प्रतिनिधींस खरे भरीव अधिकार आहेत अशी त्यांची खात्री पटते. संस्थानांतून शिक्षणाचा प्रसार होत आहे, नव्या उद्योगधंद्यांस उत्तेजन मिळत आहे, गांवकरी लोक पंचायतद्वारा आपापल्या जबाबदाऱ्या स्वशिरावर घेत आहेत हें सर्व पाहून ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेपेक्षां हिंदी अधिकाऱ्यांची अपात्रताच अधिक फलदायी आहे असें आश्चर्ययुक्त उद्गार त्याच्या तोंडून बाहेर पडतात! आणि तो अखेरीस आपल्या मनाचें असेंच समाधान करून घेत असे कीं, हिंदी प्रजेला हिंदी अमल ज्यास्त सुखावह होतो.

## (४) व्यापारी वर्गाची जागृति

हिंदुस्थानांत ज्या शक्तिसमुच्चयानें ' नवें तेज ' उत्पन्न केलें आहे त्यांत वैश्य वर्गाचें राजकीय गोष्टींकडे लक्ष वेधणें ही मोठी प्रबळ शक्ति आहे व तिच्यापासून पुष्कळ सुपरिणाम उद्भुन होणार आहेत. १९१५ सालच्या मुंबई येथील औद्योगिक परिषदेंत सर दोराब टाटा यांनीं व्यापार व राजकारणांची सांगड घालण्याचा उपदेश केला व त्याचे फल दृग्गोचर होऊं लागलें आहे. आजपर्यंत वैश्य वर्ग हा आपला व्यापार बरा कीं आपण बरें, अशा तुटकपणानें वागत होता. परंतु आतां महायुद्धानें त्याचें लक्ष राजकारणाकडे वेधलें. कारण सरकारच्या धोरणामुळें

आपल्या धंद्यावरच गदा येण्याची त्याला धास्ती वाटूं लागली. उदाहरणार्थ पूर्वी ज्या धंद्यांचा जर्मनीशीं संबंध असून तो व्यापारामुळें तुटला ते धंदे बुडूं न देण्या-करितां सरकारनें मदत केली नाहीं. अवश्यक वस्तूंचा जर्मनीकडून होणारा पुर-वठा थांबतांच ते जिन्नस या देशांत उत्पन्न करण्याला सरकारनें साहाय्य केलें नाहीं; युद्धाच्या निमित्तानें कित्येक वाढत्या धंद्यावर कडक निर्बंध घातले; इंग्लंडांतील ऋणको कडून रोकड येईनाशी झाल्यानें येथील व्यापाऱ्यांस आपलें देणें फेडणें जड जाऊं लागलें, अशा वेळीं ही सरकारनें रोकड रकमेची मदत केली नाहीं, त्यामुळें त्यास नुकसानीच्या भावानें प्रॉमिसरी नोटा विकून काम भागवावें लागलें; कित्ये-कांनीं सरकारास माल पुरविला असतां त्यांना रोख किंमत न देतां कर्जरोखे देण्यांत आले. या प्रस्तुतच्या अडचणी झाल्या. प्रेसिडेन्सी बँकांतून पक्षपात होतो व हिंदी व्यापाऱ्यांस सवलती मिळत नाहींत व त्या बँकांच्या डायरेक्टरांत हिंदी लोकांचा प्रवेश होत नाहीं ही नेहमींचीच ओरड आहे. परदेशी व्यापाऱ्यांना खाणींच्या सवलती मिळाल्यानें ते खनिज संपत्ति काढून नेत आहेत व सरकार देशहिताच्या दृष्टीनें न पाहतां तिकडे कानाडोळा करितें. मद्रास इलाख्यांतील पश्चिम किनाऱ्या-वर जर्मनीनें खोबऱ्याचा व काथ्याच्या दोरांचा धंदा सुरू केला होता. युद्ध सुरू होतांच शत्रूची कंपनी बंद करण्यांत आली; तेव्हां ती अचानक इंग्लिश कंपनीच्या घशांत उतरत होती. पण टाटा कंपनी वेळेनुसार पुढें सरसावल्यामुळें तेवढा धंदा हिंदी व्यापाऱ्यांच्या हातीं राहिला. खनिज पदार्थांतील मोनझाइट, अभ्रक वगैरेंच्या खाणी जर्मनांच्या हातीं होत्या. बिनकमावलेलीं कातडीं जशाचीं तशीं जर्मनीत जात होतीं. म्हैसूर संस्थानांतील एका कंपनीनें तीं विलायतेंतल्यापेक्षां येथें उत्तम कमावतां येतात असें दाखविलें होतें व थोडेसें उत्तेजन मिळालें असतें तर येथें हा धंदा सुरू झाला असता. व्हाइसरॉयांनीं ता. ५ सपटंबरच्या आपल्या भाषणांत सांगितलें कीं, कातडीं कमावण्याचा धंदा या देशांत चांगला भरभराटीस येईल. परंतु हल्लीं सरकार ठराविक भावानें कच्चीं कातडीं खरेदी करितें व सैन्यासच नव्हे तर ग्रेट ब्रिटनमधील इतर लोकांसही लागणारे जिन्नस त्यांतून पुरविले जातात हा जुलूम काय म्हणून ? हिंदुस्थानानें लष्करी लोकांप्रमाणें सामान्य लोकांच्याहि गरजा भागविण्याचा मक्ता घेतला आहे कीं काय ? हिंदी लोकांच्या पैशानें हिंदु-स्थानांत जे प्रयोग केले जातात त्याचा फायदा हिंदी लोकांस मिळावयास नको काय ?

महायुद्धानें हिंदुस्थानच्या नैसर्गिक संपत्तीकडे अधिकाऱ्यांचें लक्ष वेधलें आहे. व्हाइसरॉय म्हणूं लागले आहेत कीं, पक्क्या मालाकरितां या देशानें अतःपर परदेशावर अवलंबून न राहतां स्वावलंबी बनावें अशा रीतीची योजना करण्यांत येईल. आमची आज कित्येक वर्षें हीच मागणी आहे. पण, पूर्वी ईस्ट इंडिया कंपनीनें, नंतर ब्रिटिश सरकारनें आणि हल्लीं साम्राज्यवादी व्यापाऱ्यांनीं हिंदुस्थाननें कच्चा माल पुरवावा आणि ग्रेट ब्रिटनपासून पक्का माल घ्यावा असा जोराचा आग्रह चालविला आहे. इंग्लंडांत पक्क्या मालाचे कारखाने जसजसे वाढत गेले तसतसा हिंदुस्थान देश दरिद्री होत चालला असें मेकॉलेनेंच दाखवून दिलें आहे. ही स्थिति पालटून जर हिंदी कारागिरास--हिंदुस्थानांतील गोऱ्या कारखानदारांस नव्हे-- उत्तेजन मिळेल तर हिंदी लोक सरकारचे फार कृतज्ञ होतील. परंतु ही गोष्ट कितपत तडीस जाईल याची वानवाच आहे. कारण आज पर्यंतचा अनुभव याच्या उलट आहे. मध्यप्रांतांत लोखंडाच्या खाणी सांपडून शंभर वर्षें होत आली पण त्यावेळींहि जगाला लोखंड पुरविण्याचा मक्ताच जणूं काय इंग्लंडकडे असून त्यापासून त्यास अतोनात नफा प्राप्त होत होता. अशा वेळीं इंग्लंडला प्रतिस्पर्धी कसा खपणार ? पण त्या वेळेपासून हिंदुस्थानांतच लोखंडाची पैदास झाली असती तर प्रत्येक यंत्राबद्दल आज जे या देशाला परदेशीयांच्या तोंडाकडे बघावें लागत आहे तसें बघण्याचा प्रसंग आला नसता.

हिंदुस्थानची शेतकी सुधारण्याचा यत्न सरकारनें चालविला आहे. पण यांतहि हिंदी लोकांपेक्षां विलायती कारखानदारांच्या हिताकडेच दृष्टि अधिक आहे. या देशांत आंखूड धाग्याचा कापूस होतो, व येथल्या हातमागाला तोच चालतो, इंग्लंडला लांब धाग्याचा कापूस पाहिजे व तो इजिप्त किंवा अमेरिका येथून आणवावा लागतो व तो भरपूर मिळत नाहीं. ही उणीव दूर व्हावी म्हणून हिंदुस्थानांतील कापसाच्या लागवडीची इतकी चौकशी चालली आहे ! इंग्लंडनें स्वार्थ सोडून परहितार्थ असा उद्योग केला आहे काय ? मग हिंदुस्थानावरच स्वतःचा व्यापार बुडवून दुसऱ्याचें कल्याण करण्याचें हें ओझें कां ? युद्धामुळें सरकारचेंहि येथील उद्योगधंद्याकडे लक्ष लागून औद्योगिक कमिशन नेमिलें गेलें. परंतु सरकारच्या धोरणामुळें, हिंदी व्यापाऱ्यांची स्थिति अधिक दुबळेपणाची होणार नाहीं ना ? व्यापारी वर्गांत जी जागृति उत्पन्न झाली आहे तिच्या

वुडाशीं हीच भीति आहे. चहाचा धंदा युरोपियन मळेवाल्यांच्या हातीं असल्यामुळें त्यांच्यावर आजपर्यंत कराचा बोजा मुदलीच बसला नव्हता. अशाच रीतीनें यापुढें हिंदी पैशानें उत्तेजन दिलेले धंदे सगळे परक्यांच्या हातीं गेले तर हिंदी लोकांना इंग्लिश कंपन्यांतून दुभाषांचें व खर्डेघाशांचें काम दिवसेंदिवस उतरत्या पगारावर करण्याखेरीज तरणोपाय राहणार नाहीं.

हिंदुस्थानांत किती तरी कारखाने व उद्योगधंदे चालण्याजोगे आहेत. कापसाच्या व तागाच्या कापडाची वाढ होण्याला मुबलक वाव आहे. उंसाची साखर होईल, तंबाखूच्या सिगारेटस् होतील, गळिताच्या धान्यांचें तेल निघेल. सरकीचें लोणी काढतां येईल. चामडी व कातडीं बिन कमावतां बाहेर पाठविण्याच्या ऐवजीं येथें कमावलेल्या कातड्याचें नानाविध जिन्नस होतील. रेशमी व लोकरी उंची तलम कापड पैदास करतां येईल. आज खिळ्यामोळ्यापासून तो आगगाड्यांच्या चाकांपर्यंत व गिरण्यांतील यंत्रापर्यंत सगळें लोखंडी व पोलादी सामान बाहेरून येतें; त्याच्या ऐवजीं तें येथेंच कां तयार होऊं नये? शेतकीचीं आऊतें आणविण्यांत लक्षावधि रुपये परदेशीं कां धाडावें? त्याचप्रमाणें तेलांचे चरक, हातमाग येथेंच तयार झाल्यास त्याला काय गिऱ्हाइकांची वाण पडेल? कागदाच्या गिरण्या, पिठाच्या गिरण्या किती काढाल तितक्या पाहिजेच आहेत. शिवण्याचीं यंत्रें, दोरखंडें, जोडे, बूट, जिने, लहान मोठीं घड्याळें, रंग, कांचसामान, दिवे, कंदील, मेणबत्त्या, कातड्याच्या पेट्या, साबण इत्यादि शेकडों जिन्नस करावयासच बसलें तर येथें होण्याजोगे आहेत. असें जर होईल तर हिंदुस्थान देश स्वतःचा पक्का माल तयार करून परकी देशानांहि तो पुरवील. परंतु आजची व्यापाराची स्थिति याच्या अगदीं विरुद्ध आहे. भारी किंमतीचा कच्चा माल परदेशास कमी मोलानें पुरवावा व परदेशचा कमी किंमतीचा पक्का माल भलती किंमत देऊन घ्यावा असाच हा आंतबट्ट्याचा व्यापार चालला आहे. आणि त्यांतून जी कांहीं बचत उरते तेवढीहि रोकड या देशास परत मिळणें महायुद्धामुळें बंद झालें आहे अशा वेळीं जपानचा व्यापार धडधडीत डोळ्यादेखत पाहतां पाहतां वाढत आहे. त्यामुळें हिंदी व्यापाऱ्यांनाहि ‘स्वराज्य’ असावें असें वाटावयास लागणें स्वाभाविक नाहीं काय? जपानी व्यापारी आपला माल

स्वस्त दरानें विकून हिंदी माल बाजारं पेठेंतून हुसकून लावीत असलेले पाहून, असल्या परकी मालावर जबर जकात बसवून स्वतःच्या कारखान्याचा बचाव करणारें ' स्वराज्य ' असावें अशी त्यांच्या मनांत इच्छा वागूं लागल्यास त्यांत आश्चर्य तें काय ?

येथील ॲंग्लो इंडियन व्यापाऱ्यांनीं स्वराज्य दिल्यास आमच्या भांडवलास धोका येईल अशी ओरड करून स्वराज्यास विरोध सुरू केला आहे. यांचें या देशांत फार तर ५०० कोटि रुपये भांडवल गुंतलें असेल. आतां अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांतहि त्यांनीं १०३२ कोटि रुपये आणि अर्जेंटाइन रिपब्लिकमध्येंहि ४० कोटि रुपये भांडवल घातलें आहे म्हणून तेथें या व्यापाऱ्यांच्या हातीं कोणी राज्यकारभार दिला आहे काय ? पण येथेंच यांची ही ओरड कां ? याचें खरें कारण असें आहे कीं, आजवर जें यांनी येथें आपल्या व्यापाराचें वस्तान बसविलें तें सगळें वशिल्याच्या जोरावर. स्वराज्याचा कारभार सुरू झाला म्हणजे यांचा वशिला संपला. मग त्यास इतरांबरोबरच्या चढाओढींत टिकाव धरण्याची खात्री वाटत नाहीं. कारण आजपर्यंत त्यांनीं खऱ्या चढाओढींत वर डोकें काढून आपला श्रेष्ठपणा स्थापित केलेलाच नाहीं. अर्थातच वशिल्याचा पाया ढळमळला कीं, यांचा डोलारा खालीं आलाच. म्हणून यांची आतांपासून धडपड चालू झाली आहे. उलटपक्षीं हिंदी व्यापाऱ्यांचीहि अशी बालंबाल खात्री झाली आहे कीं, युद्धसमाप्ति नंतर जर आपणास स्वराज्य मिळून आपलें व्यापारी धोरण ठरविण्याची मुभा न मिळतां तें ठरविण्याचा अखत्यार इंग्लंडकडेच राहिला तर मग आपला अवतार संपलाच. इंग्लंडचे कायदे इंग्लिश व्यापाऱ्यांच्या हितसंबंधाकडे दृष्टि देऊनच केले जातील. कारण हिंदुस्थानांतला व्यापार व उद्योगधंदा यांविषयीं जे जे कायदे होतील त्यांकडे इंग्लिश व्यापारी केवळ मत्सरपूर्ण दृष्टीनें पहात असतात.

परंतु आर्थिक स्वायत्तता ही राजकीय स्वायत्तते बरोबरच मिळूं शकते. त्याच्या आधीं मिळूं शकत नाहीं. याकरितां ज्यांना आर्थिक स्वराज्य पाहिजे असेल त्यांनीं राजकीय स्वराज्य मागितलेंच पाहिजे. नुसतें आर्थिक स्वराज्य द्या, राजकीय स्वराज्य दिलें नाहीं तरी कुछ फिकीर नाहीं, असें म्हणणें वेडेपणाचें

आहे. हिंदी कायदे कौन्सिलच्या हातीं कारभार आला म्हणजे त्यांच्या बजेटांत शिक्षण, आरोग्य, कालवे, पाटबंधारे यांवरचा खर्च वाढेल; या योगानें लोकांचें आरोग्य सुधारेल; त्यांच्या अंगची बुद्धिमत्ता वाढेल व राष्ट्राच्या संपत्तींत भर पडूं लागेल. राज्यकारभाराच्या खर्चात काटकसरीनें वागून व पगार कमी करून बचत करण्यांत येईल. कारण या खात्यांचा खर्च दहा वर्षांत १६ कोटि रुपये वाढला आहे. मुलकी खात्यांत जमीन महसूल कमी केला जाईल. व त्या योगानें शेतकऱ्यांना त्यांच्या श्रमाचा मोबदला मिळून ठाकठिकीनें राहतां येईल. ज्या मालाचा पुरवठा करण्याचा हिंदुस्थानाकडे मक्ताच आहे अशा ताग, नीळ वगैरे जिन्नसांवर निर्गत जकात लादली जाईल. आयात मालांत दारू वगैरे अंमली पदार्थ व दुसरे चैनीचे पदार्थ यांजवर जबर जकात ठेविली जाईल. साखरेची पैदास देशांतच होण्यासाठीं परदेशी साखरेवरहि भक्कम जकात बसविण्यांत येईल. त्याचप्रमाणें सुती व रेशमी कापड येथें होण्यासारखें असून त्याची आयात निष्कारण वाढत आहे तिला आळा घालण्यांत येईल. लष्करी खर्चाला मात्र आज हात घालतां येत नाहीं. परंतु क्रमाक्रमानें स्थानिक स्वयंसैनिक निर्माण करून शिलकी सैन्य व लष्करीबळ वाढविलें जाईल. गोरे सैन्य दक्षिण आफ्रिकेंतल्या प्रमाणें येथें कांहीं दिवस राहीलच. पण त्यांच्या नोकरीची जी मुदत अगदीं थोडी आहे ती वाढवून हें लष्कर तयार करण्याच्या कामीं होणारा खर्च कमी कमी करण्यांत येईल.

## ( ५ ) स्त्रियांची जागृति

प्राचीन काळीं हिंदु कुटुंबांत स्त्रियांना देवता मानीत. या देशांत गार्गी, मैत्रेयी, सीता, दमयंती, गांधारी, द्रौपदी, पद्मिनी, मिराबाई, ताराबाई, चांदबिबी, अहिल्याबाई या सारखीं स्त्रीरत्नें निर्माण झालीं आहेत. अलीकडे पांच सहा पिढ्यांत मात्र स्त्रियांचा दर्जा खालावत चालला आहे. अजून देखील त्यांचें आपल्या भर्त्यावर व पुत्रावर वजन असतें. पण त्याचा योग्य उपयोग करण्याइतकें त्यांना शिक्षण मिळालेलें नसतें त्यामुळें त्या केवळ सांगकाम्या व धर्मभोळ्या होतात. तथापि बाह्यजगांतील हालचालींनी त्यांच्यांतहि जागृती उत्पन्न झाली आहे. इंग्रजी शिक्षणानें आपलीं मुलें भौतिकवादी बनत चाललीं आहेत याकरितां त्यांना हिंदुधर्माचें शिक्षण द्यावें अशी चळवळ प्रथम स्त्रियांनींच सुरू केली.

अगदीं अलीकडे दक्षिण आफ्रिकेंत आपल्या पवित्र वैवाहिक संबंधाची थट्टा चालविलेली पाहतांच स्त्रियांनीच सत्याग्रहांत पुढाकार घेतला. बंगालच्या फाळणीनें बंगाली स्त्रियांत जें नवीन चैतन्य उत्पन्न केलें तें तर कांहीं अपूर्वच होय. जेव्हां एका बंगाली पत्राच्या संपादकाला राजद्रोहाच्या खटल्यांत शिक्षा झाली तेव्हां ५०० बंगाली स्त्रिया त्या संपादकाच्या मातुःश्री कडे दुःखप्रदर्शनार्थ नव्हे तर तिचा गौरव करून अभिनंदन करण्यांसाठीं गेल्या! मुदतबंदी मजूर पद्धतींत स्त्रियांच्या पातिव्रत्यावर घाला पडत असलेला ऐकून स्त्रियांचें एक डेप्युटेशन व्हाइसरॉयकडे गेलें होतें हें सर्वांस विदितच आहे. प्रत्यक्ष स्वराज्याच्या चळवळींत स्त्रियांनीं बरीच कामगिरी केली आहे. मद्रास इलाख्यांत तर होमरूलर झालेल्या स्त्रियांची संख्या बरीच मोठी आहे. अटकबंदी झालेल्यांच्या सन्मानार्थ मद्रास शहरीं निघालेली पुरुषांची मिरवणूक जेव्हां मना करण्यांत आली तेव्हां स्त्रियांनीं मिरवणूक काढिली व देवालयांत जमून आमच्या सुटकेकरितां प्रार्थना केली; अशा रीतीनें स्वराज्यसाधन हें एक धर्माचें अंग होऊं पहात आहे व तसें तें झालें म्हणजेच या देशांत खेड्यांतील अगदीं अडाणी कुणब्यापासून तो वरिष्ठ वर्गांतील स्त्रियापर्यंत सर्वांचें याकडे लक्ष वेधेल हें लक्ष वेधण्याचा ‘ स्वराज्य ’ हा महामंत्र आहे.

## ( ६ ) साधारण जनतेची जागृति.

स्वराज्याच्या चळवळानें खालच्या वर्गांतहि खळबळ उडवून सोडिली आहे. हिंदी शेतकरी साक्षर नसला तरी तो समजूतदार असतो. त्याला हल्लींच्या सरकारची रोख सारा वसूल करण्याची पद्धति कशी नडते व तीमुळें सावकारचें घर पाहण्याचा प्रसंग कसा येतो तें कळतें. वारंवार होणाऱ्या रिव्हिजन सर्व्हेचा जाच त्यास जाणवतो. पूर्वींची ग्रामपंचायत पद्धति फिरून सुरू होईल कां व माझ्या गांवचा कारभार माझा मी पाहीन कां अशी त्यास तळमळ लागून राहिली आहे. गांवांतील लोकांवर कुरघोडी करणारे नव्या पद्धतीचे सरकारी कामगार त्यास नको असून गांवचे सेवक असे सहकारी कामगार त्यास पाहिजे आहेत. सहकारी पतपेढ्यांच्या पद्धतीनेंहि त्याची दृष्टि फिरवली आहे. पतपेढी, शिक्षण, आरोग्य वगैरेवर व्याख्यान देण्यासाठीं सुशिक्षित लोक खेडेगांवांतून जाऊं लागल्यानें त्यांच्या संघटनाचाहि शेतकऱ्यांवर परिणाम होत आहे. जवळ-

पास कोठें सभा किंवा परिषद झाली व तिचें काम त्याच्या जन्मभाषेंत चाललें तर तो तें लक्षपूर्वक पाहतो, स्थानिक गरजा काय असतील त्या स्वतः सांगतो आणि एकंदरींत या नव्या राष्ट्रीय जागृतीनें आपल्यास बरे दिवस येतील अशी त्याची मनोदेवता त्यास सांगते. दे. भ. गांधींच्या सूचनेप्रमाणें स्वराज्याच्या अर्जावर सह्या घेतांना मद्रास इलाख्यांत एका महिन्यांत १० लक्ष सह्या मिळाल्या व त्यांतला बराच भाग खेड्यांतला आहे हेंहि एक या जागृतीचें प्रमाणच आहे.

निकृष्ट वर्गांतहि आशेचें किरण पसरूं लागले आहेत. या वर्गांतीलच लोकांनीं सुरूं केलेल्या अगर वरिष्ठ वर्गांनीं त्यांच्याकरितां चालविलेल्या चळवळीनें त्यांच्यांत आपल्या देशांत आपलें योग्य स्थान मिळविण्याची आकांक्षा उद्भूत झाली आहे. आजपर्यंत आपण या वर्गाकडे दुर्लक्ष करून कर्तव्यपराङमुख झालों ही जाणीव उत्पन्न होऊन ब्राह्मणवर्गही आतां त्यांच्या सुधारणेकरितां पुढें सरसावला आहे. तथापि कर्मानुबंध कोणासच टाळतां येणें शक्य नाहीं; त्यानें आत पर्यंतच्या कर्तव्यच्युतीचें प्रायश्चित्तही वरिष्ठ वर्गास मिळत आहे. कारण 'स्वराज्य' म्हणजेच 'ब्राह्मणराज्य' व तें झाल्यास आपणास जाचक होईल अशी कल्पना अधिकारी व बिन अधिकारी युरोपियन लोक कनिष्ठवर्गाच्या डोक्यांत भरवून त्या कल्पनेनें निकृष्टवर्गाला स्वराज्यास विरोध करण्याला चिथावीत आहेत. वीसवर्षांपूर्वीच मी असा इषारा दिला होता कीं, निकृष्ट वर्गाकडे दुर्लक्ष करून त्यांना ख्रिस्ती किंवा महंमदी धर्म स्वीकारूं देण्यांत हिंदुधर्मास धोका आहे. त्या वेळेनंतर या युक्तीची दुरुस्ती होऊं लागली आहे. परंतु झालेल्या कामाची भावी कार्याशीं तुलना करितां हे समुद्रांत एक बिंदु एवढेंच भरेल. यांत कोणा एका विशिष्ट वर्गाचाच दोष आहे असें नाहीं. तथापि असलें रडकें समाधान काय कामाचें ? झालें गेलें तें सर्व विसरावयाला निकृष्ट वर्ग तयार आहे. परंतु यापुढेंतरी या निकृष्टवर्गाकडे पूर्वीप्रमाणें दुर्लक्ष न करणें हें प्रत्येक देशाभिमानी पुरुषाचें कर्तव्य आहे.

## हिंदराष्ट्रास होमरूल कां हवे ?

हिंदुस्थानास 'स्वराज्य' कां पाहिजे. असें विचारल्यास त्यास दोन कारणें सांगतां येतील. स्वराज्य हा प्रत्येक राष्ट्राचा जन्मसिद्ध हक्क आहे हें पहिलें कारण होय. हिंदुस्थानचा कारभार हिंदुस्थानच्या हिताच्या दृष्टीनें न चालतां

त्यांच्या इच्छेविरुद्ध ब्रिटिश साम्राज्याच्या हिताच्या दृष्टीनें चालविला जातो आणि या देशाच्या नैसर्गिक संपत्तीचा देशहिताकडे किंवा अगदीं जरूरीच्या गरजा भागविण्याकडेहि योग्य रीतीनें उपयोग केला जात नाहीं हें दुसरें कारण होय.

## मुख्य कारण.

कोणत्याहि राष्ट्राच्या नागरिकांचा स्वाभिमान व उच्च दर्जा कायम राहण्याला स्वराज्य अवश्य आहे; कारण परकी अमलाखालीं राष्ट्र दुबळें होतें, त्याचें शील विघडतें व त्याच्या अंगचे कर्तृत्वहि नाहींसें होतें. हत्यारें वापरण्याचा हक्क काढून घेतल्यानें हिंदी राष्ट्राची जी हानि झाली आहे ती ब्रिटिश अमलापासून झालेल्या दुसऱ्या कोणत्याहि चांगल्या गोष्टीनें भरून येणार नाहीं. स्वातंत्र्याशिवाय राष्ट्राला आपलें आदिष्ट कार्य करतांच येणार नाहीं. मॅझिनी म्हणतो कीं, प्रत्येक राष्ट्र अस्तित्वांत येतांच ब्रह्मदेव त्याच्या पाळण्यावर त्याचें आदिष्ट कार्य लिहून ठेवतो. जगांत धर्माचा प्रसार करणें हें हिंदुस्थानचें आदिष्ट कार्य होय. हें कार्य करितां येण्याला या देशाला स्वातंत्र्य पाहिजे. आपलें कार्य संपविण्यापूर्वीं जर एकाद्या राष्ट्राची खच्ची झाली किंवा त्यास भलतेंच वळण लागलें तर त्यांत सर्व जगाची हानि आहे.

यावरून लक्षांत येईल कीं, स्वराज्याची मागणी ही केवळ स्वार्थाकरितां, स्वसुखाकरितां नसून जगाच्या कल्याणाकरितां आहे, आणि तसा तिचा श्रेष्ठ उद्देश असल्यामुळेंच ती आकांक्षा भीतिनें, धाकदपटशानें, किंवा लोभामुळें, दडपली जात नाहीं. परकीय अमलाखालीं प्रजेच्या सत्वाची व स्वाभिमानाची कशी हानी होते याचें कै. ना. गोखले यांनीं चांगलें मार्मिकपणें वर्णन केलें आहे. ते म्हणतातः—हल्लींच्या राज्यपद्धतीत हिंदी लोक खुरटत, खुजे होत चालले आहेत. कारण केव्हां झाले तरी आम्हांस आम्ही कमी दर्जाचे असेच वाटत राहणार व आमच्यांतच्या श्रेष्ठ व्यक्तीसहि खालीं मान वांकवावी लागणार. इंग्लंडांतील ईटन, हॅरो वगैरे शाळांतील मुलांना मी ग्लॅडस्टन होईन, मी नेल्सनसारखा पराक्रम करीन, मी वेलिंग्टनप्रमाणें नांव गाजवीन अशी जी महत्वाकांक्षा असते तशी येथें शक्यच नाहीं. आमच्या क्षात्रतेजाचा व राजकारणपटुत्वाचा उपयोग करण्याची आम्हांस संधीच न मिळाल्यानें आमचे हे गुण गंजूनच नाहींसे होणार ! आणि आम्ही आमच्याच देशांत पाणक्ये किंवा लांकूडफोडे होऊन राहणार !

ना. भूपेंद्रनाथ वसू हे हि एकदां म्हणाले होते कीं, सर्व सत्ता स्वतःच्या हातांत केंद्रिभूत करण्याच्या ब्युरॉक्रसीच्या राज्यपद्धतीमुळें आमच्यांतली कल्पनाशक्तिच नाहीशी होत चालली आहे आणि त्यामुळें आमच्या स्वतःच्या विषयांचा योग्य अभिमानहि नष्ट होत चालला आहे.

या संबंधांत लॉर्ड सॅलिस्बरी यांनी कूपर्सहिल कॉलेज मधील विद्यार्थ्यांस उपदेश करतांना दिलेला इषारा लक्षांत ठेवण्याजोगा आहे. ते म्हणाले:—" ज्या राज्यपद्धतींत प्रजाजनांना सदोदित कमी दर्जावरच राहावें लागतें व त्यांची सतत मानखंडना होते ती पद्धति कायमची टिकणें दुरापास्त आहे. याकरितां माझें अंतःकरणपूर्वक असें सांगणें आहे कीं, हिंदुस्थानांत येथून गेल्यानंतर जे अशा अरेरावी पद्धतीनें राहून हिंदी लोकांची मानखंडना करतील तेच इंग्लंडचे खरे शत्रु होत व त्यांच्या या कृत्यांनेंच भविष्यत् काळीं ब्रिटिश राज्य ढासळून पडेल." हिंदी लोकांत स्वाभिमानाची बुद्धि वाढत चालल्या कारणानें मीहि ही गोष्ट सांगत आले आहे, पण तिकडे लक्ष दिले जात नाहीं.

लहान मुलाच्या शिक्षणापासून हिंदी लोकांच्या गुणांची खची व्हावयास सुरवात होते. शाळेंत व कॉलेजांत हिंदी व युरोपियन्स ह्यांच्यांत पंक्तीप्रपंच दिसून येतो. नामांकित विद्वान् हिंदी लोकांवर यःकश्चित युरोपियन येऊन बसणें-शाळेचा प्रिन्सिपाल हटकून युरोपियनच असतो-स्वदेशाच्या इतिहासापेक्षां पाश्चात्य इतिहास हाच महत्वाचा ठरला जाणें, इंग्लंडांतील कांहीं खेड्यांची हकीकत लिहिली एवढ्यावरूनच कांहीं गृहस्थांस हिंदुस्थानांत अर्थशास्त्र शिकविण्याची पात्रता आली असें समजणें, ह्या सर्व गोष्टींनीं शाळा आणि कॉलेजें ह्यांत युरोपिनांचीच श्रेष्ठता, जरी तसें अध्यापकांनीं उघडपणें म्हटलें नाहीं तरी, दिसून येते. सर्व शिक्षण शाळाखात्याच्या अमलाखालीं व पाश्चात्य नमुन्याप्रमाणें दिलें जातें. आणि त्याचा उद्देश विद्यार्थी स्वदेशाभिमानी व्हावेत हा नसून गायीसारखे आज्ञाधारक सरकारी नौकर तयार व्हावेत हाच असतो. उच्च आकांक्षा, धाडस, स्वाभिमान ह्या गुणांस त्यांत उत्तेजन न मिळतां आज्ञाधरकत्व हाच अत्यंत श्रेष्ठ गुण ठरला जातो. स्वदेशप्रीति स्वदेशाभिमान, महत्वाकांक्षा हे भयंकर दुर्गुण ठरतात; आणि हिंदी ध्येयांपेक्षां इंग्रजी ध्येयांसच वरिष्ठपणा दिला जातो. परकीय अमलाखालचीं सुखें व हिंदी लोकांची स्वराज्य चालविण्याची नालायकी हींच विद्यार्थ्यांच्या मनांत ठसवण्याची

खटपट चालू असते. अशा स्थितींत तोंडपुजे, वेळमारून नेणारे व न्याय्य महत्वाकांक्षा सफळ न झाल्यानें परार्थ सोडून केवळ स्वार्थी बनलेले असेच लोक जर ह्या शाळांतून पैदा झाले तर त्यांत नवल तें काय? त्यांच्या कोंवळ्या मनांवर एकसारखी त्यांचीं व्यंगेंच ठसवण्याचा जर प्रयत्न झाला तर त्यांस मि. आस्क्विथ ह्यांनीं जीस ‘ परवशतेच्या जोखडाखालची असह्य हीनावस्था ’ असें म्हटलें आहे त्याबद्दल वाईट वाटावेंच कसें?

इंग्रजी अमल चांगला कीं वाईट हा प्रश्नच आपल्या समोर नाहीं. इंग्लंडांत इंग्रज लोकांच्या विनचूक राज्यव्यवस्थेपेक्षां ( efficiency ) जर्मनींत जर्मनांची राज्यव्यवस्था अगदीं बेमालूम आहे; जर्मनांना इंग्रजांपेक्षां चांगलें पुरेसें अन्न, अधिक करमणुकीचीं साधनें आणि विश्रांति मिळते व दारिद्र्याचा जाच बराचसा कमी होतो. पण तेवढ्याकरितां इंग्लंडांतील सर्व वरिष्ठप्रतीच्या जागांवर जर्मनांस नेमावें असें कोणी इंग्रज म्हणेल काय? तसें तो कां म्हणत नाहीं? ह्याचें कारण उच्च स्वाभिमान आणि आपल्या स्वातंत्र्याची महती ह्या दोन मनोवृत्ति परकीय अंमल कितीहि श्रेष्ठ असला तरी त्या विरुद्ध बंड करून उठतात म्हणून. माजी मुख्य प्रधान मि. अस्क्विथ हे युद्धारंभीं असेंच म्हणाले होते कीं, श्रेष्ठ परकीय अमल ही तर “ कल्पनेबाहेरची व असह्य गोष्ट आहे. ” पण मग हिंदुस्थानांतच ती कां पटते? हिंदीजनतेस ती असह्य कां वाटत नाहीं? ह्याचें कारण आम्हांस अगदीं ल्हानपणापासून परदास्याची व साहेब लोक आमच्यापेक्षां श्रेष्ठ आहेत असें मानण्याची संवयच लागून गेली आहे. आणि हिंदी लोकांचें इंग्रजी अमलापासून जर अत्यंत भयंकर असें कोणतें नुकसान झालें असेल तर तें प्रत्येक स्वतंत्र राष्ट्रांतील लोकांचा, आम्ही स्वतंत्रच राहणार हा जो बाणा, ही जी जन्मसिद्ध हक्काची कल्पना, ती नष्ट केली हें होय. त्यामुळें हिंदी पोषाक, हिंदी अन्न, हिंदी रीतरिवाज हे सारे कमी दर्जाचे मानले जातात; हिंदी जन्मभाषा आणि हिंदी वाङ्मय ह्यांनीं मनुष्य सुशिक्षित होत नाहीं अशी कल्पना होते. हिंदीलोक व इंग्रज हे दोघेहि असेंच धरून चालतात कीं, या राष्ट्राचे कांहीं जन्मसिद्ध हक्कच नाहींत. आमचा ‘ सर्व ’ राज्यकारभार आम्हीच चालवूं असें म्हणण्याऐवजीं आम्हांस राज्यकारभारांत ‘ मोठासा ’ भाग द्या असें ते म्हणतात. आणि तसा मिळाल्यास या ‘ वरदाना ’ बद्दल ते कृतज्ञ राहिले पाहिजेत अशीहि अपेक्षा असते. काय द्याव

याचें हें इंग्रज सांगणार. हा सारा चुकीचा उफराटा, न शोभणारा प्रकार आहे. परंतु हिंदी लोकांचे डोळे उघडूं लागले आहेत; आपल्या देशांत आपण स्वतंत्र असण्याचा व आपला कारभार आपणच चालविण्याचा मनुष्य जातीचा जो जन्मसिद्ध हक्क तो आपणांस आहे असें लक्षावधि हिंदी लोकांस वाटूं लागलें आहे, ही परमेश्वराची खैर आहे. हिंदी लोक गुडघे टेंकून न राहतां ताठ उभे राहून हक्क मागूं लागले आहेत. हिंदी लोकांस हें मी शिकविलें म्हणून इंग्रजांचा मजबद्दल गैरसमज होऊन ते मला राजद्रोही म्हणत आहेत; पण मी हें शिकविलें म्हणूनच मी आज राष्ट्रीय सभेची अध्यक्ष झालें आहे.

ही भाषा कदाचित् कडक असेल पण ह्या बाबतींत हिंदुस्थानांत निर्भेळ सत्य नेहमीं कोणी सांगत नाहीं. पण इंग्लंडांत प्रत्येक इंग्रजास ह्याची जाणीव आहे आणि हिंदुस्थानांतील प्रत्येक मनुष्यास ती असली पाहिजे. ज्या करितां संयुक्त राष्ट्रें लढत आहेत ती हीच स्वतंत्रता, हीच ती लोकसत्तात्मक राज्य पद्धती, आणि हाच तो कालमहिमा होय. आणि जेव्हां हिंदुस्थान आतांप्रमाणें हा आपला हक्क मागूं लागेल तेव्हां प्रत्येक जातिवंत इंग्रजास हा हिंदुस्थानचा हक्कच आहे असेंच वाटेल जेव्हां हा हक्क हिंदुस्थानास प्राप्त होईल तेव्हांच सध्याची परवशतेची लोहशृंखला तुटून हिंदुस्थान व इंग्लंड ह्यांच्यामध्यें प्रेमरज्जुचें व परस्पर सेवेचें बंधन उत्पन्न होईल. भावाभावांप्रमाणें एकत्र राहून आपण मग उभयतांसहि मान्य असलेल्या ध्येयप्राप्तीकरितां कोणत्याहि तऱ्हेचा गैरविश्वास किंवा अप्रीतीचा किंतू न ठेवतां कार्य करीत राहूं आणि ह्या अशाच ऐक्यानें सर्व जगाला अननुभूत असलेलें अत्यंत बलिष्ठ साम्राज्य किंवा सामुदायिक सत्ता (Commonwealth) उत्पन्न होऊन ती जगांत परमेश्वराच्या कृपेनें अल्पावधींतच युद्धाचें नांव सुद्धां राहूं देणार नाहीं.

## ( २ ) दुय्यम प्रतीची कारणें.

### ( अ ) सुयंत्रित राज्यव्यवस्थेची कसोटी

सध्यांच्या स्वराज्याच्या मागणीची जी दुसरीं कारणें आहेत ती एकाच स्पष्टोक्तीमध्यें सांगतां येतील. ती उक्ती ही " सध्यांची राज्यव्यवस्था कमी महत्वाच्या गोष्टींत आणि ज्यामध्यें इंग्रजांचे हितसंबंध आहेत अशाहि बाबतींत अगदीं निर्दोष असल; पण ज्यांवर लोकांचें सौख्य आणि अरोग्य अवलंबून

आहे त्या महत्वाच्या बाबतींत ती अगदीं सदोष आहे " परचक्रापासून संरक्षण, टपाल तारायंत्र—ह्यांतसुद्धां राजकीय चळवळ्यांच्या बाबतींशिवाय—रस्ते, आगगाड्या वगैरे सुधारणा पाहून, हिन्दुस्थान म्हणजे एक अर्धवट रानटी लोकांचा देश आहे, अशी कल्पना करून आलेल्या परकीय प्रवाश्यांस मोठें कौतुक वाटतें. पण जर ते सामान्य जनसमूहाकडे लक्ष देतील, तर २५ रुपये (२८ शिलिंग १ पेन्स ) पगारांवर चरितार्थ चालवून मुलांस शिक्षण देणारे कारकून, एकवेळां उपाशीच राहणारें मजूर आणि त्यांच्या झोंपड्या, ह्यांकडे जर हे प्रवाशी लक्ष देतील तर त्यांना आपलें मत देण्यास विचारच करावा लागेल. आणि जर ते हिन्दी सुशिक्षितांशीं बोलतील तर त्यांच्या असंतुष्टतेनें तें आश्चर्यचकितच होतील. ना. गोपाळ कृष्ण गोखल्यांनीं १९११ सालीं हें सारें स्पष्टपणें लोकांपुढें मांडलें होतें. ते म्हणाले:—

ह्या देशांत विशेष परिस्थितींत असलेल्या इंग्रज सरकारानें ज्या मुख्य गोष्टी ( अटी ) अमलांत आणल्या पाहिजेत त्यांत हें सरकार एकसारखें प्रगतिपर असलें पाहिजे ही एक होय. मला वाटतें कीं कोणत्याहि जातींतल्या विचारी मनुष्यास ही गोष्ट पटेल. आतां एखादें सरकार प्रगतीपर आहे कीं नाहीं हें पाहण्याच्या मी चार कसोट्या सांगतों. पहिली कसोटी म्हणजे सरकारनें प्रजेच्या नैतिक व सांपत्तिक सुधारणेकरितां काय उपाय योजले आहेत, ही होय. ह्या उपायांत अलीकडील सर्वच सरकारांस आवश्यक असलेल्या आगगाड्या, टपाल, तारायंत्र वगैरे गोष्टी मी धरीत नाहीं. इंग्रज सरकारनें ह्या गोष्टी केल्या आहेत व त्यापासून प्रजेसहि फायदा झाला आहे, पण ह्या गोष्टींवर इंग्रज सरकारचें अस्तित्वच अवलंबून असल्यानें त्यांना त्या करणें प्राप्तच होतें. नैतिक व सांपत्तिक सुधारणेचे उपाय म्हणजे माझ्यामतें शिक्षण, आरोग्य, शेतीची सुधारणा वगैरे गोष्टी होत. ही माझी पहिली कसोटी आहे. स्थानिक कारभारांतील बराचसा मोठा भाग म्हणजे म्युनिसिपालिट्या व लोकल बोर्डेंहि आमच्या हातीं देण्यास सरकार काय प्रयत्न करतें, ही माझी दुसरी कसोटी आहे. ज्यांत राजनीतीचें धोरण ठरलें जातें त्या कायदेकौन्सिलांत आमचे किती प्रतिनिधी सरकार घेतें, ही माझी तिसरी कसोटी आहे. आणि राज्यकारभारांतील जागांवर किती हिन्दी लोकांस सरकार नेमतें ही शेवटची कसोटी आहे.

## ( ब ) पद्धतींतच बदल झाला पाहिजे—

ना. गोखल्यांच्या ह्या कसोट्यांस आतां हिंदी लोकांचा अनुभव लावून पहावा. पण ह्या पूर्वी येथें स्पष्ट सांगितलें पाहिजे कीं, व्यक्तींना दोष लावण्याचा किंवा इंग्रजांच्या जागीं हिंदी गृहस्थ नेमण्याचा हा प्रश्न नसून ही राज्यपद्धतीच बदलण्याचा हा प्रश्न आहे. अनियंत्रित सत्तेनें चांगले चांगले लोकसुद्धां विघडतात ही सामान्य अनुभवांतीलच गोष्ट आहे. बर्नार्ड हौटन ह्यानेंहि ' उत्तम गुणांचा अनियंत्रित सत्तेनें विघाड होतो ' असेंच म्हटलें आहे. जे लोक ही पद्धती बदलूं पहातात ते राज्याची सुरक्षितता डळमळवतात असें अधिकाऱ्यांना अगदीं प्रामाणिकपणें वाटत असतें. ते राज्याशीं आपलें अगदीं तादात्म्य करून घेत असल्यानें त्यांच्यावरची टीका म्हणजे त्यांना राजद्रोह वाटतो. इतिहासांत ही गोष्ट प्रसिद्ध आहे आणि हिंदुस्थानांत त्याची हल्ली पुनरावृत्ति सुरू आहे. माझी दोषैकदृष्टी आहे असा समज असल्यानें मी माझ्या शब्दांत न बोलतां माझे विचार वरील ग्रंथकाराच्या विचारांशीं जुळते असल्यानें त्याच्याच शब्दांत सांगते.

" अधिकारी हा रिपोर्ट, तक्ते, आणि नित्याच्या गोष्टींत अनेक वर्षांच्या सवयीनें अगदीं तरबेज झालेला असतो. त्याच्या मज्जापटांतले ते धागे होऊन बसलेले असतात. त्याला स्वतःच्या अशा कल्पना असतच नाहींत, तो केवळ एक आरसा असतो. नवीन कल्पना त्यास अगदीं आवडत नाहींत. नेहमीं राज्ययंत्राचे दांडे हालवून हालवून त्याला असें वाटूं लागतें कीं, ह्या यंत्रांतील भाग अगदीं चकचकीत ठेवणें म्हणजेच हिंदुस्थानची उत्कृष्ट सेवा बजावणें होय. आपल्या ताब्यांत दिलेलें चक्र तरी निदान स्वच्छ; चकचकीत, आणि नीट वापरतें ठेवणें एवढाच त्याचा निश्चय असतो. कालांतरानें तो साहजीकच आपल्या ऑफीसच्या खिडकींतून सारें जग सरळ चाललें आहे असें मानितो. एखादे वेळेस जर कांहीं नवीन सूचनावर त्यास रिपोर्ट करण्याची पाळी आलीच तर त्यांच्यायोगानें लोकांचें कल्याण साधेल कीं नाहीं याचा विचार न करतां तो त्यांनीं अधिकारी वर्गाची सोय आणि सत्ता कितपत शाबूत राहील एवढ्याच पुरता विचार करीत असतो. प्राचीन काळच्या संन्याशाप्रमाणें ( Monks ) अथवा एखाद्या नमुनेदार इंग्रजी खेड्यांतील एखाद्या शिष्टाप्रमाणें जनतेच्या कल्याणाकरतां तो अगदीं तत्पर असतो पण त्याच्या किंवा त्याच्या हुकुमाविरुद्ध मात्र लोकांनीं जातां कामा नये. आणि यांतच

पुष्कळशी गोम आहे. आपला न्यायमनसुवा म्हणजे प्रत्यक्ष देवाप्रमाणें विनचूक आणि आपली म्हणजे अधिकारी वर्गाची जात म्हणजे एक पवित्र संस्था अशी त्याची समजूत असल्यानें सामान्य लोकसमूह जोंपर्यंत आपआपल्या उद्योग धंद्यांतच चूर राहून राज्यकारभारांत ढवळाढवळ करण्याचें धाडस करीत नाहींत तोंपर्यंतच तो त्यांस सुखानें नांदूं देतो. राज्यकारभारांत ढवळाढवळ करणें म्हणजे एक भयंकर गुन्हा होय आणि अधिकाऱ्यांच्या कृत्यांवर निर्भीड टीका करणें म्हणजे तर प्रत्यक्ष राजद्रोहच अशी त्याची समजूत असते. कारण कोणच्याहि अधिकाऱ्यास आपल्या हाताखालच्या लोकांनीं केलेली टीका रुचत नाहीं आणि सामान्य लोकांस तो आपल्या नोकरा इतकी सुद्धां किंमत देत नसल्यानें त्यांची टीका असह्यच होते. आणि ते जर उदार अधिकारी वर्ग पुष्कळसे श्रम करीत असतांहि असल्या सर्वोत्कृष्ट अमलाखालीं उत्तमशी व्यवस्था चालत नाहीं असें जर चरचरीत टीकेनें सुचवूं लागले तर त्याचें भानच नाहींसे होतें आणि त्यांतहि त्याला किंवा त्याच्या जातीला न सुचलेले आणि त्यांनीं डोक्यासमोर ठेवलेल्या ध्येयाशीं विसंगत असलेल्या सुधारणा सुचविल्यास त्याच्या अंगाचा तिळपापड होतो. राज्यकारभार करणें हें अधिकाऱ्यांचेंच काम; त्यानांच त्यांच्यातील मख्खी माहीत; त्या यंत्राचें गौप्य तेच जाणोत. फार तर लोकांनीं अगदीं नम्रपणाचें आणि आदरानें अधिकाऱ्यांच्या विचारा करतां अर्ज करावेत. जास्त हिंम्या करूं नये. आम्हीच आपला विचार आणि कारभार करूं असें जर कोणी धाडसानें म्हणेल तर ते अविचारी, मूर्ख आणि तितकेच उद्धट होत. यांचें हें करणें म्हणजे मूठभर विद्यार्थ्यांनीं आपल्या शिक्षकांना परंपरागत वेळा पत्रकांत फेरफार करण्यास फर्मावण्याप्रमाणें अगर अभ्यास क्रम जरा कमी करण्यासाठीं हटून बसण्याप्रमाणें होय. हे शिष्ट ( अधिकारी ) खऱ्या स्वातंत्र्याचा विपर्यास अराजनिष्ठत करतात. या देशांतील लोक बंडखोर अगर दीन मेंढरां व्यतिरिक्त असूं शकतील ही कल्पना सुद्धां यांचे मनाला शिवत नाहीं.

## बिनसरकारी आंग्लो-इंडियन.

हिन्दुस्थानांत वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या जातीचे थोडेच पण बलिष्ठ लोक आहेत आणि त्यामुळेंहि हा प्रश्न जास्त घोटाळ्याचा झाला आहे. येथें अस्सल इंग्रज असे फक्त १,२२,९१९ लोक आहेत, परंतु इंग्रजी अमलाखालीं २५५०००००० व

कमी अधिक प्रमाणांत इंग्रजी सत्तेखालींच, परंतु संस्थानांत असलेले,७००००००० एतद्देशीय लोक आहेत. साधारणपणें वरील आंग्लोइंडियन इतर व्यवसायांत गुंतल्यामुळें राजकारणांत भाग घेत नाहींत; परंतु हिन्दी राष्ट्राला कल्याणकारक अशी एखादी सुधारणा होईल असा संभव दिसूं लागतांच ते दंड थोपटून खडे होतात. याबद्दल जान स्टुअर्ट मिल्ल साहेबांनीं म्हटलें आहे "राज्यकर्त्यांच्या जातींपैकीं संपत्ती मिळवण्यासाठीं परदेशांत जाणारे लोकच पूर्णपणें दाबांत ठेवले पाहिजेत राज्यकर्त्यांच्या मुख्य अडचणीपैकीं ही एक आहे. जेतृत्वाचा अभिमान व त्याबरोबरच उत्पन्न होणारा उद्दामपणा यांचे योगानें त्यांना अनियंत्रित सत्ता गाजवावीशी वाटते पण त्याबरोबरच अंगावर पडणाऱ्या जबाबदारीची जाणीव राहत नाहीं."

सर जान लारेन्स साहेबहि त्याचप्रमाणें लिहितातः—"या बाबतींत निःपक्षपातानें वागण्यांत हिन्दुस्थानसरकारास अगणित अडचणी येतात. हिन्दी लोकांकरतां जर कांहीं केलें किंवा करण्याचा प्रयत्न जरी केला तरी जिकडे तिकडे गिल्ला केला जातो व त्याचाच प्रतिध्वनी इंग्लंडमध्यें होऊन तेथील लोकांचा त्यास आधार व अनुमती मिळते. मी करतो त्याबद्दल माझे मनांत फारच धास्ती वाटत असते. न्याय, परिमितता आणि याचप्रमाणें दुसरे उत्तम गुण प्रत्येकाला हवे असतात, पण त्याप्रमाणें आचरण करण्यांत जर कोणाचा स्वार्थ विघडत असेल तर लगेच त्यांना वेगळें वाटूं लागतें."

जनतेंतील सर्व वर्गास सारख्या रीतीनें वागविण्याबद्दल बोलतांना कीनसाहेब म्हणतातः—

"वरील तत्व आचरणांत आणण्याचा प्रयत्न केला तर हिंदुस्थानांत राहणारे मूठभर गोरे लोक त्यास कधींही अडथळा आणल्याशिवाय राहणार नाहींत. राज्यकारभाराशीं त्यांचा कांहीं संबंध नाहीं तरी देखील ते देशाच्या परिस्थितीकडे व प्रस्तुत प्रश्नाकडे लक्ष देऊन आपल्या जातीचा तोरा मिरवूं पाहतात. ज्या देशांत जाती आहेत तेथें लॉर्ड लिटन साहेब म्हणतात तसे "श्वेत ब्राह्मणांची जात राज्यकर्त्यांच्या जातभाईची बनणें कदाचित् साहजिक आहे; आणि ही गोष्ट खचित आहे कीं ज्यात्याभिमान व पाश्चात्यविद्याविभूषितत्व यांनीं एक प्रकारचा अहंमन्यपणा उत्पन्न झाला व त्याचे ( प्रदर्शन ) पर्यवसान अधिकारजन्य जबाबदारी नसेल

तेव्हां असभ्य व भीतिदायक अशा वर्तनांत झालें. लार्ड विलियम बेंटिंक साहेबांचे वेळीं वरील अभिमान विशेष प्रत्ययास येत असे. त्या वेळीं ते लोकांहि कमी होते व त्यांवर दावहि पण नव्हता. सध्यां त्यांची संख्या जास्त वाढली व कलकत्ता व लंडन येथील वर्तमानपत्रांशीं त्यांचा संबंध असल्यामुळें त्यांस आपल्या रागाचें प्रदर्शन अधिक चांगलें रीतीनें करतां येऊं लागलें. ”

त्यांनीं लार्ड रिपन साहेबांचे सुखदायक कारकीर्दीत इल्बर्ट बिला विरुद्ध सन १८८३ सालीं सर्वांत मोठा गिल्ला केला. त्याचीच पुनरावृत्ती आज आपले पुढें होत आहे. मद्रासमेल, कलकत्त्याचा इंग्लिशमन, अलाहाबादचा पायोनियर, लाहोरचें सिविल अँड मिलिटरी गॅझेट यांचे नेतृत्वाखालीं व लंडन येथील टोरी व युनियनिस्ट पक्षीय पत्रांचे मदतीनें व इंग्लंडांत हरिहरि म्हणत बसलेले येथील अधिकारी व बिन अधिकारी यांचे सल्यानें सध्यां देऊं घातत असलेल्या सुधारणांस मोठ्या निकरानें अडथळा करीत आहे. आपणांस ठाऊक आहे कीं, स्वातंत्र्याच्या मार्गांत त्यांचे हें वर्तन मोठाच अडथळा आहे. ब्रिटिश जनतेवर जरी त्याचा परिणाम झाला नाहीं—व होत नाहीं हें दिसतेंच आहे—तरी हिन्दुस्थानांत ठरावांत दिलेल्या सुधारणा शक्य तितक्या कमी करतील किंवा अजीवात त्यांची गळचेपी करण्याचा प्रयत्न करतील. मोर्ले मिंटो सुधारणांचा उपयुक्तपणा यांनींच नाहींसा केला व वेळींच सावधगिरी न घेतली तर कांग्रेसलीगच्या मसुद्याचा आधार घेऊन केलेल्या ठरावावरहि तसाच प्रयोग होईल.

## ड. इंग्लंडवरील प्रतिक्रिया.

अस्सल इंग्रजी नव्हे अशा हिंदुस्थानावर राज्यकरण्याच्या पद्धतीनें खुद्द इंग्लंडवर काय दुष्परिणाम झाले त्यांकडे आमच्यानें कानाडोळा करवत नाहीं. मि. हॉबसन साहेब असें स्पष्ट म्हणतात:—

“ स्वतंत्र आणि स्वायत्त वसाहतीनीं केवळ यशस्वी रीतीनें स्वराज्य चालवूनच नव्हे तर स्वातंत्र्य आणि समता यांचा फैलाव करून ब्रिटिश लोकांमध्यें आशा आणि उत्साह उत्पन्न करून त्यांच्या आकांक्षांना एक वळण लावून दिलें आहे. पण जिंकलेल्या देशांवर जुलमी पद्धतीनें राज्य करण्यानें आपल्या लोकांना हांजीहांजीपणा मान व मरातब यांबद्दल विशेष आदर व पूर्वीच्या जमीनदारी पद्धतींतील शिल्लक राहिलेला नीचपणा यांच्या संवयी लावून त्यांचे शील अगदीं बिघडवून टाकलें आहे.

१७।१५-२-४८



सन १८६० मध्यें आपल्या हिन्दुस्थानी राज्यासंबंधानें लिहितांना कॉब्डेननें असा सयुक्तिक सवाल टाकला आहे "ग्रीस आणि रोम यांचा आशियाशीं संबंध आल्यामुळें हीं दोन्हीं राष्ट्रें ज्याप्रमाणें हीनतेप्रत पोहोंचली, त्याप्रमाणें. पूर्वेकडे रूढ असलेल्या एकतंत्री राज्यकारभाराच्या पद्धतीची प्रतिक्रिया होऊन आपले लोक भ्रष्ट होणें शक्य नाहीं काय ? भ्रष्ट होणें शक्य आहे एवढेंच नव्हे तर तें अनिवार्य आहे."

या देशांत परके व परत स्वदेशांत जातात तों येथील परिस्थितीचा त्यांचेवर दुष्परिणाम झाल्यामुळें तेथेंहि परके हा इंडियन सिव्हिलियनांवर जरा कठिण प्रसंग तर खराच. नवीन येतात त्यावेळीं कच्चा माल म्हणून आमचें नुकसान होतें व ते इकडे असतांना बेजबाबदारीमुळें अनेक दुर्गुण पैदा करितात त्यामुळें इंग्लंडलाहि निरुपयोगी होतात एवंच दोन्ही बाजूंनीं परिणाम असमाधानकारकच.

## ( इ ) पहिली कसोटी.

ना० गोखले यांचे म्हणण्याप्रमाणें अधिकारीवर्गानें शिक्षण, आरोग्य, शेतकीची सुधारणा व अशाच इतर बाबतींत काय केलें तें पाहूं.

आज शेंकडा २-८ मुलांना शिक्षण मिळत आहे. ६ वर्षांपूर्वी ना० गोखले यांनीं शिक्षणासंबंधीं मसुदा कौन्सिलपुढें आणला त्यावेळेपेक्षां सध्यांचें प्रमाण ०.९ नें जास्त आहे. सन १९१५ चे शेवटीं शाळेंत जाण्यास योग्य मुलांपैकीं शेंकडा २०.४ मुलें शाळेंत जात होतीं. १९१३ मध्यें विद्यार्थ्यांचा सरकारी आंकडा ४५००००० होता. सन १८५४ त सरचार्लस वुड यांनीं शिक्षणाबद्दल रिपोर्ट लिहिला, तेव्हांपासून आज ५९ वर्षांत शिक्षणाची इतकी प्रगती झाली.

शिक्षणाबद्दलचा कायदा सन १८७० मध्यें ग्रेटब्रिटनमधें पास झाला. इंग्लंडमधील तेव्हांची स्थिति आपल्या आतांच्या स्थितीसारखी होती. १८३३ पासून विशेषतः चर्चच्या शाळांना मदत म्हणून ग्रांट देणें सुरूं झालें. १८७० आणि १८८१ चे दरम्यान मोफत आणि सक्तीचें शिक्षण सुरूं झालें आणि या १२ वर्षांत शाळेंत जाणारांचें प्रमाण ४३ २ वरून जवळ जवळ १०० वर आलें. ४००००००० लोकसंख्येपैकीं इंग्लंड आणि वेल्स मिळून आज ६००००९० मुलें शाळेंत शिकत आहेत. आपले सध्यांचे प्रमाणापेक्षां शेंकडा ८ जास्त २८ वर्षांपूर्वी जपानमध्यें शाळेंत जाणाऱ्या मुलांचे प्रमाण होतें. २४ वर्षांत तेंच ९.२ झालें व २८ वर्षांत तें मोफत व सक्तीचें झालें. बडोद्यांत शिक्षण फुकट व बहुतेक सक्तीचे आहे.

त्रावणकोरमध्यें शिक्षण घेणाऱ्या मुलामुलींचें प्रमाण ८१.१ व मुलींचे ३३.२ आहे, बडोदे सरकार प्रत्येक मुलांकरता ०–६–६ खर्च करतें व इंग्रजसरकार ०–३–० करतें. १८८२ पासून १९०७ पर्यंत शिक्षण खर्च ५७ लाखांनीं वाढला आहे. जमीन महसूल ८ कोटींनीं वाढला व लष्करी खर्च १३ कोटींनीं वाढला आहे. सिव्हिल खर्च ८ कोटींनीं व रेल्वेचे भांडवल १५ कोटींनीं वाढलें. ( मी ना० गो. कृ. गोखले यांनीं सांगितलेलेंच आंकडे सांगत आहे ). त्यांनीं जरा उपरोधिक शब्दांत सांगितलें कीं हिंदुस्थानची लोकसंख्या वाढली नाहीं तर आजपासून प्रत्येक मुलगा ११५ वर्षांनीं व मुलगी ६६५ वर्षांनीं साक्षर होईल! सभासदहो, मला वाटतें आपल्याला स्वराज्य मिळालें तर वरील गोष्ट फारच झटपट करतां येईल. मी नम्रपणानें सांगते कीं शिक्षण देण्याचे बाबतींत अधिकारीवर्ग नालायक आहे. आरोग्य संरक्षण व औषधोपचाराची व्यवस्था या दोन बाबी मध्येंहि सर्वत्र असलेला हिंवताप प्लेग व महामारी यांचा फैलाव अधिकारी वर्गाची नालायकी दर्शवतात. व ह्याचमुळें येथील पिढीचें आयुर्मान फार कमी म्हणजे २३.३ वर्षें आहे. इंग्लंडांत तेंच ४० व न्यूझीलंडमध्यें ६० आहे. परकी औषधोपचाराला उत्तेजन ( विशेषतः खेड्यापाड्यांत ) व देशी उपायांना मदत न देणें हेंच रोगास औषधोपचार न होण्याचे मुख्य कारण आहे. सरकारी दवाखाने, सरकारी डॉक्टर हे सर्व परकीय पद्धतींचेच असले पाहिजेत. आयुर्वेदिक आणि युनानी औषधें, रुग्णालयें, दवाखानें किंवा वैद्य यांना सरकार ओळखीत नाहीं, इतकेंच काय त्यांना उत्तेजन घेणें हें असांप्रदायिकपणाचें लक्षण समजलें जातें. त्रावणकोर संस्थानांत ७२ वैद्यशाळांना सहाय्यक द्रव्य देण्यात येतें. या औषधालयांतून १९१४–१५ सालीं १, ४३, २०५ म्हणजे ॲलोपॅथिक दवाखान्यांत आलेल्या पेक्षां २२००० अधिक रोग्यांना उपचार करण्यांत आला. ( १९१७ सालीं प्रसिद्ध झालेला अहवाल पहा ). आमच्या सरकारला लोकांची औषधोपचाराची अडचण दूर करितां येत नाहीं आणि असें असूनहि ज्या पद्धतींवर लोकांचा विश्वास आहे त्या पद्धतीनें चालविलेल्या संस्थांना सरकार मदत करण्यास तयार नाहीं. हेंच स्वराज्यांत प्राच्य वैद्यक आणि पाश्चात्य वैद्यक यांत आज सारखा पंक्तिप्रपंच केला जाणार नाहीं. आतां ही गोष्ट मला कबूल आहे कीं, पाश्चात्यवैद्यकप्रवीण डॉक्टर लोकांच्या गरजाकडे लक्ष पुरविण्यांत आपली शिकस्त करितात; परंतु, गरजेच्या मानानें त्यांचा पुरवठा अगदींच

कमी आहे. अधिकारी वर्गाला संमत असलेल्या पद्धतीनें काम चोख होणें अर्थातच अशक्यच आहे; आणि यांत त्यांचा दोष हाच आहे कीं, त्यांनीं देशी वैद्यकाला गचाळ म्हणून टाकण्यापूर्वी त्याच्या वास्तवीक गुणदोषांचे परीक्षण करण्याची तसदीच घेतली नाहीं. याचा परिणाम म्हणजे सार्वजनिक आरोग्य आणि वैद्यकीय मदत या बावतींत प्रस्तुतचा अधिकारीवर्ग नालायख आहे.

**शेतकीची वाढः**—१९११ च्या शिरगणतीच्या अहवालाप्रमाणें शेतकऱ्यांची संख्या २१८-२ दशलक्ष इतकी आहे. त्यांची भीषण दैन्यावस्था जगजाहीरच आहे; त्यांचा एकसारखा वाढतच असलेल्या कर्जबाजारीपणासंबंधीं सर दिनशा ई. वाच्छा गेल्या तीस पस्तीस वर्षें कंठशोष करीत आहेत. इतके असूनही वाढत्या कर्जा बरोबर कराचा बोजाहि वाढतच आहे. हें गेल्या पंचवीस वर्षांत जमीन महसुलांत आठ कोट रुपयांची वाढ झाली आहे यावरून दिसून येईल. या शिवाय स्थानिक कर, मिठावरील कर वगैरे वगैरे आहेतच. मीठावरील ज्या कराचा बोजा गरीब लोकांना अत्यंत जाचतो त्या कराची गेल्या अंदाज पत्रकांत नव्वद लक्ष रुपयांनीं वाढ करण्यांत आली आहे. अशा हलाखीच्या स्थितीपासून उपासमार, व त्यापासूनच चिवटपणाची वाण, रोगाशी टक्कर देण्यास असामर्थ्य, अल्पायुर्मर्यादा, भयंकर बालमृत्यु वगैरे अपरिहार्य परिणाम घडतात. खोडसाळपणानें हकाटी पिटणारांच्या वर्गांत ज्यांची गणना केली जात नाहीं असे कै. गोपाळ कृष्ण गोखले यांनीं १९०५ सालीं पुढील आंकड्यांचा पाढा वाचला होता:—

" राजमान्य अँग्लो इंडियन अधिकारी गृहस्थ सर उइल्यम हंटर साहेबांच्या म्हणण्याप्रमाणें घेतले तरी चार कोटी लोक सर्व आयुष्यभर एकभुक्तच राहतात. दुसरे मान्य लेखक सर चार्लस ईलियट यांच्या मतें सात कोटी लोकांस तीनशें पासष्ट दिवसांतील एक दिवसहि क्षुधेचे पूर्ण शमन करणें म्हणजे काय तें ठाऊकच नसतें. खरोखर दुसऱ्या कोणाशीं तुलना न करितां हिंदुस्थानांतील लोकांच्या दारिद्र्याविषयीं विचार करूं लागल्यास त्या दारिद्र्याचें चित्र भयंकर आहे. आणि अशा प्रकारची अवनति जर तुमच्या शंभर वर्षांच्या कारकीर्दींत झालेली ढळढळीत दिसत आहे तर हिंदुस्थानांतील लोककल्याण साधणें आमचें मुख्य ध्येय आहे असें बोलण्यास तुम्हाला तोंडच नाहीं.

असें कधीं कधीं म्हणण्यांत येतें कीं, या आंकड्याचा पाढा पुनः पुनः कां वाचतां. तो आम्हांला चांगला ठाऊक आहे. आमचें यावर एवढेंच उत्तर आहे कीं आमचें पोट दुखत आहे म्हणूनच आम्हीं हें रडगाणें गातों, आणि आमची ही व्यथा दूर होईपावेतों आम्ही ही गोष्ट तुमच्या कानीं कपाळीं एक सारखी ओरडतच रहाणार. यास आमचा नाइलाज आहे. आणि म्हणूनच कै. गोखले " आमची ही अवनति एक सारखी वाढतच आहे." असें प्रतिपादन करीत असत. शेतकरी वर्गांत किती लोकांची उपासमार होते याचे आंकडे उपलब्ध नाहींत, तथापि मद्रास शहरांतील शेतकऱ्यांच्या प्रमाणेंच डाक्टरच्या तपासणीवरून शेंकडा ७८ विद्यार्थी उपासमारीच्या रोगानें पीडित आहेत असें आढळून आलें. शरीराचा किरकोळपणा हातापायाच्या काड्या, करुणास्पद असें जीवित्वाविषयीं औदासीन्य हे चाणाक्ष दृष्टीला शब्दांच्या साह्यावांचून आपली कहाणी सांगत आहेत. अशा प्रकारच्या वस्तुस्थितीचाहि मनांवर परिणाम न होण्यास मेंदूमध्यें लोकोत्तर मठ्ठपणा भरलेला पाहिजे.

शेतकऱ्यांच्या तक्रारी अनेक आहेत व त्याचा उच्चार या कांग्रेसनें वेळोवेळीं केलाच आहे. ग्रामस्थांच्या अडचणीविषयीं बेपर्वा असलेल्या न्यायमंत्र्यांनीं केलेल्या जंगलासंबंधींच्या कायद्यांचा असह्य जाच त्यांना भोगावा लागत आहे, आणि फारच थोड्या ठिकाणीं जंगलासंबंधीं पंचायती नेमलेल्या आहेत. ज्या थोड्या ठिकाणीं या पंचायती नेमण्याचा प्रयोग करण्यांत आला आहे तेथें तेथें त्यापासून फायदाच झाला आहे, कांहीं ठिकाणीं तर आश्चर्यकारक सुपरिणाम झाला आहे. गुरांसाठीं चराई रानांची टंचाई, निःसत्त्व झालेल्या शेतांना पाला खतांची वाण, जंगलाभोंवती मर्यादादर्शक कुंपणाचा अभाव, आणि त्या मुळेंच गुराची जंगलांत वरदळ पडणे, तीं कोंडवाड्यांत नेलीं जाणें, कायदा बरोबर न कळल्यामुळेंच दंड किंवा इतर प्रकारच्या शिक्षा भोगाव्या लागणें, जळाऊ लांकडांची कमतरता, शेतीची अवजारें तयार करण्यास आणि त्याची तोडजोड करण्यास लागणाऱ्या लांकडाची दुष्प्राप्यता, अनुकूल असलेल्या पाण्याची अनिश्चित विभागणी वगैरे सारख्या अडचणींची चर्चा खेड्यांत आणि प्रांतिक परिषदांत होत असते. हत्यारांचा कायदा झाल्यामुळें रानटी पशूंपासून आणि रानटी लोकांपासून बचाव करण्याचें साधन नाहींसें झालें. न्याय आणि वजावणी या दोहोंची कामें विभक्त नसल्यामुळें

17 Ty. 24



न्याय बहुधा दुष्प्राप्यच आणि नेहमींच पैसा आणि वेळ या दृष्टीनें मनस्वी महाग पडतो. गांवच्या लोकांना कोणत्याहि प्रकारें जबाबदार नसल्यामुळें गांवकामगार लोकांना संतुष्ट करण्यापेक्षां ते तहसीलदार आणि जिल्हाधिकाऱ्याची मर्जी संपादन करण्यासाठीं झटतात. आणि गावांत नहमीं तट माजून राहतात, याचें कारण तिन्हाइताकडे धांव घेण्यास सांपडते. आणि तो तिन्हाईत उच्च वर्गांतला असेल तर खुशामत करून हलक्या दर्जाचा असल्यास लांच चारून, प्रसन्न करून घेतां येतो. व मोठ्या दर्जाचा असो ल्हान दर्जाचा असो तो हांजी हांजी करून, आणि चुगलखोरपणा करून केव्हांहि वश करितां येतो, हिंदुस्थानची शेतकीची स्थिती आणि शेतकऱ्यांची दैन्यावस्था यासंबंधीं पाहतां ब्यूरॉक्रसी नालायख आहे असें स्पष्ट सिद्ध होतें.

मागें पडत चाललेल्या धंद्याचें पुनरुज्जीवन. नवीन नवीन धंद्यांचें प्रवर्तन, जलमार्गांची निगा आणि किनाऱ्याकिनाऱ्यानें वाहतुक करणारीं जहाजें, नीळ आणि इतर एतद्देशीय रंग यांचे जर्मनांनीं तयार केलेल्या कृत्रिम रंगांच्या चढाओढींत संरक्षण इत्यादि बाबीसंबंधीं सरकार काय खटपट करतें, ही कै. गोपाळराव गोखल्यांची कसोटी लावल्यास वर सांगितल्या प्रकारची अधिकारीवर्गाची नालायकी दिसून येईल. देशांतील उत्पादक द्रव्यांची जोपासना करण्यांत आमच्या अधिकारी-वर्गाचा आळस आम्हांस भोंवतो आहे. हींच उत्पादक द्रव्यें जर्मन लोक आपल्या देशास नेत आहेत तरी आमच्या अधिकारीवर्ग तिकडे बेफिकीरपणानें खुशाल कानाडोळा करीत आहे, आणि अजूनसुद्धां या प्राण घेणाऱ्या तटस्थ वृत्तीचा अवलंब करून आमचा अधिकारीवर्ग, जर्मनी लोक आपल्या सरकारच्या मदतीनें नवीन साहस करून आम्हां हिंदी लोकांचा आमच्या स्वतांचा निसर्गप्राप्त वारसा खुशाल बुचाडून आमची हिंदी बाजारांतून हकालपट्टी करीत असतां सुखानें निद्रा करीत आहे.

सर्व संपन्न देशांत हस्तकौशल्याचे धंदे आणि शेतकी, परस्परास टेका देऊन एक-मेकांस सहाय्यक होत असतात. आयर्लंडांतील अठराविश्वे दारिद्र्य, आणि त्या हतभागी देशांतील अर्ध्या अधिक प्रजेचे देशांतराप्रत गमन, हीं दोन अरिष्टें ग्रेट-ब्रिटननें त्याच्या लोकरीचा व्यापार नाहींसा केल्यामुळेंच ओढवलीं. आणि यामुळें आयरिश लोकांना आपल्या उपजीविकाकरितां शेतकीवर सर्वस्वी अवलंबून

रहाणें भाग पडलें. हुबेहुब अशाच कारणामुळें असाच प्रसंग परंतु फार विस्तृत प्रमाणावर आमच्यांवर येऊन गुदरला आहे. हिंदुस्थानांत १८९१ आणि १९०१ च्या खानेसुमारीची तुलना करून 'इंपीरियल ग्याझिटिअर' कर्त्यांनीं म्हटल्याप्रमाणें "हिंदुस्थानांतहि असाच एक जमीन वगैरे नसलेला वर्ग उत्पन्न होत आहे व त्यामुळें पुढें मागें सांपत्तिक बाबतींत धोका उत्पन्न होण्याचा संभव आहे. "वर्षांतून कांहीं महिनेपर्यंतच शेतीवर पोट भरून असल्यानें इतर महिन्यांत बरेचसे शेतकरी व मजूर मोठ्या उद्योगधंद्याच्या शहरांत घालवतात." हंगामाच्या दिवसांत आयरिश मजुरांचा भरणा विलायतेंत होत असल्याची, हें ऐकून, कित्येकांस आठवण होईल. प्रो. राधाकुमुद मुकर्जी ह्यांनीं जुन्या काळच्या खेड्यांतील राहणीवर जोर देऊन म्हटलें आहे कीं,

अद्यापहि खेड्यांतल्या खेड्यांत सर्व गरजा भागत आहेत आणि खेडें हें एक देशांतील स्वतंत्र असाच भाग आहे. खेड्यांतील लोकांस पुरेसें धान्य तेथील शेतकरी पैदा करितात. लोहार त्यांचे नांगर व लोखंडी भांडी तयार करतो, त्याच्या मोबदला म्हणून त्याला पैसा देत नाहींत तर परस्परांच्या गरजा परस्पर भागवंतात. तेथील लोकांकरितां कुंभार मडकी घडतो, कोष्टी कापड विणतो, आणि तेली तेल गाळतो. शेतकऱ्यांकडून परंपरागत ठरलेला धान्याचा हिस्सा प्रत्येक शेतकरी त्यांस ह्या कामाकरितां देत असतो. याप्रमाणें पैशावांचून ही सर्व देवघेव चालत असते. खेड्यांतील लोकांस पैसा हा देवघेवीचें साधन म्हणून उपयोगांत न आणतां तो ते सांचवितात. बराचसा पैसा मिळाल्यास तो ते पुरून ठेवतात किंवा चांदी सोन्याचे दागिने करतात.

दारिद्र्याच्या दडपणामुळें ही स्थिति आतां बदलत असून खेड्यांतील लोक शहराचा मार्ग धरीत आहेत. तेथें खेड्यांतील परस्परांच्या सहाय्या ऐवजीं शहरांत एकमेकांशीं चाललेल्या स्पर्धेचें त्यांस वळण लागतें. हा फरक शहराजवळच्या खेड्यांतील लोक व त्यापासून दूर असलेल्या खेड्यांतील लोक ह्यांच्या वर्तनांत स्पष्टपणें दिसून येतो. हा जो नैतिक आणि सांपत्तिक ऱ्हास होत आहे त्याचा प्रतिकार करण्यास पूर्ववत खेड्यांतील सर्वांगपूर्ण व मजेदार राहणीचें पुनरुज्जीवन केलें पाहिजे व त्या करितां ग्रामपंचायतीकडे कांहीं अधिकार सोंपविले पाहिजेत. मी आतां ह्याच प्रश्नाचा खल करीत आहे. खेड्यांतील उद्योगधंदे अशानें पुनः

सांवरतील आणि सहकारी पतपेढ्यांच्या योगानें त्यामध्यें दळणवळण उत्पन्न होईल. 'पतपेढ्या आणि पंचायती' ह्या छोट्याशा पुस्तकांत मि. सी. पी. रामस्वामी अय्यर म्हणतात कीं,

" सर्वांगपूर्ण अशा पंचायती व सहकारी पतपेढ्या स्थापिल्यानें खेडें सोडून शहरांत जाण्याच्या लोकांच्या प्रवृत्तीस आळा बसेल व त्यांची राहणी सुधारून दारिद्र्यहि कमी होईल. खेडगांवांतील उद्योगधंदे पुन्हां ऊर्जितावस्थेस येतील आणि परस्परांत सलोखा वाढेल. हिंदुस्थानांतील खेडींपाडीं हीं जर नीट व्यवस्थित ठेविली तर परस्परसहाय्यक अशा औद्योगिक संघटनेचा पाया त्यांच्यावर सहज रचतां येईल. "

ते पुढें म्हणतात कीं,

" पंचायती स्थापण्याच्या प्रश्नाचा विचार करतांना कित्येक गोष्टींकडे लक्ष दिलें जात नाहीं. ह्या महत्वाच्या गोष्टींपैकीं पहिली लहान लहान धंद्यांचें पुनरुज्जीवन ही होय. लहान सहान शेतकीच्या ऱ्हासाबरोबर लहान सहान उद्योगधंद्यासहि उतरती कळा लागते हें आपणांस जसें युरोपांत तसेंच हिंदुस्थानांतहि दिसून येतें. फ्रान्ससारख्या देशांत शेतीपासून खेड्यांतील उद्योगधंद्यांस आश्रय मिळतो आणि थोडी थोडी शेती करणारे तेथलि शेतकरी चरितार्थास जराशी मदत म्हणून एखादा लहानसा धंदा करितात. हिंदुस्थानांतील खेड्यांचें नष्टचर्य हा केवळ राजकीयच नव्हे, तर सांपत्तिक व औद्योगिक प्रश्नांपैकीं मोठा प्रश्न आहे. युरोपमध्यें सुधारणेचा प्रवाह शहरांतून खेड्यांत जातो हिंदुस्थानांत त्याच्या उलट स्थिती आहे. आमचा समाजव्यवस्थेचा केन्द्र खेडें हा आहे, शहर नव्हे. आमचे कारागीर आपले उद्योगधंदे झोंपड्यांतून चालवितात आणि बाह्य व्यापारी जगाशीं त्यांचा फारसा संबंधहि येत नाहीं. खेड्यापाड्यांतलि उद्योगधंद्यांच्या पायावर विस्तृतशा औद्योगिक सहकार्याची उभारणी करणें ह्यावर पुष्कळशी भर देण्याची अलीकडे प्रवृत्ती दिसून येत आहे. ह्या प्रवृत्तींतच कारागिरांचे संघ, मजुरांचें संघ वगैरेंचें मूळ आहे आणि कच्चा माल उत्पन्न करणारे लोक आणि त्यांचा उपभोग घेणारे लोक ह्यांच्यांत सध्यां संपत्तिची जी विषम तऱ्हेनें वांटणी होत आहे ती बदलून सर्वांत समान वाटणी व्हावी व सर्वांचें सहकार्य असावें ही कल्पना ह्याच्या बुडाशीं आहे. हिंदुस्थानांत आजवर थोडी-

शेती करणाऱ्या लोकांच्या भरणा पुष्कळ आहे. आणि त्या योगानें युरोपियन राष्ट्रांत थोड्याच लोकांच्या हातांत संपत्ती एकवटल्यानें जे दुष्परिणाम घडून येतात ते इकडे घडले नाहींत. आमची समाजप्रियता आणि आमच्या कुटुंबव्यवस्थेची तत्वें ह्या दोन्ही गोष्टीमुळें संपत्ती थोड्यांच्याच हातीं जाण्यास अडथळा उत्पन्न होतो. मोठमोठे प्रचंड कारखाने न निघण्याचें कारण हेंच होय. ''

मोठमोठे कारखाने असलेल्या शहरांतील दुर्दशेचा अनुभव पाहून ज्या गोष्टीकडे इंग्लंड वळत आहे त्या फेरबदलाची जरूरी आतां अतिशय भासूं लागली आहे.

इंग्रज श्रोतृसमुदायापुढें येथील सामान्य स्थितीचें वर्णन करतांना कै० गोपाळराव गोखले म्हणाले कीं,

'' तुमचें वार्षिक उत्पन्न सरासरी दर माणशीं ४२ पौंड ( ६३० रुपये ) पडतें तर आमचें सरकारी आंकड्यांप्रमाणें पाहतां सारें २ पौंड ( ३० रु. ) व खासगी लोकांच्या हिशेबानें तर १ पौंडापेक्षां ( १५ रु० पेक्षां ) थोडेंसे जास्त पडतें. तुम्ही दरमाणशीं परदेशाचा माल १३ पौंडाचा ( १९५ रु. चा ) घेतां तर आम्ही फक्त ५ शिलिंग म्हणजे रु. ३-१२-० चाच घेतो. पोस्टांतील ब्यांकेंत तुम्हां लोकांचे १४ कोटी ८० लक्ष पौंड व ट्रस्टींच्या ब्यांकेंत ५ कोटी २० लक्ष पौंड आहेत तर तुमच्यापेक्षां ७ पटीनें आमची लोकसंख्या अधिक असतांहि आमचे सारे ७० लक्ष पौंडच पोस्टाच्या ब्यांकेंत आहेत आणि यांतलेहि ७ लाखांपेक्षां थोडेसे जास्त युरोपियनांचेच आहेत: समायिक भांडवलाच्या कंपनींतून तुम्ही लोकांनीं १ अब्ज ९० कोटी पौंडांचें भांडवल प्रत्यक्ष गुंतविलें आहे तर आमचें २ कोटी ६० लक्षच आहे आणि त्यांतील पुष्कळसे युरोपियनांचेंच आहे. आमच्यांतील ५ लोक शेतीवर अवलंबून आहेत व शेती दिवसेंदिवस निकृष्ट होत चालली आहे. आमचे शेतकरी अत्यंत दरिद्री व कर्जबाजारी असल्यानें त्यांना शेतांत घालावयास भांडवलच नाहीं. आणि त्यामुळें २५ वर्षांमागें सर जेम्स केर्ड ह्यांनीं म्हटल्याप्रमाणें सर्व हिंदुस्थानभर शेती म्हणजे जणूं काय जमीन हीणकस करण्याची युक्तीच होत चालली आहे. जमीनीचें उत्पन्न दर एकरीं खालावत चाललें असून तें तुमच्या इकडे जर ३० मापें होत असेल तर आमच्या हिंदुस्थानांत तें फक्त ८.९ मापेंच होत आहे. ''

## ( फ ) हिंदी लोकांस संधी द्या

आम्ही इतकेंच म्हणतों कीं, लोकांना शिक्षण, आरोग्य व सुबत्ता हीं कांहीं तुम्ही प्राप्त करून दिलीं नाहींत. तर मग जपान किंवा इतर राष्ट्रांनीं स्वदेशोद्धाराकरितां जे प्रयत्न केले तसे करण्याची वेळ अद्याप आली नाहीं काय? हें मागणें कांहीं खात्रीनें गैरवाजवी नाहीं. गोरे लोक जर म्हणूं लागले कीं, रयतेची काळजी आम्हालांच आहे, सुशिक्षितांस नाहीं त्यांचे लक्ष फक्त पैसा व सत्ता ह्यांकडेच असतें तर त्यांना एवढेंच उत्तर आहे कीं, बाबांनों ह्या राष्ट्रीयसभेकडे पहा तेथील भाषणें ऐका व त्यांचें रयतेबद्दलचें ज्ञान व कळकळ बघा. आपल्या देशाच्या दारिद्र्याकडे पाहून जर ते हताश झाले तर तो त्यांचा अपराध नव्हे. पण मी कशाला न्यायमूर्ती अबदुर रहीम हेच त्यांस उत्तर देऊं देत. ते म्हणतातः—

" हिंदुस्थानांतील कोट्यावधी लोकांचे हितसंबंध रक्षण करणारे प्रतिनिधी गोरे अधिकारीच आहेत, अधिकारी किंवा विन अधिकारी हिंदी लोक नव्हेत, असें जर कोणी म्हणत असेल तर हें असलें उद्धटपणाचें विधान करण्याचें धाडस करवतेंच कसें हेंच मला गूढ आहे. इंग्रज लोकांस हिंदी भाषा येत नसल्यानें व त्यांची राहणी व विचार भिन्न असल्यानें त्यांपैकीं जे कांहीं अतिशय तीव्रबुद्धीचे असतील त्यांनाच हिंदी रयतेचे विचार कळतील. सुशिक्षित हिंदी लोकांस हें ज्ञान उपजतच असतें आणि दोघांचेहि धर्म व रीत रीवाज एकच असल्यानें त्यांचें ज्ञान आणि त्यांची सहानुभूती ही जडवादी राष्ट्रांतील लोकांच्या पेक्षां पुष्कळ पटीनें खरी असते. "

अधिकारी वर्गाच्या अंगीं हुषारी नव्हती म्हणून त्यांचें कार्य फसलें असें मात्र कोणी समजूं नये, कारण इंग्रजी व्यापारी व कारखानदार हे हिंदुस्थानांत चांगले गब्बर झाले आहेत. पण ह्या असल्या गोष्टीबद्दल अधिकारी फारशी फिकीर करीतच नाहींत. रशियांत सुद्धां रशियन अधिकाऱ्यांनीं रशियन रयतेकरितां कांहीं केलें नाहीं. लोकांनीं त्यांचे हुकूम पाळले व कर दिले म्हणजे त्यांचें काम झालें. अधिकारीवर्गाची कोठेंहि गेलें तरी हीच तऱ्हा. आणि म्हणून आमचें युद्ध व्यक्तीशी नसून पद्धतीच्याच विरुद्ध आहे. आम्हांला गोरे जाऊन तसल्याच तऱ्हेनें वागणारे काळे अधिकारी नकोत. आम्हांला सिव्हिल सर्वंटांनीं चालविलेलें सरकारच नको.

## ( ग ) इतर कसोट्या

दुसऱ्या, तिसऱ्या किंवा चौथ्या कसोट्यांबद्दल मी फारसा वेळ घेत नाहीं कारणः—

**दुसरी कसोटी—स्थानिक स्वराज्य**—१८६९–७२ च्या दरम्यान लॉर्ड मेयो ह्यांनीं अधिकारविभागणींचे कांहीं प्रयत्न केले होते. त्यास कीननें ' होमरूल ' ! असें म्हटलें आहे. हेंच धोरण पैशांच्या बावतीखेरीज लॉर्ड रिपननें चालवून कीननें म्हटलेल्या होमरूलमध्यें थोडासा जिवतपणा आणण्याची खटपट केली. पण आतां कोठें १९१७ मध्यें स्थानिक स्वराज्याचा प्रयोग करून पाहण्यांत येणार आहे. अधिकार विभागणी कमिशनचा रिपोर्ट जरी १९०९ मध्यें प्रसिद्ध झाला तरी अजूनसुद्धां बिनसरकारी अध्यक्ष निवडण्याची पद्धती हिंदुस्थानांत सर्वत्र अमलांत आणूं दिली नाहीं. तेव्हां ह्या दुसऱ्या परीक्षेंत ब्युराक्रसी—अधिकारी वर्ग हरला असेंच म्हटलें पाहिजे.

**तिसरी परीक्षा—कायदेकौन्सिलांत अनाधिकार**—मद्रास प्रांतिक कायदे कौन्सिलांतील काम म्हणजे ' एक फार्स ' आहे असें एका नामदारानेंच म्हटलें आहे. वरिष्ठ कायदे कौन्सिल म्हणजे एक ' वडीशी, सजवलेली नटवलेली वादविवादक सभा ' असें त्याच कौन्सिलांतील एका नामदारानें वर्णन केलें आहे. हिंदी लोकनियुक्त नामदारांनीं आणलेल्या व त्यांपैकीं नापसंत व नापास झालेल्या ठरावांचें एक कोष्टक नुकतेंच प्रसिद्ध केलें होतें त्यावरून ही चरचरीत टीका अगदीं योग्यशीच वाटते. मार्ले–मिंटो ह्यांच्या सुधारणां ग्रथित केलेल्या पार्लमेंटच्या कायद्यांतील फायद्यांस मात्र ह्या अधिकारीवर्गानें हरताळ फांसावा तेव्हां हिंदी लोकांस कायदे कौन्सिलांत मताधिकार देण्याच्या परीक्षेंतहि अधिकारीवर्ग कुचकामाचाच ठरतो.

**चौथी कसोटी—वरिष्ठ दर्जाच्या जागांवर हिंदी लोकांच्या नेमणुका**—या बाबतींत अधिकारीवर्गास—आपली नाखुषी दर्शऊन विनाशक चळवळ करावयाचें कारणच नव्हतें कारण रिपोर्टांतसुद्धां त्यांच्या हक्कांचें संरक्षण केलें आहे.

राज्यकारभाराच्या खर्चाच्या वाढीसंबंधी जर गोखल्यांच्या कसोट्याशिवाय आणखी एक कसोटी लावली तर त्या कसोटीस मात्र अधिकारीवर्ग पुरा उतरेल.

प्रस्तुत सालच्या जमावंदींचा अंदाज ८, ६१,९९,६०० पौंड असून खर्चाचा अंदाज ८, ५५, ७२, १०० इतके पौंड आहे. ह्यांत नुसता राज्यकारभाराचा खर्चच जमेपेक्षां अर्ध्याहून जास्त आहे.

| | | |
|---|---|---|
| मुलकी खातें, पगार, खर्च | | १, ९३, २३, ३०० पौंड |
| किरकोळ | | ५२, ८३, ३०० ,, |
| लष्करी खर्च | | २, ३१, ६५, ९०० ,, |
| | एकूण | ४, ७७, ७२, ५०० पौंड |

हा भयंकर खर्च कमी कसा करावा हा अत्यंत मोठा प्रश्न आपणापुढें आहे, पण तो स्वराज्य मिळाल्याखेरीज सुटणार नाहीं.

ह्याप्रमाणें पाहिलें असतां हीं स्वराज्याच्या मागणीचीं दुय्यम कारणें सुद्धां मोठ्या महत्त्वाचीं आहेत. आणि दारिद्र्यानें हिंदुस्थानचें जर दिवाळें वाजवावयाचें नसेल, तर स्वराज्य देण्यास हीं कारणें पुरेशी आहेत. दारिद्र्यानें लोकांचें आयुष्य कमी झालें असून मृत्युसंख्येचें प्रमाणहि वाढलें आहे, रोगांचा प्रसार होत आहे आणि जमीन निकस होत चालली आहे. लोकांच्या स्थितींत कांहीं तरी महत्त्वाची सुधारणा घडवून आणणें अवश्य झालें असून त्यानेंच 'भुकेची क्रांति' टळेल असें ज्या इतिहासज्ञांस हिंदुस्थानच्या जनतेचें दारिद्र्य माहीत आहे त्यांस वाटत आहे. ह्या दारिद्र्याचीं जीं अनेक कारणें आहेत त्यांत परकीय सरकाराचें आमच्या स्थितीचें असलेलें अज्ञान हें एक होय. पाश्चात्य राज्यपद्धति येथें उभारून आमच्या लोकसत्ताक आणि सामाजिक संस्थांचा विध्वंस करून आम्हांस अपरिचित व त्रासदायक असलेली अधिकारीवर्गाची—व्युराक्रसीची—पद्धति आमच्यावर लादली गेली आहे. ह्या पद्धतीची निंदा करण्यापेक्षां ती बदलणें हें आतां अपरिहार्य झालें आहे. ज्या वेळेस बंड करण्यापासून होणारीं दुःखें नित्य भोगित असलेल्या हाल-अपेष्टांपेक्षां कमी असतात. त्यावेळेस गरीब प्रजा बंड करण्यास प्रवृत्त होते. दिवसानुदिवस जमिनींतून कमी कमी उत्पन्न येऊं लागलें आहे व खेड्यांतील लहान लहान उद्योग धंदे बुडूं लागले आहेत; आणि कांहीं तर अजिबात नामशेष झाले आहेत. व या मुळें आज लाखों लोकांची होत असलेली ही उपासमार टाळण्यासाठींच आम्ही होमरूल अथवा स्वराज्याची मागणी करीत आहोंत.

## राजकीय सुधारणा.

यांचे एकंदर ३ भाग पडतात आणि ते असे.

( १ ) हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेमधील सुधारणा.

( २ ) प्रांतिक राज्यव्यवस्थेमधील सुधारणा.

( ३ ) स्थानिक स्वराज्यासंबंधीं सुधारणा.

याचा आपण शेवटची बाब प्रथम घेऊन विचार करूं. कारण त्यामुळें आपण राज्यव्यवस्थेच्या पायापासून शिखरापर्यंत आपणांस जातां येईल. नाहींतर चूक होण्याचा संभव आहे. परंतु मला हें प्रथमच सांगितलें पाहिजे कीं, गतवर्षीं कॉंग्रेसच्या स्वराज्याच्या घटनेंत मागितलेल्या सुधारणा सरकारनीं दिल्याखेरीज स्थानिक स्वराज्याची कोणतीहि घटना यशस्वी होणार नाहीं. जर खरोखरच कांहीं सुधारणा म्हणून कांहीं द्यावयाच्या तर त्या घटनेंत मागितलेल्या सर्व सुधारणा आम्हांला मिळाल्याच पाहिजेत. कारण ती आमची अगदीं कमींत कमी मागणी आहे. त्यापेक्षां खालीं जाणें आम्हांला शक्य नाहीं. त्यांतील सुधारणा म्हणजे आम्हांस हवे असलेल्या पैकीं अगदीं कमींत कमी सुधारणा आहेत.

लॉर्ड रिपनच्या कारकीर्दीपासून आजपर्यंत जी निरर्थक कल्हई स्वराज्याला लावण्यांत येत आहे तीपासून इतकें मात्र खास निष्पन्न झालें आहे कीं, सदृढ शरीर आणि व्याधिग्रस्त अपरिपक्व मेंदु हे एके ठिकाणीं असणें जितकें शक्य आहे तितकेंच हल्लींसारखीं सरकारी बहुमत असलेलीं कायदेकौन्सिलें व कार्यकारी कौन्सिलें असताना खरें स्थानिक स्वराज्य असणें शक्य आहे हिंदी लोकांना राज्यकारभार चालविता येणें शक्य नाहीं. या कल्पनेनेंच अधिकारी वर्ग प्रातिनिधिक पद्धतीकडे दुर्लक्ष करितो. आम्ही या जुन्या राज्यपद्धतीला कंटाळलों आहोंत. जर आंग्लोइन्डियन्स आम्हांस लहान मुलें समजत असतील तर कांहीं हरकत नाहीं. मग आम्हां लहान मुलांना रांगूं द्या. उठून चालण्याचा प्रयत्न करूं द्या; आणि पडूं द्या. कारण पडल्याशिवाय तोल संभाळतां येत नाहीं. जर ते धनुष्याच्या दोरीप्रमाणें चालण्यास शिकले तर ते नेहमीं धनुकलीप्रमाणें वक्रगती वृद्धिंगत करतील. परंतु ज्या गोष्टीविषयीं हिंदुस्थानच्या लोकांनीं प्रयत्न केला त्यांत त्यांना यशच आलें आहे असें मी म्हणते हिंदुस्थान व विलायत सरकार जर कॉंग्रेस लीगचा ठराव पसंत करण्याच्या अगो-

दर राजसत्तेच्या दडपणाखालीं स्थानीक स्वराज्यास आरंभ करून त्यांत व इतर खात्यांत यशाबद्दल तगादा करील तर सरकारचें प्रगतीचें पाऊल पुढें पडणार नाहींच. मी हिंदुस्थान व विलायतसरकारला सदिच्छेनें व प्राञ्जलपणें असें सांगते कीं, हिंदुस्थान स्वतःच्या हक्काचा तगादा लावीत आहे पण कृपा करा म्हणून भीक मागत नाहीं. काय दिलं म्हणजे समाधान होईल हें सांगण्याचे हिंदुस्थानचें काम नाहीं. ह्या माझे म्हणण्याला इंग्लंडचे मुख्य प्रधानाचे वाक्यांचा आधार आहे. व कोणाहि अधिकाऱ्याला हिंदुस्थानला " इतकेंच पुरें, अधीकांची जरूरी नाहीं " असें म्हणतां यावयाचें नाहीं. आम्हां हिंदवासीयांना अशा स्थितींत इंग्लंड मधील राजसत्तेचा आधार आहे. मि. ऑस्क्विथसाहेबांनीं म्हटल्याप्रमाणें पूर्ण स्वातंत्र्याकरितां लढणाऱ्या संयुक्तांचा आपणांस पाठिंबा आहे. अमेरिके-मधील युनायटेड स्टेट्सच्या लोकसत्ताक राज्यपद्धतीचा आपणास आधार आहे. इंग्लंडला आपलेच परंपरागत हक्क नाकारतां येणार नाहींत. आपल्याच मोठ मोठ्या राजकारणपटूंचें म्हणणें खोटें आहे असें म्हणतां येणार नाहीं, व ज्या लोकसत्ताक राज्यपद्धतीचें नेतृत्व त्यांचेकडे आहे त्या पद्धतीला काळीमा आणतां येणार नाहीं.

## स्वराज्यास अपात्र

आपणास पुनः पुनः कंटाळा येईपर्यंत असें सांगण्यांत येतें कीं हिंदुस्थानचें लोक स्वराज्यास नालायक आहेत, कारण तें आजपर्यंत वेगवेगळ्या एकतंत्री राज्यपद्धतीखालीं राहिलेले आहेत. पण हें मत पूर्व दुराग्रहानें पछाडलेल्या अधि-कारी वर्गाचे आहे, सत्यान्वेषी इतीहासकारांचें कांहीं हें मत नव्हे. नेक नामदार व्हाईसरॉयसाहेब व भारत मंत्री मॉंटेग्यूसाहेब यांना स्वराज्य–संघातर्फे पाठवि-लेल्या विनंती अर्जांतील खालील उतारा लक्ष्यांत घेण्यासारखा आहे.

" हिंदुस्थानांत स्वराज्य पूर्वी नव्हतें.असा मुद्दा कोणीहि बहुश्रुत मनुष्य या पुढें आणणार नाहीं. मेन व इतर इतिहासकार लोकसत्तात्मक राज्यपद्धती मुळची आर्यलोकांचीच होती; व ज्यावेळीं आर्य लोक हिंदुस्थानांतून यूरोपांत गेलें त्या वेळीं त्यांनीं ती बरोबर नेली ही गोष्ट कबूल करतात. पंचायती—खड्यांतील लोकसत्ताक राज्यपद्धती–ह्या हिंदुस्थानांतील फार जुन्या संस्था होत. त्या गेल्या शतकांतील ईस्ट इंडिया कंपनीच्या अरेरावी धोरणामुळें नाहींशा झाल्या. वेग-

वेगळ्या बाबींत त्या अजूनहि अस्तित्वांत आहेत. जातींतील एखाद्या माणसाचें रावाशीं व रंकाशींहि नातें असणें शक्य असल्यामुळें ह्या जातीमध्यें लोकसत्ताक राज्यपद्धतीच आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. साम्राज्यातील दर्जा हा संपत्तीवर व पदव्यावर अवलंबून नसून तो विद्वत्ता व पेशा त्यांवर अवलंबून असतो. हिंदुस्थानला स्वराज्याचेंच तत्व मान्य आहे व पूर्वापार चालत आलेल्या व हल्लीं चालू ठेविलेल्या संस्थांतून हिंदुस्थानानें हेंच तत्व अमलांत ठेवलें आहे.

ह्याच म्हणण्याला आधारा दाखल आंग्ल सुशिक्षितांचें खालील उतारे पुरें होतील.

इ. स. १८६४ सालीं सर जॉन लॉरेन्स यांनीं म्हटलें होतें कीं:—" सार्वजनिक हितबुद्धि त्यांच्या स्वभावांत मुरली असल्याकारणानें हिंदी लोक स्वतःच्या राज्यकारभार करण्यास पूर्ण लायक आहेत. ग्रामसंस्था लोकसत्तात्मक अशीं लहान लहान राज्येंच आहेत व ह्या सर्व संस्था अत्यंत टिकाऊ आहेत. स्वहिताच्या व कर्तव्याच्या दृष्टीनें आणि ज्या परिस्थितींत आपण हिंदुस्थानांत राहत आहोंत ती परिस्थिति लक्षांत घेतां हिंदुस्थानच्या राज्यकारभाराचें काम हिंदी लोकांवरच सोपविणें आपल्यास श्रेयस्कर आहे. "

इ. स. १८७१ सालीं सर बार्टल फ्रियर यांनीं लिहून ठेविलें आहे कीं, " हिंदी समाजाच्या व्यवस्थेकडे पाहिलें असतां आपल्यास असें स्पष्ट दिसतें कीं, हिंदी लोकांना निवडणुकीचें तत्त्व तर अवगत आहेच पण सर्वांचे प्रतिनिधी पंचायतींत असावे अशी व्यवस्था ते निरनिराळ्या मार्गानें करीत असत. आणि सॅक्सन लोकांप्रमाणेंच स्वजातीयास बक्षीस देणें अगर शिक्षा करणें हीं दोन्हीं कामें त्या त्या लोकांच्या जातसभांतून होत असत. यावरूनच हिंदी परंपरा आपल्यास स्पष्ट दिसत आहे.

मि. चिशोम ॲन्से म्हणतातः—आपण पौर्वात्य लोकांना प्रतिनिधिक संस्था चालविण्याचें शिक्षण दिलें पाहिजे असें म्हणतों त्यावेळीं पौर्वात्य लोकांमधूनच स्थानिक स्वराज्याची कल्पना प्रथम निघाली ही गोष्ट साफ विसरली जाते. स्थानिक स्वराज्य हें पौर्वात्यांच्या इतकेंच पुराणें आहे. लोकांचा धर्म कोणताहि असो पौर्वात्य देशांत सर्वत्र स्थानिक-स्वराज्य संस्था दृष्टोत्पत्तीस येतात व त्यांचें असें एक जाळें तयार झालें आहे कीं प्रतिनिधीक तत्त्वांवर उभारलेल्या स्वराज्याची थोडीबहुत घडलेली मूर्ती आपल्या हातीं आहे.

वरील सारखे पुष्कळ उतारे मी देऊं शकेन पण त्याचा उपयोग काय? शहाण्या व सूज्ञ लोकांना ते सर्व माहीत आहेत व आम्हीं कितीहि ओरड केली तरी तादितर लोक आमचें म्हणणें कधींहि कबूल करणार नाहींत.

प्रस्तावने दाखल वरील गोष्टी सांगून मी—

## स्थानिकस्वराज्याची सुधारणा

कशी करतां येईल यासंबंधीं कांहीं गोष्टी सांगणार आहे.

### (अ) सर्व साधारण तत्त्वें.

आपल्याला तीन गोष्टींसंबंधानें विचार करावयाचा आहे (१) खेडेगांव (२) अशा गांवांचा समुदाय. यांतच दोन गांवामधील जमिनीचा समावेश होईल (३) निरनिराळे ताळुके व तहशील मिळून जाहलेला जिल्हा, यांतच सरकारी जंगलांचा विचार केला जावा.

अशा रीतीनें विभागणी करण्यानें आपल्यास पूर्वकालची स्मृति होते. प्रत्येक गांवांत एक मुख्याधिकारी असे. दहा गांवांच्या समुदायावर एक मोठ्या दर्जाचा ग्रामाधिकारी असे. याप्रमाणेंच शंभर अगर शंभराचे द्विगुणित अगर त्रिगुणित अशा समुदायावर वरिष्ठ प्रकारचे अधिकारी असत. आपल्या पूर्वजांना ही चढती व्यवस्थित पद्धति फार आवडत असे. कारण पद्धतशीर काम करण्याची संवय त्यांच्या अंगीं पूर्ण बाणली होती.

"ज्या गोष्टींत आपला हितसंबंध आहे त्या गोष्टीचा निकाल सर्वानुमतें व्हावा" या तत्वानुसार प्रत्येक खेडेगांवांत तेथील स्थाईक राहिवाशास मत असावें या योगानें आपल्या देशांतील प्रत्येक पुरुषास व बायकोस मत मिळेल. मतदाराचा हितसंबंध ज्यांत आहे अशा प्रश्नांचा निकाल मतदारानें प्रत्यक्ष निवडल्या गेलेल्या प्रतिनिधींकडून व्हावा. व सर्व राष्ट्रीय प्रश्नासंबंधानें चर्चा वरिष्ठ दर्ज्याच्या पण अप्रत्यक्ष रीतीनें निवडून आलेल्या लोकांकडून व्हावा. पुढें शिक्षण व अनुभव यांची जसजशी वाढ होईल तसतसा वरिष्ठ व स्थानिक कायदेकौसिलांत प्रतिनिधि निवडण्याचा हक्क दिला जावा. या बाबतींत इंग्लंडचे उदाहरण आपण डोळ्यापुढें ठेविलें पाहिजे. आणि प्रथमतःच स्थानिक कौन्सिला-व्यतिरिक्त इतर कौन्सिलांत मजुरांना प्रत्यक्ष मतांचा हक्क दिला जाणार नाहीं. तालुका बोर्डांत ज्याच्याकडून

निवडणूक होते त्यांच्याकडूनच प्रांतिक कायदे कौंसिलांत प्रतिनिधींची निवडणूक व्हावी अशी आमची योजना आहे.

प्रत्येक गांवचे प्रश्न त्या त्या गांवांतील ग्रामपंचायतीनें सोडवावे या तत्वानुसार सत्ता व अधिकाराची वांटणी करण्यांत येईल. परंतु त्या गांवांतील प्रश्नाचा परिणाम सर्व जिल्ह्यावर होत असेल त्यावळीं वरिष्ठ ग्रामसभेनें त्या प्रश्नांचा निकाल करावा व अशा प्रश्नांच्या वाटाघाटींत वरिष्ठ ग्रामसभांच्या अधिकार ग्रामसभेनें मान्य केला पाहिजे. आपण शिक्षणखात्याचें उदाहरण घेऊं. प्रांतिक सरकारच्या शिक्षण खात्यानें शिक्षण क्रम आंखावा व प्रांतिक सभेनें तो पसंत करावा. या योजनेंत प्रांतिक विश्वविद्यालयें, कालेजें, हायस्कुलें, दुय्यम प्रतीच्या व प्राथमिक शाळा, धंदे शिक्षणाच्या शाळा आणि धंदशिक्षण, पोटाचा धंदा म्हणून शिकणाऱ्या लोकांकरितां काढलेल्या उद्योग शाळा या सर्वांचा समावेश होईल. प्रत्येक गावांत एक प्राथमिक शिक्षणाची शाळा असलीच पाहिजे. या शाळेला जोडूनच त्या त्या गावांत विशेषत्वानें चालू असणाऱ्या धंद्यांचें शिक्षण देणारे धंदे शिक्षणाची शाळा काढिली जावी. प्रत्येक तालुक्यांचे भागांत एक दुय्यम प्रतीची शाळा असावी आणि प्रत्येक तालुक्यांत एकाहून अधिक अगर निदान एक हायस्कूल असावें. प्रत्येक जिल्ह्यांत एक अगर एकाहून अधिक कालेज असावे. व प्रत्येक प्रांतांत एक अगर अधिक विश्वविद्यालय असावे. परंतु ग्रामसभाही त्या गांवच्या प्राथमिक शाळेसंबंधीं जबाबदार धरली जाईल. त्यानीं हुषार मुलाला अगर मुलीला दुय्यम प्रतीचे शिक्षण देण्याकरितां तालुक्यांतील दुय्यम प्रतीच्या शाळांत पाठविण्याची व्यवस्था करावी. या योगानें गांवाबाहेरील जिल्ह्याच्या निरनिराळ्या संस्थाशीं या शाळेचा संबंध जडेल. त्यांचा अधिकार त्यांच्याच शाळेवर चालला जाईल व प्रांताच्या शिक्षण व्यवस्थेंत त्यांना त्यांचा योग्य वांटा मिळेल

## ब ( पंचायत )

प्राचीन काळापासून हिंदुस्थानांत सर्वत्र ग्रामसंस्था अस्तित्वांत होत्या व त्यांचे काम सुव्यवस्थित पद्धतर्तानें चाललें होतें ही गोष्ट सर्वश्रुत आहे. देशाच्या कांहीं भागांत शिलालेख व ताम्रपट सांपडले आहेत. त्यावरून ही गोष्ट सिद्ध होते. या ग्रामसंस्था दक्षिण भागांत गेल्या शतकापर्यंत अस्तित्वांत होत्या व ब्रह्मदेशांत आज तागाईत चालू आहेत. सर टॉमस मनरो यांच्या रयतवारी पद्धतीच्या अमलामुळें

या संस्था इ. स. १८२० पासून मृतप्राय होत चालल्या आहेत. मि. सी. पी. रामस्वामी अय्यर आपल्या पुस्तकांत म्हणतातः—

" कौटिल्याच्या अर्थशास्त्रामध्यें तिसऱ्या पुस्तकाच्या दहाव्या भागांत असें सांगितलें आहे कीं सार्वजनिक उपयोगाची सर्व इमारत कामें गांवांतील लोकांनीं करावीं. व त्यांची व्यवस्थाहि त्यांनींच ठेवावी. प्रो. रिस डेव्हिस म्हणतात कीं, बुद्ध ग्रंथांतून, गांवांतील लोकांनीं मोहल्ले, धर्मशाळा व गांवा गांवांतील रस्ते व बाग, तयार केल्याचा उल्लेख सांपडतो. ( बानर्जी यांचे पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन इन् एन्शंट इंडिया पान २९३ नोट २ पहा. ) म्हैसूर संस्थानांत हल्लींसुद्धां प्रत्येक आठवड्यांत अर्धा दिवस गांवांतील लोक फुकट काम करून सार्वजानिक उपयोगाच्या इमारती बांधतात आणि या इमारतीची किंमत पाहिली असतां आश्चर्य वाटतें. ख्रिस्ती शकाचे पूर्वी चवथ्या शतकांत अर्थशास्त्र लिहिलें गेलें त्यावेळीं प्रत्येक गांव राज्यशकटाचा एक घटकावयव समजला जात असे आणि गांव हेंच राज्ययंत्राचा मुख्य भाग समजला जात असे. वसुलीच्या वगैरे कामाशिवाय न्याय देण्याचें कामहि प्रत्येक ग्रामसंस्था करीत असे. सिलोन येथील ताम्रपटावरून असें दिसतें कीं फौजदारी गुन्ह्यांचा निकालहि जातींच्या पंचायतींत होत असे. मद्रास सरकारसंबंधीं एक गोष्ट सांगितली पाहिजे कीं गेल्या शतकाच्या प्रारंभींच त्यांनीं ग्रामसंस्था जिवंत ठेवण्याची शिफारस केली होती. परंतु त्यांचें सर टॉमस् मनरो पुढें कांहीं चाललें नाहीं आणि ग्रामसंस्था मृतप्राय झाल्या. "

१९१५।१६ सालचा म्हैसूर संस्थानच्या राज्यव्यवस्थेच्या अहवालांत नमूद केलेल्या गोष्टी वरील विधानासच पुष्टी देतात.

पूर्वीचीं खेडीं शेतजमीन व माळजमीन ह्यांच्या आसपास वसलेली असत व तेथील प्रत्येक कुटुंबाला घर आणि आंगणाकरितां जागा फुकट दिलेली असे. पाटील कुळकर्णी वगैरे गांवकामगार व लोहार, परीट वगैरे उपयुक्त धंदेवाले सगळ्या गावांचीं कामें करीत. अशा कामगारांना व कारागिरांना इनामी जमीन दिलेल्या असत. शिवाय बलुत्यांच्या रूपानें गांवांतल्या लोकांकडूनहि त्यांच्या कामगिरीबद्दल मोबदला मिळत असे. पुजारी, शाळामास्तर, ग्रामजोशी, गोवारी, कुंभार वगैरे कमी अधिक दर्ज्याचे अठरा रोजगार अशा रीतीनें संपादले जात. गांव शिवेंतील सर्व जमीन त्या गांवच्या मालकीची असे व खरेदी विक्रीही गांवांतल्या गांवांतच

होई. ग्रामपंचायतींत प्रत्येकाला मत असे व पंचांची निवड त्यांच्या लायकीबद्दल ज्या अटी असत त्या बरहुकूम होत असे.

एडवर्ड बादशहांनीं १९०७ सालीं पांच युरोपियन व एक इंडियनाचें जें विभागणी कमिशन नेमिलें होतें त्याच्या अहवालांत म्हटलें आहे कीं " हिंदुस्थानांत प्रत्येक खेडें हें राज्यघटणेचा पाया आहे. व त्याच व्यवस्थेनुरूप तालुके, जिल्हे व प्रांत यांची मोठ्या प्रमाणावर राज्यघटना केलेली आहे. सरकारी गॅझिटियरमध्यें ग्रामरचनेचा असाच उल्लेख केलेला आहे. " कमिशनच्या रिपोर्टांत गांवांतील या अंतररचनेला स्थानिक स्वराज्यच म्हटलें आहे. व हल्लींची दिवाणी व फौजदारी कोर्टें पोलीस व मुल्की खातीं रयतवारी पद्धती व व्यक्तिस्वातंत्र्य यामुळेंहि स्थानिक स्वराज्यपद्धति नष्टप्राय झाली आहे. तथापि पाटील-कुळकर्णी वगैरे कामगार प्रत्येक खेड्यांत अद्यापही आहेत. मात्र त्यांना वेतन सरकारांतून मिळतें. "

सरकारी पगार मिळत असल्याकारणानें हे कामगार, मामलेदार, कलेक्टर वगैरे वरच्या सरकारी कामगारांचे ताबेदार होऊन आपल्या देशबांधवांचे काळ बनल्या कारणानेंच ह्या ग्रामसंस्था नष्ट झाल्या आहेत. ग्रामसंस्था नष्ट झाल्या ही गोष्ट सदरहू रिपोर्ट कबूल करतो व त्या सुरूं कराव्यांत हेंहि सांगतो तथापि शिक्षण व व्यक्तिस्वातंत्र्य वाढल्याशिवाय स्थानिक स्वराज्याचे हक्क दिले जाऊं नयेत असाही अहंमन्य कामगारांचा ध्वनि त्यांत आहेच. पण त्यावर असा प्रश्न आहे कीं, अनेक स्वाऱ्या अनेक क्रान्त्या होऊनही ज्या ग्रामसंस्था हजारों वर्षें सुरळीत चालल्या त्याच संस्था ब्रिटिशासारख्या न्यायप्रिय सरकारच्या अमदानींतच रसातळास कां जाव्यात. याला उत्तर अधिकारांची दडपशाही हेंच होय. लोकांना जें बरें तें कलेक्टर साहेबांस बरें वाटत नाहीं. होमरूल मिळाल्यानें ह्या ग्रामसंस्था खात्रीनें सुरळीत चालतील.

ह्याच रिपोर्टांत ग्रामसंस्था व ग्रामपंचायतीप्रमाणें जिल्ह्याचे ल्हान विभाग पाडून सबडिस्ट्रिक्ट बोर्ड स्थापन करावेत असेंहि सुचविलें आहे. पण ते मामलेदारांच्या ताब्यांत असावे अशी व्यवस्था केली आहे.

ह्या संस्था मामलेदाराच्या ताब्यांत देणें म्हणजे एखाद्या मुलाचे हात पाय बांधून त्याला चालावयाला सांगण्यासारखेंच आहे. मुलाला चालवयला शिकण्यापूर्वी तोल

संभाळणें शिकावें लागतें, पडेल म्हणून बांधल्यास जसा तो चालू शकणार नाहीं तसेंच गांवांतील लोकांच्या हातून चुका होतील म्हणून जर मामलेदार त्यांस आपल्या तांब्यांत ठेवूं लागेल तर संस्था चालविण्यास लोक कधींहि लायक होणार नाहींत. ऑनरेबल टी रंगाचार्य यानीं मद्रास कौन्सिलांत पास करण्यासाठीं जे ग्राम-पंचायत बिल आणिलें होतें तदनुरोधानें आमचे स्टेट सेक्रेटरी जर एकादा ठराव अमलांत आणतील तर फार बरें होईल. मींहि एके ठिकाणीं सांगितलें होतें कीं, ग्राम पंचायतीचे योगानें गांवकऱ्यांच्या गरजा कळतील व वरिष्ठ अधिकाऱ्यांपुढें मांडता येतील व त्या योगानें ग्रामस्थांचा प्रांतस्थ अधिकाऱ्यांशीं प्रत्यक्ष संबंध येईल व उभयतांचे हितसंबंध वाढून गैरसमज दूर होतील. आपल्या गांवांतील अडचणी कशा दूर कराव्यात त्यांचा ते विचार करूं लागतील तज्ञांची सल्लामसलत घेतील व्याख्यानें करवितील व त्या योगानें ग्रामस्थ व प्रांतस्थ यांच्यांतील दळणवळण व एकोपा वाढेल. खेडेगांवांतील ग्रामपंचायतीप्रमाणें म्युनिसिपाल्टी असलेल्या शहरांतून जे पोट विभाग असतात त्या विभागानिहाय म्युनिसिपाल्टीच्या अमलाखालीं पंचायत असावी आणि पांच हजार लोकवस्तीच्या आंतील गांवीं ही पंचायतच म्युनिसिपाल्टी समजली जावी. म्युनिसिपाल्टी असलेल्या गांवीं ह्या विभाग-पंचायतींकडून, म्युनिसिपाल्टीला लक्ष देतां येत नाहीं अशीं पुष्कळ कामें होतील. आपआपल्या विभागांतील अथवा पेठांतील प्राथमिक शाळा, रस्त्यांची व शौचकुपांची स्वच्छता, गाड्यांचे अड्डे त्याप्रमाणेंच धान्य व दुधतूप यांच्या निर्भेळपणाची काळजी वगैरे आरोग्यवर्धनाच्या हजारों गोष्टी त्याप्रमाणेंच किरकोळ तंटे यांची उत्तम वासलात लावितां येईल; मोठाल्या म्युनिसिपालट्यांनीं या पेठपंचायतीनां त्यांच्या वकूवाप्रमाणें अधिकार दिले म्हणजे झालें.

## (क) तालुकाबोर्ड

ग्रामपंचायती व डिस्ट्रिक्टबोर्ड यांजमधील तालुकाबोर्ड हा स्थानिक स्वराज्याचा दुवाच समजला पाहिजे. प्रांतानिहाय तालुक्याची हीं बोर्डें कदाचित् निराळीं असतील. मद्रास इलाख्यांत ९६ तालुके मिळून एकंदर २६ जिल्हे आहेत. कमिशन रिपोर्टांत म्हटल्याप्रमाणें तालुक्यांना पोटजिल्हेहि म्हणतां येईल. हा तालुका सर्वस्वी

तालुकाबोर्डाच्या ताब्यांत असावा व या तालुकाबोर्डांतलि पंच ग्रामपंचांनीं निवडून द्यावे. अशा रीतीनें ग्रामपंचांना तालुकाबोर्डांत आपल्या तर्फेचा आणि आपल्या गांवाचें कल्याण चिंतिणारा असा पंच निवडून आणण्याचा हक्क राहील. विभागणी कमिशननें स्थानिक स्वराज्याच्या योजनेंत तालुकाबोर्डांना उत्पन्नाच्या व व्यवस्थेच्या बाबतींत पुष्कळशीं स्वतंत्रता द्यावी असें म्हटलें आहे ह्या तालुकाबोर्डाच्या ताब्यांत तालुक्यांतील हायस्कूलें, औद्योगिक शाळा, मॉडेल क्लास, खेड्यांखेड्यांतील रस्ते, पाटबंधारे वगैरेची व्यवस्था असावी. सहकारी पतपेढ्या सर्वत्र असाव्या व त्या जेथें नसतील तेथें शेतकीची आउतें, बीं, सांड, शेतकऱ्यांना भाड्यानें देण्याकरितां ठेवण्याची व्यवस्था केलेली असावी.

## ( ड ) जिल्हा बोर्ड.

कांहीं राजकीय सुधारकांच्यामतें जिल्हा बोर्ड नसावेत असें आहे. माझ्या-मतें ते सध्यां तरी जरूर आहेत. जिल्हा बोर्डांतील पंच अथवा मेंबर त्या जिल्ह्यांतील तालुका बोर्डांतल्या पंचांकडून निवडले जावेत. जिल्हा बोर्डाच्या पंचांनीं तालुका बोर्डांतील कामें कशीं चालतात तीं पहावींत व एकंदर जिल्ह्याच्या हिताचीं कामें करावींत व तालुका पंचायतीकडून आलेल्या आपिलांचा निकाल द्यावा. प्रत्येक तालुक्याकडून स्थानिक करांची वसूली किती आली पाहिजे व प्रांताकडून मिळणाऱ्या देणगीपैकीं कोणत्या तालुक्याला किती देणगी द्यावयाची हें ठरवावें. जिल्ह्याच्या पब्लिकवर्क डिपार्टमेंटचा इंजेनियर नेमणें, तालुक्यांतील प्राथमिक शाळा, व हाय-स्कुलें ह्यांजवर इन्स्पेक्टर नेमणें, जिल्ह्यांतील सार्वजनिक रस्ते, स्थानिक रेल्वे, सार्व-जनिक इमारती व कॉलेजें ह्यांची व्यवस्था वगैरे कामें ह्या बोर्डानें पहावी.

लॉर्ड रिपनच्या कारकीर्दींतच स्थानिक स्वराज्याला अल्प प्रमाणांवर सुरुवात झाली होती. कीन म्हणतो; 'होमरूलचें बीज ग्रामपंचायतींतच न राहतां शहरांतील स्थानिक कमिट्यांच्या द्वारें तें शहरांतही पेरलें गेलें आहे." त्याची प्रगति अल्प प्रमा-णांत का होईना पण खात्रीनें झालेली आहे. आणि या स्थानिक कमेट्यांतील सर्व पंच जेव्हां निवडलेले होतील व त्यांचा अध्यक्षहि लोकनियुक्तच होईल तेव्हां त्यांना खरा जीव येऊन त्यांची मजल जोरानें वाढल्याखेरीज राहणार नाहीं. होमरूलच्या तत्वावर स्थानिक स्वराज्यांची उभारणी झाल्यावर खोज्याच्या आणि चाचकांच्या शिक्षा ग्रामपंचायती बंद करतील आणि खेडवळ मनुष्य स्वतंत्र आणि सभ्य सम-

जला जाईल. मध्यवर्ति ठिकाणीं मॉडेल फॉर्म ठेवून प्रयोग व शिक्षण यांचें काम सुरळीत् चालेल. म्हैसूर संस्थानांत अशी तीन फार्मस आहेत. त्या योगानें रयतेला उत्तम खत, बीं व शेतकींतील इतर सुधारणांचें ज्ञान मिळेल. जंगलचे कायदे सुधारतील व त्यांच्या गुरांना चरण्याकरितां पूर्वीप्रमाणें कुरणें मिळ-तील. म्हैसूर सरकारनें शेतकऱ्यांच्या जनावरांकरितां जंगलाचा बहुतेक भाग खुला ठेविला आहे. ग्रामपंचायती गांवकऱ्यांच्या जरूरीप्रमाणें प्राथमिक शाळा चालवून मोठाल्या मुलांच्या धंदेशिक्षणाची सोय करतील व तालुका पंचायती पतपेढ्यांच्या द्वारें किंवा अन्य तऱ्हेनें शेतकीची सर्व सामुग्री उत्तम तऱ्हेनें पुरवितील. खेड्यांतील व तालुक्यांतील हुषार विद्यार्थी तालुक्यानें ठेविलेल्या शिष्यवृत्तीवर नानातऱ्हेचें धंदेशिक्षण कॉलेजांत संपादन करून उदयास येतील. हें कांहीं मनोराज्य नाहीं. ज्या ठिकाणीं स्वराज्य आहे त्या ठिकाणीं ह्या सर्व गोष्टी घडून येत आहेत. जपा-नच्या बादशहानें १८७२ सालच्या आपल्या जाहीरनाम्यांत म्हटलें आहे कीं, यापुढें आमच्या राज्यांत एकहि खेड्यांत एकहि अशिक्षित कुटुंब मिळणार नाहीं व एकहि कुटुंबात एकहि अशिक्षित मनुष्य रहाणार नाहीं. त्या देशांत २४ वर्षांत शिकाऊ वयाच्या मुलामध्यें शेंकडा ९२ मुलें शाळेंत जाऊं लागली. जें जपानांत. झालें तें हिंदुस्थानांत कां होऊं नये? मात्र शिक्षण सर्वस्वी हिंदुस्थानवासी-यांच्या ताब्यांत असलें पाहिजे कारण हिंदुस्थानांतील सुशिक्षित वर्गांतील लोकांची घरेंदारें खेड्यापाड्यांतूनच असतात. जातिभेद असलेल्या ह्या देशांत जाति-मिश्रणही युरोपपेक्षां अधिक प्रमाणांत दिसून येते कारण शेतीवाडी असणाऱ्या खेडवळाचा हुषार मुलगा वकील होऊन शहरांत वकीली करतो व मठ्ठ डोक्याचा त्याचा सख्खा भाऊ खेड्यांत शेतकी करीत राहतो व एक शेतकरी व दुसरा वकील असे दोघे भाऊ आमरणांत एकोप्यानें राहतात. राष्ट्रीय सभेनें ही गोष्ट आपल्या ठरावांच्या द्वारें वेळोवेळीं नजरेस आणली आहे पण त्या ठरावांची अंमलबजावणी होमरूल मिळाल्याशिवाय होणार नाहीं.

## (ई) लोकल गव्हर्नमेंट बोर्ड.

स्थानिक स्वराज्य पद्धतीचें नियमनाकरितां प्रांतिक कायदे कौन्सिलनें पास केलेल्या ठरावान्वयें एक लोकल गव्हर्नमेंट बोर्ड असावा व त्याची रचना १८७१ सालच्या लोकल गव्हर्नमेंट बोर्ड अक्टाप्रमाणेंच असावी परंतु त्याच्यांत होमरूल लीगनें

स्टेट सेक्रेटरी साहेबांना केलेल्या मागण्याप्रमाणें फेरफार करण्यांत यावेत. इंग्लंडांतील १८७९ सालच्या रॉयल सॅनिटरी कमिशननें जी विधानें केली आहेत ती यथायोग्य आहेत. सदरहू कमिशनच्या रिपोर्टांत एक वरिष्ठ सॅनिटरी ऑफिसर असावा व सर्व स्थानिक स्वराज्य पद्धति त्याच्या सल्यानें चालावी असें म्हटलें आहे व अशी एकतंत्री सत्ता कां असावी त्याची जीं कारणें दिलीं आहेत तीं आमच्या मद्रासच्या म्युनिसिपल प्रेसिडेंटनें ध्वनित केलेल्या कारणासारखींच आहेत. स्थानिक स्वराज्यांतील लोक सुस्त असतात. आपखुषीनें स्वतांवर कर लादणें त्यांना बरें वाटत नाहीं. शास्त्रीय पद्धतीवर त्यांचा विशेष भरंवसा नसता आणि आरोग्य रक्षणाचे कायदे स्थानिक स्वराज्यांतील मेंवरच मोडीत असतात हींच तीं कारणें होत. याच अडचणींची सबब पुढें करून इंग्लिश लोक हिंदुस्थानांतील स्थानिक स्वराज्याला आड येतात. इंग्लंडमध्यें ह्या अडचणी असतांहि तेथील स्थानिक स्वातंत्र्याला अडथळा होत नाहीं कारण गरिबांना मदत, व आरोग्यरक्षण याच कारणासाठीं इंग्लंडांतील ठरावान्वयें सर्व सत्ता एकतंत्री करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु इंग्लंडांतील हें मध्यवर्ती मंडळ कितपत फायदेशीर झालें आहे याची शंकाच आहे. कारण या बोर्डाचे मेंबर म्हणजे कौन्सिलचे प्रेसिडेंट लॉर्ड प्रिन्सीपील सेक्रेटरीज ऑफ स्टेट आणि चेन्सलर ऑफ दि एक्सचेकर हे बिन पगारी असतात व ते कांहीं काम करीत नाहींत. बोर्डचा प्रेसिडेंट मुख्य प्रधानमंडळाचा मेंबर असतो व त्याला २६०० पौंड सालिना पगार असतो. त्याला कायमचा सेक्रेटरी व पांच ॲसिस्टंट, एक कायदेसल्लागार, आणखी कित्येक इंजिनियर आणि डॉक्टर मदतनीस असतात. आमच्या एक्झीक्युटिव्ह कौन्सिलच्या योजनेप्रमाणें एक इंडियन मेंबर स्थानिक स्वराज्याचा प्रेसिडेंट नेमला म्हणजे झालें. त्याला या विनपगारी बेगडी बार्डाचा कांहीं एक जरूरी नाहीं.

‘ ह्या बोर्डाच्या कर्तव्याची वाढ ’ होण्यास १८३५ ते १८७० चे दरम्यान पार्लमेंटचे ४१ कायदे व १८७१ ते १९०७ यांच्या दरम्यान १५४ कायदे करावे लागले. कायदेपंडित म्हणतात कीं ही कायद्यांची याद सुद्धां पुरी नाहीं. कानू, नियम, हुकूम तर इतके आहेत कीं मीं त्यांच्याबद्दल विचारच सोडून देतें. बोर्डाच्या अध्यक्षांनीं निवडणूक झाल्यावर तो त्याचा अभ्यास करील.

## प्रांतिक व वरिष्ठ कायदे कौन्सिल.

राष्ट्रीय सभा व मुस्लीम लीग यांनीं तयार केलेली सुधारणांची योजना राष्ट्र-

पुढें आज एक वर्ष आहे. व तो व्हाइसरॉय साहेब व भारतमंत्री त्यांस सादरहि केली आहे. गेल्या दोन वर्षांत त्यांवर पुष्कळांनीं आपले विचार प्रदर्शित केले आहेत व त्याची भवति न भवतिहि पुष्कळ झाली आहे. तेव्हां मी त्याबद्दल चर्चा करीत नाहीं. त्या योजनेच्या बाहेर न जातां आपण सर्वांनी त्याकरितां प्रामाणिकपणें व उत्साहानें काम केलें आहे. सध्याच्या घडामोडीच्या काळीं त्याबरहूकूम काम करण्यास आपण राष्ट्रांस मदत केली पाहिजे. तें आपलें कर्तव्य आहे. एकोणीस नामदारानीं केलेल्या सुधारणेच्या योजनेपेक्षां ही योजना थोडीशी भिन्न आहे. सध्यांच्या स्थितीपासून कॉंग्रेसच्या गतवर्षीच्या ठरावांतील खालीं दिलेल्या तिसऱ्या भागापर्यंत पोंचण्यास योजना हा एक पूल आहे. ठरावाचा तिसरा भाग असा आहे कीं,—

"साम्राज्याच्या पुनर्घटनेंत हिंदुस्थान हा परतंत्र न राहतां त्याचा दर्जा स्वसत्ताक वसाहतीच्या बरोबरीचा व्हावा."

हें आपलें ध्येय आहे. कॉंग्रेसची योजना पार्लमेंटांत पसार होईपर्यंत आपणांस चळवळ केलीच पाहिजे. शेवटच्या योजनेंत स्वराज्य मिळाल्यानंतर देशी संस्थानांचा समावेश, हिंदुस्थानचा साम्राज्य सत्ताधारी कौन्सिलांत अंतर्भाव वगैरे प्रश्न येतील. ह्या गोष्टी सध्याच्या तात्पुरत्या योजनेंतून मुद्दामच वगळल्या आहेत.

प्रांतिक कायदेकौन्सिलांनीं डिस्ट्रिक्टबोर्डांना आपलीं कामें करण्याकरितां पैशाची मदत करावी व डिस्ट्रिक्ट बोर्डांनीं तीं आपल्या ताब्यांतील तालुका बोर्डांना व ग्रामपंचायतीना वाटून द्यावी. या स्थानिक संस्थांना दिलेल्या देणगीचा त्यांच्याकडून दुरुपयोग होत नाहीं ना एवढेंच पाहण्यापुरती त्यांजवर स्थानिक स्वराज्याच्या बोर्डाच्या अध्यक्षाची नजर असावी. जोपर्यंत चुकीचा, घोर परिणाम होईल असें मानण्याचें कारण उद्भवलें नाहीं तोंपर्यंत स्थानिकस्वराज्य संस्थांना शहाणपण शिकण्याला चुकी करण्याची देखील मुभा पाहिजे तरच तें खरें स्थानिक स्वराज्य होय.

आपल्या प्रांतांतील उद्योगधंद्यांना उत्तेजन देणें आणि प्रत्येक जिल्ह्यांत तेच ते प्रयोग करण्याचे टाळण्यासाठीं जिल्हाबोर्डांना उपयुक्त असे औद्योगिक प्रयोग करून

पहाणें हेंही प्रांतिक सरकारचेंच काम आहे. म्हैसूर संस्थानांत अशा प्रकारें उद्योगधंद्यांचे व शेतकीचे प्रयोग चालू आहेत व रयतेला त्यांपासून मोठा उपयोग होतो असें कळतें. त्या संस्थानानें सहा प्रकारचे नवे नांगर आणवून हप्तेबंदीनें रक्कम देण्याच्या करारावर ते रयतेस विकण्याची तरतूद केली आहे. हें सांगण्याचा उद्देश एवढाच कीं, हिंदी अधिकारी हिंदी प्रजेच्या हिताकरितां संस्थानांतून काय करूं शकतात तें कळावें व त्यावरून 'स्वराज्य' म्हणजे अंदाधुंदीचें राज्य अशी कल्पना केल्यानें जी कित्येक भ्याडांच्या हृदयांत धडकी भरली आहे ती जाऊन 'स्वराज्य' म्हणजे भरभराटीचा मार्ग अशी त्यांची खात्री पटावी.

## हप्तेबंदीचें स्वराज्य.

हप्त्या हप्त्यानें स्वराज्य देण्याची एक नवी योजना पुढें आली असून अँग्लो इंडियनांकडून तिचा आतुरतेनें स्वीकार केला जात आहे. या योजनेंत प्रत्येक प्रांतांत दुहेरी राज्यपद्धति अंमलांत यावयाची आहे. प्रांतिक सरकारचीं बहुतेक महत्त्वाचीं खातीं हल्लींप्रमाणेंच बेजबाबदार अधिकाऱ्यांच्या हातीं रहावयाचीं आणि शिक्षण, आरोग्य असलीं खर्चाचीं खातीं लोकनियुक्त व जबाबदार अशा अधिकाऱ्यांच्या हातीं द्यावयाचीं. सर्व सत्तेचें केंद्रस्थान जी पैशाची पिशवी ती हल्लीं सारखीच बेजबाबदार ब्युराक्रसीच्या स्वाधीन रहावयाची असल्यानें तिच्याकडून भरपूर रक्कम न मिळाल्यानें लोकांच्या हातीं दिलेल्या खात्यांचा कारभार समाधानकारक चालणार नाहीं. किंवा हीं खातीं इतकीं कमदर्जाचीं व क्षुल्लक महत्त्वाचीं असतील कीं, त्यांच्या कारभारांत कोणी विशेष मन घालूं इच्छिणार नाहीं. हल्लींच्या स्थानिक स्वराज्याचा कारभार नीट न चालण्याचें जें कारण आहे तेंच या नव्या योजनेंतील स्वराज्याचा हप्त्याचा कारभारही सुरळीतपणें न चालण्याला लागू पडेल. सारांश आम्हीं स्वराज्य मागत असतां आमच्यापुढें ही योजना मांडणें म्हणजे भाकरी मागत असतां पदरांत धोंडा टाकण्यासारखेंच आहे. हिंदी लोकांना स्वराज्य पाहिजे आहे आणि ही नवी योजना त्यांना जास्त जास्तच परावलंबी व पराधीन करूं पहाते. आम्ही आमच्या पात्रतेवर विश्वास टाका असें म्हणतो पण ही योजनाच मुळीं अविश्वासाच्या पायावर रचलेली आहे. ब्युराक्रसीचा अमल ढिला व्हावा अशी आम्ही ओरड करीत असतां या योजनेंत आमच्या स्वराज्याच्या खात्यांची वेसण या ब्युरोक्रॅटांच्याच हातीं राहणार आणि

हे ब्युरोक्रॅटस अधिकाररूपी पक्कान्नावर यथेच्छ ताव मारून उरलेसुरले तुकडे आमच्या पदरांत टाकणार! ग्रेटब्रिटननें सर्व जगाच्या साक्षीनें आपलें जें ध्येय जाहीर केलें आहे त्या ध्येयांतील प्रत्येक तत्त्वाला या हुसेबंदीच्या योजनेनें हरताळ फांसली जाते. कॉंग्रेसनें सुधारणांची स्पष्ट योजना मागितली आहे आणि तींत जीं तत्त्वें गोंविलीं आहेत ती मुलतत्त्वें मान्य झाल्याखेरीज दुसऱ्यां कशानेंही आमचें समाधान होणार नाहीं. आम्हीं या पेक्षां ज्यास्तीहि मागणी करूं पण यांतून कांहीं कमी घेणें अशक्य आहे. स्वातंत्र्याकरितां धडपडणारी राष्ट्रें पुरोगामी असतात. प्रतिगामी असत नाहींत.

## डेप्युटेशन ( शिष्टमंडळ )

स्वराज्य योजनेला कायदेशीर स्वरूप देण्यास पार्लमेंटांत बिलें आणावी लागतात. त्याच्या खटपटीकरितां विलायतेस डेप्युटेशन पाठवावें लागेल तरी या डेप्युटेशनमधील प्रतिनिधींना असें बजावून ठेवलें पाहिजे कीं, योजनेंतील मुख्य मागण्यामध्यें रतीभरहि मागें घेऊं नका. धैर्यानें त्या मागण्या पुढें मांडा. जमाखर्चावर लोकांची सत्ता असणें व कायदेकौंसिलांतून लोक मतांचें वर्चस्व या गोष्टी योजनेंत मुख्य आहेत. सरकार त्या देत नसेल तर बाकीची चर्चा व्यर्थ आहे. त्या देत असेल तर बाकीची चर्चा करतां येईल. डेप्युटेशन पाठविल्यास इकडे जोरानें व सतत चळवळ चालली पाहिजे तरच डेप्युटेशनला तिकडे खंबीरी येईल. हिंदी राजकारणाची लढाई विलायतेंत जिंकली पाहिजे असें म्हणण्यांत येतें हें खरें आहे पण त्याचा अर्थ इतकाच कीं, आपल्या मागण्या विलायतेंतील लोकांपुढें स्पष्टपणें मांडण्यांत आल्या पाहिजेत पण खरी लढाई इकडेच आहे. कारण हिंदुस्थान जोरानें मागेल तर तें इंग्लंड देण्याचा संभव. मजूरपक्ष मदत देईल, त्यांचीं मतें आपणास मिळतील पण राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळविण्याचा आमचा निश्चय आहे असें आम्हीं इकडे सिद्ध केलें पाहिजे.

## देशी भाषा.

नवे अधिकार मिळणार त्यांचा उपयोग करण्यास लोकांना शिकविण्याचें इकडे बरेंच काम आहे. व तें प्रांतानिहाय देशी भाषांतून केल्याशिवाय लोकांस समजणार किंवा उमजणार नाहीं. लवकर कीं उशीरा पण लवकरच भाषावार प्रांतरचना करावी लागेल. कांहीं दिवस सरकारी कामकाजांत जोडभाषांचा उप-

योग करावा लागेल. कानडा वसाहतींत इंग्लिश व फ्रेंच या दोन भाषांचा सर्रास उपयोग केला जातो. देशी भाषांचा उपयोग केल्याशिवाय लोकांना सरकारी कामकाजांत पूर्णपणें मिसळतां येणार नाहीं.

## नवें ध्येय.

आपलें नवीन ध्येय काय आहे ? कॉंग्रेसच्या ठरावांतील तिसऱ्या भागाचा अमल करण्याकरितां नवी योजना बनविली पाहिजे. अर्थात् खालसा मुलखापुरतीच ही व्यवस्था आहे ( १ ) संस्थानिकांशीं झालेले तह लक्षांत घेऊन त्यांच्याविषयीं सरकारास कांहीं योजना केली पाहिजे. पण खालसा मुलखांतल्याप्रमाणें आपल्या संस्थानांत प्रजेला जे राजे हक्क न देतील त्यांना आमच्या कारभारांत बिलकुल स्थान मिळतां कामा नये. ब्रिटिशसरकार व संस्थानें यांचे परस्पर अधिकार व हक्क सारखे असले पाहिजेत. ( २ ) हिंदुस्थानच्या योग्यतेप्रमाणें त्याचा साम्राज्यांत दर्जा राहिला पाहिजे नाहीं तर विलायत सरकाराबरोबर वसाहत सरकार हिंदुस्थानावर अधिकार सांगूं लागेल व आमच्या औद्योगिक प्रगतिला मोठा अडथळा होईल. आजचें युद्धमंत्रिमंडळ हेंच जर उद्यां मध्यवर्ती--साम्राज्य--मंत्रिमंडळ व्हावयाचें असेल तर त्यानें साम्राज्य रक्षणापुरतेंच पहावें. इतर प्रश्न घेणें तर सर्व साम्राज्यांतील स्वतंत्र सरकारांची संमति मिळविल्याशिवाय घेऊं नये. प्रत्येक सरकाराला जकाती वगैरे आपल्या इच्छेप्रमाणें बसविण्याचा अधिकार रहावा, मात्र साम्राज्य रक्षणाकरितां त्यांच्या हिशाची वर्गणी असेल ती घ्यावी. ह्या ध्येयाकरितां १९१८ सालभर लेख, व्याख्यानें, चर्चा, वगैरेच्या योगानें लोकशिक्षण देऊन कॉंग्रेसची योजना यशस्वी केली पाहिजे. १९१८ च्या डिसेंबर पूर्वी युद्ध थांबून साम्राज्य पुनर्घटना न झाल्यास नवीन योजना करण्याचा हुकूम राष्ट्रीय सभेनें द्यावा. व १९१९ च्या सभेंत व मुस्लीम लीगमध्यें नवीन योजना मंजूर करण्यांत यावी.

या नव्या योजनेंतील मुद्दे असे आहेत:—( १ ) कायदे कौंसिलांतील सर्व सभासद लोकनियुक्त असावे. ( २ ) सरकारी नोकरांना कोणत्याहि निवडणुकीस उभे राहतां येऊं नये अगर राजकीय स्वरूपाची चर्चा करण्यास त्यांना परवानगी असूं नये त्यांना मतदारीचा हक्क असावा. हा नियम पेन्शनवाल्या लोकांना लागू नाहीं. ( ३ ) वरिष्ठ व प्रांतिक कायदे कौंसिलांची एक सभा असावी, दोन

सभा असूं नयेत. (४) मंत्रिमंडळ कायदे कौंसिलांतील पुढाऱ्यांकरवींच बनविलेलें असावें. त्यांना प्रीव्ही कौंसिलरचा दर्जा असावा. मात्र कायदे कौंसिलचा तसा ठराव झाल्यास त्यांना मंत्रिपदावरून दूर करण्यांत यावें. (५) हिंदुस्थानचें सैन्य व आरमार व्हॉइसराय साहेबांच्या हुकमतीखालीं असावें व त्याचा खर्च किती असावा हें वॉर कौंसिल व हिंदुस्थानसरकार यांनीं वेळोवेळीं ठरवून तो हिंदुस्थानच्या तिजोरींतून देण्यांत यावा. (६) इकडील व्यापारी गलबतांसंबंधी सर्व अधिकार हिंदुस्थान सरकारास असावा. नंबर तीन हा मुद्दा वादग्रस्त आहे. पण त्या बाबतींत देशांतल्या देशांतच इतका मतभेद आहे कीं- कोणताहि कायदा घाईनें केला जाईल असें समजण्याचें कारणच नाहीं. शिवाय गव्हर्नराला कायदे कौंसिल बरखास्त करून नव्या निवडणुकी करतां येतील व कायदा घाईनें झाला तरी त्यास संमति न देण्याचा अधिकार गव्हर्नरास राहतोच. चौथ्या मुद्यासंबंधानें इतकेंच सांगावयाचें कीं प्रीव्ही कौंसिल बाजूंस पडून हल्लींची प्रधान मंडळाची पद्धति उत्पन्न होण्यास विलायतेंत विशेष कारणें घडलीं. मंत्रिमंडळाचा प्रत्येक सभासद प्रीव्ही कौंसिलर असतो. व मंत्रिमंडळ मोडलें तरी तो प्रीव्ही कौंसिलर राहतो. कोणत्याहि मंत्र्याला कमी करण्याचा अधिकार लोकसभेला असल्याशिवाय तो नेमला जाऊं शकत नाहीं. हिंदी सैन्यासंबंधानें माझें विशेष म्हणणें असें कीं, या सैन्यांत सैनिक हिंदी व अधिकारी हिंदी असावे. म्हणजे विलायतेंतील टेरिटोरियल फौजेसारखी (फक्त स्वदेशसंरक्षक अशी) इकडील फौज होईल. आणि थोड्या मुदतीनें गोरे सोजीर इकडे आणल्यानें भारी खर्च येतो तो येणार नाहीं.

## भारतमंत्री

१९१७ साल हें चिरस्मरणीय होईल. या सालांत आमच्या अदमासापेक्षांहि अधिक व जलद विलायतसरकारचें हिंदुस्थानविषयक धोरण बदललें. आम्हांला बादशाही जाहिरनामा तर मिळालाच शिवाय स्टेट सेक्रेटरी, इतर कित्येक प्रमुख गृहस्थांसह इकडे आले आहेत. या सर्व गोष्टींतून काय निष्पन्न होईल हें आजच कोणी सांगावें ? सेक्रेटरीसाहेब व व्हाइसराय दोघांनींहि पुढाऱ्यांचें सर्व म्हणणें शांतपणें व मित्रभावानें ऐकून घेतलें एवढी गोष्ट तरी खरी. लो. टिळक, महात्मा गांधी, मी स्वतः यांना वेगवेगळया मुलाखती देण्यांत आल्या. काँग्रेस, व

मुस्लीम लीग यांच्याप्रमाणेंच होमरुल लीगनांहि वागविण्यांत आलें. ब्युरॉक्रसीला विरोध करणारे म्हणून कोणास वगळण्यांत आलें नाहीं. मग पुढें ईश्वर काय करील तें खरें. आमच्या मागणीला आंग्लो इंडियन वतनदारांचा विरोध असून आहे, पण ईश्वर न्यायी आहे आणि आपल्या स्वातंत्र्यप्रेमास जाणणारे विलायतेंतील लोक आम्हांविषयीं मित्रभाव बाळगतात हें आम्हांस माहित आहे. मजूर पक्षाची राष्ट्रीय सभा, व उभय स्वराज्य संघ यांच्याशीं स्नेहविनिमय करण्याची इच्छा आहे हें सुचिन्ह होय. हिंदी जनता व ब्रिटिश जनता यांजमधील नवीन बंधुत्वाची ही खूण आहे. जानेवारींत भरणाऱ्या मजूरपक्षाच्या परिषदेला उभय स्वराज्यसंघांनीं बॅरिस्टर बॅपटिस्टा यांना आपले प्रतिनिधी नेमून दिले आहेत. व उलट मजूरपक्षाचे एक पुढारी मेजर ग्रहाम पोल हे आम्हांस परत भेट देत आहेत. राष्ट्रीय सभा आपले प्रतिनिधी उपरिनिर्दिष्ट परिषदेला पाठवील व इकडे येणाऱ्या प्रतिनिधींचें स्वागत करील असें मला वाटतें. अशा रीतीनें इंग्लंड व हिंदुस्थान यांची गट्टी दृढतर होईल. ह्या सर्व गोष्टींकरितां व भारतमंत्र्याच्या आगमनाबद्दल १९१७ हें वर्ष चिरस्मरणीय होईल यांत शंका नाहीं.

## अलीबंधु

आज सव्वा तीन वर्षें महंमदअली व शौकतअली हे सरकारी कैदेंत असून सार्वजनिक दृष्टीनें मृतप्राय झाले आहेत. तेजस्वी देशभक्तानां अधिक जाणवणारी व दुःख देणारी शिक्षा याहून कोणती? त्यांचा गुन्हा असला तरी त्यांना इतकी शिक्षा झालेलीच आहे. ते निर्दोषी आहेत असा आमचा भरंवसा आहे. त्यांच्या धर्मनिष्ठेबद्दल आम्हांस आदर वाटतो. अशा लोकांचा सन्मानपूर्वक उल्लेख करण्याहून अधिक आम्हीं काय करणार? मात्र आम्हांला खात्री वाटते कीं, त्यांची बंधमुक्तता होऊन लोक जेव्हां त्यांचा प्रत्यक्ष सत्कार करतील तेव्हां त्यांनीं भोगलेल्या यातनामुळेंच त्यांना दुप्पट बळ येईल.

## आमची दुही

आपल्या राजकीय संस्थांमधून दुहीची प्रवृत्ती दिसून येते असें अनेक लोकांनीं म्हटलें आहे व त्यामुळें आम्हांस स्वराज्य देऊं नये असें आमचा प्रतिपक्ष म्हणत असतो. वस्तुतः पाहतां ह्या कारणामुळें तर तें द्यावें असेंच कोणास वाटेल. हें कदाचित विरोधात्मक भासेल. पण खरी स्थिती काय आहे?

अनेक जातींचें आणि मतांचें आपलें राष्ट्र आज स्वतंत्रता मिळविण्याचा प्रयत्न करीत आहे. सर्व शक्तीमान आणि वहाली वढती आपल्या हातांत ठेवणारें असें सरकार आपल्या डोक्यावर वसलें असून राज्यव्यवस्थेंत अतीशय सुधारणा करा असें म्हणणाऱ्यांस ते आपल्या हुकमानें चिरडण्यास समर्थ आहे. आपलीं सत्ता ज्या कायद्यामुळें कमी होईल तो दिरंगाईवर टाकण्या करितां तें पाहिजे त्या पक्षाशीं किंवा जातीशीं संगनमत करण्यास तयार असतें. ईस्ट इंडिया कंपनीनें हिंदुस्थान जिंकताना–किंवा वळकावताना–ज्या प्रमाणें कनिष्ठास हातीं धरून वलिष्ठास चीत केलें त्याप्रमाणें आतां सुद्धां दुही दिसतांच दुवळ्यांचा कैवार घेऊन सवल पक्षास पाडण्याची सरकारची प्रवृत्ती असते. लॉर्ड लिट्न हे व्हाइसरॉय असताना त्यांना जसें " सवव नसेल तर एखादी हुडका " असें कळविण्यांत आलें होतें तसेंच आतांही दुहीचा मागमूसच नसला तरी तीहि हुडकण्यांत येतें. दादाभाई नवरोजी हे जेव्हां पार्लमेंटांच्या निवडणुकी करितां उभे राहिले तेव्हां त्यांच्या विरुद्ध मि० भावनगरी ह्यांना उभें करण्यांत आलें आणि हे दुसरे पिच्छेहाटवाले गृहस्थ दादाभाईसारख्या करारी सुधारणावाद्यास मागें सारून निवडून आले. कोणतीहि राजकीय परिस्थिती ह्यापेक्षां वाईट नसेल. देशांत दोन मोठे पक्ष म्हटले म्हणजे हिंदू व मुसलमान, पण सरकार ख्रिस्ती, व त्याची कृपा संपादण्याकरितां दोघांची चढाओढ. यामुळेंच ही सगळी फाटाफूट, दंगेधोपे वगैरे होतात. हिंदु किंवा मुसलमान राजांच्या संस्थानांतून अशा गोष्टी घडत नाहींत ! लखनौ येथें हिंदु व मुसलमान एक झाले असें पाहतांच त्यांच्या दोस्तीचा विघाड व्हावा म्हणून अनेक लोकांचे प्रयत्न ! जातींतील पुढाऱ्यांनीं किंवा राजकीय संस्थांनीं, करार केला तरी त्याला न जुमानणारे असे लोक हरएक जातींत असतातच. अशांना गुळखोवरें किंवा धाकदपटशा अधिकाऱ्यांच्या प्रोत्साहनानें मिळाल्यास सरकारचा पक्ष उचलणारे किंवा आपल्याच जातीकरितां विशेष मागण्या करणारे अशा लोकांना काय तोटा ? मद्रासेंतील ब्राह्मणेतर लोकांची चळवळ अशाच प्रकारची आहे. दोन तीन वर्तमानपत्रें व दोन तीनशें लोक ! सुदैवानें दि. व. केशव पिले यांच्या नेतृत्वाखालीं समंजस ब्राह्मणेतरांनीं दुसरी संस्था काढून ही खोटी चळवळ हाणून पाडली. ब्राह्मणेतरांना वरिष्ठ जागा हव्या आणि त्या सरकारची स्तुति करून व होमरूलला विरोध करून मिळतील अशी आशा त्यांना वाटते ! विचारें

होमरूलचे गुरु वाटेल त्यानें हातीं सांपडेल ती काठी घेऊन त्याला खुशाल बडवावें. ब्राह्मणेतरांसारख्या चळवळींचा या काठ्यासारखा उपयोग करण्यांत येतो. पण सरकार हें लोकमतास जबाबदार नसल्यानें असल्या मतमतांतरांचा गलबला चालावयाचाच, त्याची काळजी कशाला? स्वराज्य मिळून सरकारास राष्ट्रीय स्वरूप येतांच याच मतांतरांची उदात्त तत्वांवर पुनर्रचना होईल. हातीं अधिकार आल्यानें जबाबदारीची जाणीव उत्पन्न होते व जबाबदारीनें अंगीं शिस्त येते. या क्षुद्र भांडणांना व अडचणींना फाजील महत्व देतां कामा नये. त्या करून किती नुकसान करणार? होमरूल मिळाला म्हणजे या सर्व गोष्टींचें योग्य तेच महत्व राहील.

## किरकोळ सुधारणा

राष्ट्रीय सभेनें आजवर किती तरी किरकोळ मागण्या मागितल्या त्यांची एक लांबलचक यादच होते. बहुतेक अशा मागण्या वरचेवर मागण्याचा आतां कंटाळा येऊन गेला आहे. त्यापेक्षां एक स्वराज्याच्या मागणीवरच सर्व लक्ष पुरवावे तें आधिक बरें असें त्यांना उमजूं लागलें आहे. सत्ता मिळाली म्हणजे वाईटा ऐवजीं चांगले कायदे आपले आपल्याला करतां येतात. सत्ता मिळाल्यावर राष्ट्रीय सभेच्या किरकोळ मागण्या हातीं घेऊन त्यांत योग्य ते फेरफार करून अमलांत आणतां येतील. न्यायखातें बजावणीखात्यापासून वेगळें होईल. हायकोर्टाची सत्ता विस्तार पावेल, शिक्षणाचे कायदे होतील, ज्यूरीचा हक्क मिळेल, परदेशांतील हिंदी लोकांचें संरक्षण होईल, जमीन महसूल वाजवी बसेल, उद्योगधंद्याची वाढ होईल, नोकऱ्यांच्या परीक्षा इकडेच घेतल्या जातील. गोऱ्यांप्रमाणें काळयांनाहि लष्करी शिक्षण मिळून सरदारक्या लाभतील.

सुधारणेच्या नांवास बट्टा आणणारे कायदे बंद होतील, दडपशाही हटेल, पोलिसांचे सर्व खेळ बंद पडतील, इनसाफाशिवाय कोणास शिक्षा होणार नाहीं. विलायतेंतील स्वतंत्र नागरिकांना लाभलेले सर्व हक्क आमचे आम्हांस मिळतील. आपला देश स्वतंत्र आपण स्वतंत्र व आपण सर्व सुधारलेल्या लोकांच्या बरोबरीचे झ. त्यामुळें होणाऱ्या आनंदाचा विचार करा. जुलुमी राज्यपद्धति नाहींशी झाली. आपली मालमत्ता अगर आपलें स्वातंत्र्य यावर उघड चवकशी शिवाय कोणासहि गदा आणता येणार नाहीं. फुकटच्या फुकट केवळ अधिकाऱ्यांच्या लहरीवर कोणीहि गुन्हगार ठरणार नाहीं. कायद्याचें साम्राज्य होईल व अधिकाऱ्यांना न्यायदानाच्या

वळाढवळ करतां यावयाची नाहीं. परंतु ही परिस्थिती स्वराज्य मिळा-
उत्पन्न होईल एरव्ही शक्य नाहीं.

## सारांश.

प्रतिनिधी बंधू भगिनींनों, विस्तार फार झाला याची माफी करा. राष्ट्रीय चा अध्यक्ष म्हणून ज्या देशाविषयीं आपल्या सर्वांना इतकें प्रेम वाटतें त्यावि-षयीं मी इतकें बोलले. हा राजकारणाचा झगडा कठीण आहे, कोणाला ठाऊक मी तुमच्याशीं असेंच बोलण्याला व पुढारी म्हणून तुमच्याबरोबर काम करण्याला मोकळी राहीन कीं नाहीं ? कोणी सांगावें ? माझ्यावर टाकलेला विश्वास असाच चालवून मी बेइमान ठरेपर्यंत माझ्याकडून काम घ्या. मतभेद हा होणारच. मग टीकेला भिऊन काय उपयोग ? पण माझे शत्रू मजविषयीं बोलतात तें सर्व खरें मानूं नका. त्यांना मी इतकी तपशीलवार उत्तरें देत कोठें बसूं ? तुम्हांला खुषच ठेवीन अशी आशा कशी धरावी ? पण माझ्या कल्पनेप्रमाणे मी राष्ट्रसेवा करीत राहीन एवढें आश्वासन मात्र मला देतां येतें. पुढाऱ्यांचें कामच लोकांना न दिस-णारीं अशी पुढची वाट आपल्या जबाबदारीवर दाखवून देण्याचें आहे. पुढाऱ्याला आपल्या अनुयायांना सर्वच गोष्टी तपशीलवार सांगत बसतां येत नाहींत. मी विदेशी म्हणून आजवर मुद्दाम बाजूस बसले होते. आतां तुम्ही होऊन मला पुढें बोलावतां तर मी तें काम योग्य तऱ्हेनें करण्याचा प्रयत्न करीन.

माझ्या स्वतासंबंधीं इतकें पुरे. आतां मातृभूमीविषयीं विचार करूं. हिंदुस्थानचा भाग्योदय व्हावा. त्याला सर्वत्र मान मिळावा, गतवैभवाप्रमाणें त्याचें भावी-वैभव व्हावें याकरितां झटलें तर पाहिजेच, पण प्रसंग पडल्यास दुःखेंहि भोगणें किंबहुना त्याकरितां मरण पतकरणें योग्य होणार नाहीं काय ? युरोप, व अमेरिकेंत जे मानववंश आज जगाचें सुकाणूं फिरवीत आहेत ते पूर्वी जिच्या पोटीं जन्मास येऊनच तिकडे गेले त्या वैभवशाली राष्ट्रमातेच्या धर्मनिष्ठेबद्दल जें प्रेम येतें, तिच्या वाङ्मयाबद्दल कौतुक वाटतें, तिच्या पराक्रमाबद्दल जो सन्मान द्यावा लागतो तसा इतर कोणत्या तरी देशाबद्दल मनांत उत्पन्न होतो काय ? कुरुक्षेत्रा-वर हिंदपुत्रांची तरवार मोडून पडली व नंतर युरोप एशिया खंडांतील लोक इकडे पसरले त्यांनीं शहरें उध्वस्त केलीं व राजांचे मुकुट हिरावून घेतले, यामुळें हिंदभूला जशीं दुःखें भोगावी लागलीं तशी इतर कोणास भोगावी लागली

असतील काय ? पण सुदैवानें जे जेते म्हणून आले ते येथेंच घरें करूनगावें. यामुळें विश्वकर्म्याच्या दैवी लीलेनें देशी व विदेशी दोन्ही राष्ट्रांचे गुण फार एक नवीन सुंदर राष्ट्र बनलें. च,

हिंदुस्थानचा इतिहास हजारों वर्षांचा आहे. मानवीदृष्टीच्या पलीकडेहि च जातो. पण जुन्या संस्कृतीबरोबर हें राष्ट्र कांहीं मृत्यू पावलें नाहीं. सर्व घ मोडींतून जिवंत राहून त्यानें आपलें डोकें वर काढलें. सर्व राष्ट्रांत अधिक दुःखें अशीं याच राष्ट्रानें सोसलीं पण आतां मात्र त्याच्या पुनर्जन्माचा अरुणोदय होत आहे. हिंदीराष्ट्र देवाप्रमाणें अमर, वैभवशाली व सदा तरुण असेंच असो ! तें स्वाभिमानी व स्वावलंबी होवो ! प्रबल होऊन तें स्वतंत्रता भोगो ! आशिया खंडाचें मुख उज्वल करो ! त्याच्या मस्तकावर ईश्वराची उज्वल दृष्टि व वरदहस्त सदा आहे.

REFBK-0002053